साहामाही ,, ३ ,, ८८
सालअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ..................६४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition perline 3 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXVII AKOLA MONDAY 2 JANUARY 1893 NO. I

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २ माहे जानेवारी सन १८९३ इ० अंक १



# CLEMENT'S TONIC.

## दुखणेकऱ्यास संजीवनी

## क्लेमेंटचें टानिक.

( दुतियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय तो एकच खात्रीचें औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दृष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचें टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति येते. नामकुवत मनुष्यास सदृढ बळकट व वीर्यवान बनविते आणि नाजूक स्त्रिया बांधयानें मजबूत व पाणीदार अशा होतात.

तरुण मध्यमवयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचें गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक हें आढळलें. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर श्रमाक्रमानें थकत गेलें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तात्काळ नाहींत शीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निरोप होते. कुरूप मुख इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याला त्याला भरंवसा टिनासा झाला, स्वभाव मनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडू लागली, वातशूल झाला, कंबरेत सलका भरल्या तांच पाठींत दुखणें वेळोवेळ दातदुखणें अथवा तिडकणें झोंप न येणें होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय ... आग होणें लघवी पांढरी होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणेस व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें ... आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टॉनिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे. हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॉनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञानतंतूंच्या योगें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements. ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. ' क्लेमेंटचें टानिक ' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्यांचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.

## जाहिरात
## हे पाक पाहा

हा हेमंत ऋतु मुक्त हिवांतच खाण्यानें पौष्टीक शक्ती व स्फूर्ती व स्मरणशक्ति मिळेल व हस्तपाद व कटी ठणक व शूळ व सर्व वात विकार नाहींसे खात्रीनें होतात व बाळंतीणीस व सर्वां स्त्रीयांस गुण देणारें सौभाग्य सुंट हे पाक विक्रीस तयार आहेत लागेल त्यांनीं मागविल्यास व्हालुपेबलनें पाठऊ. पोष्टेन खर्च निराळा पडेल त्वराकरा गेली वेळ येणार नाहीं.

| | |
|---|---|
| सालम मिसरी पाक दृ० शे० ८० तो. | ३रु. |
| बदाम पाक | २॥ |
| कुस्मांड पाक | ५ |
| सालम मिसरी व बदाम पाक प्रत २ | २ रु. |
| सौभाग्य सूंट | २ |

( पत्ता व सही ) शिवचरणगिर रामगीर वैद्य कुरणखेडकर अकोला गंगावरचे माडीवर चोकांत दवाखाना. वऱ्हाड.


'दृष्टंकिमपि जगत्यास्मिन् निर्दोषं निर्गुणं हि वा "

" जगामध्यें दुर्जनांचा भरणा फार आहे"

आज मित्ती पर्यंत पुष्कळ संत, ऋषि व पुरुष होऊन गेले आहेत ह्यांना आपण इतका मान कां देतों, त्यांना आपण इतके पूज्य कां मानतों, व त्यांना आपण ईश्वराचे अंशच ह्मणून कां लेखितों? याचें कारण काय? त्यांनीं असें काय केलें आहे? त्यांनीं काय केलें नाहीं! सरल मार्ग सोडून वाईट मार्गानें पाऊल भर गेल्यास काय होतें या संबधानें त्यांनीं जे मोठें, नेहेमीं मनांत वागविण्यास योग्य असे कांहीं सिद्धांत करून ठेविले आहेत ते ऐकिल्यावर घटकाभर मनाची कांहीं चमत्कारिक स्थिति होते. व हे लोक कोणी तरी सिद्धपुरुषच होते असें वाटल्या वांचून राहवत नाहीं. त्या सिद्धांतामध्यें त्यांनीं "जगांमध्यें दुर्जनांचा भरणा फार आहे " असा एक सिद्धांत काढला आहे. तो किती खरा आहे! या वरून त्यांचें खरें ज्ञान कळून येत आहे.

खरोखर मनुष्या सारखा दुष्ट प्राणी दुसरा कोठेंही नसेल. त्याच्या हातून दुष्टपणाचीं कृत्यें कितीं होतात हें आपण पदोपदीं व हरवडीं पाहतों; आणि या पृथ्वीवर ज्या वेळेस सर्व ठिकाणीं अघोर व भयंकर अशीं अरण्यें होतील व मनुष्य हा होतां कीं नव्हतां असें होईल त्या वेळींच दुष्टपणाचा समूळ नाश होईल. एरवीं असें होणें दुर्घटच! एखाद्यानें दुष्कृत्य केलें, अमक्यानें पापकर्म केलें हें कळण्यास फार उशीर लागत नाहीं. दुष्कृत्य घडण्याचा मात्र अवकाश कीं त्याची बातमी आपल्या कानावर धडकलीच. फार कशाला एखाद्या सदाचरणानें वागणाऱ्या मनुष्यानें आपल्याला जरी एका खोलींत कोंडून घेतलें तरी पापाचरण कोणी केल्याची बातमी त्याला तेव्हांच लागेल. नीतिशास्त्राचीं पुस्तकें कशा साठीं झालीं असतील बरें! जगांमध्यें दुष्टपणा होतो तो न व्हावा, त्याचें होईल तितकें निवारण व्हावें या हेतूनें तीं लिहिणारांनीं लिहिलीं असावींत. नाहींतर हीं पुस्तकें लिहिण्याचें दुसरें प्रयोजन काय असेल बरें! इतिहास हातांत घेऊन वांचूं लागलों तर त्यांत काय दिसून येतें? कांहीं पानांत अघोर रणकंदनांसंबधीं लिहिलेलें सांपडेल; कांहीं पानें रक्तपात, राजद्रोह, राज्यापहरण यांच्या भयंकर व रोमांच उठविणाऱ्या वर्णनानीं भरलेलीं अशीं दृष्टोस पडतील. गिझनीच्या महमदानें हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, व सोमनाथा सारख्या शहरांतील प्रेक्षणीय देवादिकांच्या मुर्तींचा विध्वंस करावा, क्लैव साहेबानें तांबड्याचें हिरवें व हिरव्याचें तांबडे करून उमीचंदास कित्येक लाखाची टोपी घालावी, गादी मिळण्यासाठीं औरंगजेबानें आपल्या जन्मदात्या पित्यास व आपल्या बंधूस कारागृहांत ठेवावें, आपल्या नवऱ्यास राज्यपद मिळावें ह्मणून आपल्या सुशील पुतण्यास आनंदीबाईनें यमसदनास पाठवून द्यावें, राज्याभिषेकाचे वेळीं आपले वर पूर्ण करून घेण्याची संधी हीच असें समजून कैकयीनें मंथरेच्या सांगण्यावरून दशरथाला रामास वनवासांत पाठविण्यास लावावें, इत्यादि गोष्टिचा गुणानुवाद " हा दुष्टभाव " ह्मणून जो आहे तो नसतां तर ऐकावयास सांपडला असतां काय? सारांश इतकाच कीं, इतक्या पुराणप्रसिद्ध गोष्टी असून त्या आह्मालां कळत नाहींत. आणि ह्मणून सिद्ध पुरुषांनीं जीं लहान लहान वचनें लिहिलेलीं आहेत त्यांचे आम्हाला महत्व समजत नाहीं. हरघडी आमच्या हातुन किती चुका होतात. हजारों वेळां आह्मी मुर्खपणाचीं कृत्यें करतों. आतां व्यवहार कार्यांचे जे नियम आहेत ते आह्मांस माहीत नसतात ह्मणून आमचे हातून अशा पाजीपणाच्या व अक्कलशून्यतेच्या गोष्टी होतात कीं काय! नाहीं त्या पौराणिक व ऐतिहासिक सर्व गोष्टी आह्मास अवगत असतात. परंतु प्रसंगीं आह्माला त्या गोष्टींचें विस्मरण पडतें. तेवढ्या वेळे पुरतें त्या गोष्टींचें आह्मास भानच रहात नाहीं. आणि ह्मणून " व्यवहार नियमांचा " लहानशा चुटक्यांत ज्यांनीं गोषवारा आणून ठेविला आहे त्यांनीं जगावर एक उपकारच करून ठेविला म्हणावयाचा. कारण ते चुटके किंवा तीं वचनें तेव्हांच ध्यानांत रहातात, मनांत ती चांगलीं ठसतात व नेहमीं जरूर लागतें ह्मणून ती वाटेल त्या वेळीं बिनचूक आपल्या डोळ्या पुढें उभीं रहातात.

( पुढें चालेल )

वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध १५ शके १८१४

वऱ्हाड प्रांतांत आठ मुनसिपालिट्या आहेत. त्यांची व्यवस्था फार मोठी वर्णन करण्या सारखी नाहीं तरी वाशिम खेरीज करून इतर ठिकाणच्या मुनसिपालिट्यांची स्थिती समाधानकारक आहे. या सर्व मुनसिपालिट्यांत साल गुदस्ता एकंदर ३२ लोकनियुक्त सभासदांच्या जागा रिकाम्या होत्या त्या भरण्यासाठीं लायक असे मताधिकारी लोक

६०७६ होते. मुनसिपल हद्दींतील लोकसंख्या १३१५६९ आहे ह्मणजे सरासरी २१ मनुष्यांमध्यें एक मताधिकारी इसम असतो. सभासद होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांस मतें देण्या साठीं १४२० लोक गेले होते. आणि त्यांत आकोला मुनसिपालिटी विषयीं लोकांची फार अनास्था दिसून आली. ११९३ मताधिकारी इसमामध्यें फक्त १३९ जण आपापलीं मतें नमूद करण्यास मुनसिपाल कचेरींत जमले होते. ही संख्या अगदीं स्वल्प असून आकोल्या सारख्या शहराला शोभणारी नाहीं इतकेंच नाहीं तर लाजीरवाणी आहे. बंगालचे लेफ्टनंट गव्हरनर सर चार्लस इलियट यांनीं गुदस्त सालीं आपला अभिप्राय मुनसिपालिटीच्या संस्थेवर दिला होता कीं मत देण्यास जाणाऱ्या लोकांचा समूह एवढा छोटा असतो कीं सभासद निवडण्याचा जो अधिकार सरकारनें दिला आहे त्याची मातबरी लोकांस कळलेली नाहीं. आणि जेथें जेथें निवडानिवडीच्या प्रसंगीं बहुत लोक जमतात तेथें तेथें फार वेळां शहाणपणा व सार्वजनिक उद्योगाचें स्वरूप हीं लक्ष्यांत आणून सभासदांची निवड होत नाहीं. या दोहों पैकीं पहिला अपवाद अकोल्याच्या संस्थेस लागूं पडतो ह्मणून दिलगिरी वाटते. निवडणुकीच्या संबंधानें असा सुमार प्रकार आहे तरी मुनसिपालीटीचे सभासद एकंदरीनें उत्तम रीतीनें व कसोशीनें आपापलीं कामें बजावतात त्यावरून आनंद मानण्यास जागा एवढीच कीं निवडलेले सभासद चांगले लायक, हुषार व अनुभवी असे असतात.

## वऱ्हाड शाळा खातें

ह्या शाळा खात्याच्या १८९१-९२ सालच्या वार्षिक रिपोर्टाची एक प्रत मामूल वहिवाटी प्रमाणें आमच्या कडे आली आहे, तिचा आम्ही आभार पूर्वक स्वीकार करितों. राव बहादुर श्रीराम भिकाजी जटार यांच्या देखरेखी खालीं हें खातें असल्या मुळें ह्याची व्यवस्था कशा प्रकारची आहे हें समजून घेण्याची इच्छा होणें आमच्या प्रांता बाहेरील मराठी वांचकास अगदीं साहाजिक होय. व प्रांतांत नेटिव्हाच्या अधिकारांत असें एवढेंच एक खातें असल्या कारणानें येथील मराठी वांचकास त्याची माहिती करून देणें अवश्य आहे.

रिपोर्टाच्या सालांत वऱ्हाडांत १३२२ शाळा होत्या म्हणजे ३८ शाळा मागील सालापेक्षां अधिक स्थापाव्या लागल्या, व १०५ शाळा स्थापन करण्या सारखीं गावें शाळे वांचून आहेत. ह्या सालीं बहुतेक प्राथमिक सर्व शाळा लोकल बोर्डाच्या ताब्यांत दिल्या आहेत. म्हणजे सरकारनें पैशाच्या बाबतींत सर्व ठिकाणीं काटकसर करण्याचा जो सपाटा चालविला आहे त्याचीच ही छाया होय ह्या व्यवस्थेनें वरील १०५ गांवांस लवकर शाळा मिळतील अशी आशा करण्यास मात्र बरीच जागा आहे. प्रांतांत ४९४१५ मुलें व २०६८ मुली मिळून ५१४८३ विद्यार्थी ह्या सालीं शिकत होते व त्यांच्या करितां एकंदर ४२५८८८ रुपये खर्चीं पडले. हा खर्च उत्पन्ना पेक्षा सुमारें अठरा हजारांनीं अधिक असल्या कारणानें शिलकेस हात लावावा लागला ह्या बद्दल कमिशनर साहेबांनीं नाखुषी दर्शविली आहे परंतु प्राव्हिन्सियल फंडांतून सहा हजार रुपये कमती येण्याचें कारण मात्र कोठें दिलेलें दिसत नाहीं. तसेंच म्युनिसिपल कमेट्यांचें उत्पन्न सुमारें पंचवीस हजारांनीं वाढलें असून विद्या खात्याकडे त्या प्रमाणानें त्यांच्या कडून अधिक मदत न होतां गतसाला पेक्षां ६३ रुपयांनीं कमीच खर्च करण्यांत आला आहे.

रिपोर्टाच्या सालीं आकोला हायस्कुलातून म्यॅट्रीक्युलेशनच्या परीक्षेस गेलेल्या ११ मुलां पैकीं ५ मुलें पास झाल्या कारणानें रेसिडेंट साहेबांनीं प्रांतांत एकच हायस्कूल ठेवण्याचा विचार करण्या बद्दल सूचना केली आहे. एकंदर म्यट्रिक्युलेशन परीक्षेच्या निकालाशीं ताडून पहातां आकोला हायस्कुलच्या ह्या परीक्षेचा निकाल चांगलाच म्हणावा लागेल. एक वर्षीं मुलें कमी पास झालीं म्हणून—मागल्या सालीं तेरा पैकीं दहा पास झालीं होतीं— शाळा कमी करण्याचा विचार चालावा हें मोठें आश्चर्य आहे. मुलें कमी पास होण्यास शाळेची इमारत अथवा जमीन कारण झाल्याचें कोणाच्याही ऐकण्यांत नसेल. शिक्षणांत कसूर होत असेल तर, वरील एखाद दुसरा मास्तर गैरवाकब गार असेल तर किंवा दुसऱ्या अशाच कांहीं कारणानें नापास संख्या विशेष असणें संभवनीय आहे. बाकी काटकसरीच्या शशीमिऱ्या पुढें सारासार विचाराला हेलकावे बसावयाचेच. लोकांनीं उच्च शिक्षणाचा एखादा तरी वर्ग प्रांतांत पहाण्याची आशा धरावी आणि सरकारानें दोहों पैकीं एका हायस्कुलास रजा देण्याच्या विचारांत असावें ! ह्या शाळेच्या खालील वर्गांतील पास होणाऱ्या मुलांची संख्या समाधान कारक आहे हें येथें सांगणें जरूर आहे. ह्या शाळेस लागून असणाऱ्या बोर्डिंग हौस मध्यें रहाणाऱ्यांची संख्या ही फार कमी आहे. विद्ये संबंधीं हरएक कामांत पुढें असलेल्या आकोले जिल्ह्यांतील हायस्कूलाची अशी शोचनीय स्थिति असावी ह्याचें कारण, लोकांची उदासीनता खरोखर नसली पाहिजे. बोर्डींग सारख्या संस्थेची व्यवस्था दक्ष मास्तरा कडे राहणें फार अवश्य आहे. बोर्डिंग हौस पाशीं एखाद्या शिक्षकाची राहण्याची सोय करण्याचा विचार स्तुत्य आहे व तो जितका लवकर अमलांत येईल तितका बरा.

वऱ्हाडांत एक ट्रेनिंग कालेज आहे. तें ज्या धाटावर एकदा स्थापन झालें आहे तो त्याचा थाट अजून कायम आहे मराठी भाषेस नांवारूपास आणण्याचा प्रयत्न प्रांता बाहेर जारीनें सुरू असतां रावबहादुरांनीं आहे तेंच सुरळीत चालविण्याची रीति ह्या कामांत तरी कां बदलूं नये, हें समजत नाहीं. पुण्यातील ट्रेनिंग कालेजा सारखा अभ्यास क्रम येथें चालू होण्यास जरी प्रस्तुत बऱ्याच अडचणी आहेत तरी सुधारणा करीत गेल्या खेरीज पाऊल पुढें कसें पडणार?

ह्या प्रांतांत ३६ लायब्रऱ्या आहे पैकीं १७ आकोल्या जिल्ह्यात आहेत. आकोला व उमरावती येथील लायब्रऱ्या चांगल्या स्थितींत आहेत आकोल्यातील लायब्ररीस १० रुपये म्यूनिसिपल कमेटी कडून दरमहिना मिळतात व उमरावती २५ मिळतात हा फरक कां? बुल्ढाण्याच्या लायब्ररीस २०० व चिखलीचीस ११० रु. दरमहा मिळतात आकड्यांत चूक नसेल तर आकोला व उमरावती म्युनिसिपाल कमेट्यांनीं इकडे लक्ष पुरवावें अशी आमची त्यांस विनंती आहे.

नेटिवांच्या हातून जबाबदारीचीं कामें कशीं नेटतील ह्याचें उत्कृष्ट उदाहरण दाखविण्यास आह्मांस फार लांब जावयला नको. येथें जे प्रत्येक खात्यावर निरनिराळे अधिकारी आहेत त्या सर्वांपेक्षां राव बहादूर श्रीरामभिकाजी जठार हे आपल्या कामांत पूर्ण वाकबगार असल्या बद्दलचे दाखले रेसिडेंटा कडून मिळाले आहेत ह्या बद्दल आह्मां सर्वांस अभिमान आहे हें येथें सांगितलेंच पाहिजे असें नाहीं.

---

बंगाल सरकारनें ज्यूरीची न्यायपद्धति बंद केल्या विषयीं हुकूम फिरविला आहे. त्यांत सर चार्लस इलियट लेफटनंट गव्हरनर यांनीं तो हुकूम काढिला आहे आणि व्हाइसराय लार्ड लान्सडाऊन यांनीं त्याला आपली पूर्ण संमती दाखविली आहे तरी 'बेंगाली' पत्रकर्त्यांस अशी बातमी लागते कीं हें सर्व कारस्थान सर फिलिप हिचिन्स कायदे कौन्सिलदार यांचें आहे आणि ते त्या कामांत पुढारी नसते तर या पूर्वीच हा हुकूम रद्द करण्यांत आला असता. परंतु सर फिलिप यांचा बाणा कडक व्रताचा असून त्यांची वक्र दृष्टी ज्यूरी पद्धतीवर आहे. आणि त्या शिवाय सर आलेक्झांडर मिल्लर यांनीं थोडे दिवसापूर्वी उमरावतीस बोलून दाखविलें कीं विलायतेंतील जूरीची रीत मला कबूल नाहीं कारण साधारण मनुष्य जो जूरर म्हणून नेमावयाचा असतो त्याला कायद्यांतील विशेष भानगडी माहीत नसतात आणि त्या बेळेवर समजून घेण्या सारख्या ही नसतात. सर अलेक्झांडर अगर सर फिलीप कांहीं ही म्हणोत व सांप्रतच्या ज्यूरी मध्यें किती ही दोष आढळोत तरी आम्ही पक्के समजून आहों कीं ज्यूरीचा हक्क काढून घेणें किंवा तो परत देणें इंडियात फार सोपें आहे खरें परंतु तीच गोष्ट त्यांनीं विलायतेंतील जुरीची पद्धत बंद करण्या विषयीं काढली असती तर त्यांची त्या सूचने बद्दल चांगली शोभा व पूजा झाल्या शिवाय राहिली नसती आणि राहणार नाहीं.

बंगाल्यांत चोहोंकडे गडबड व धांदल उडाली आहे, सभावर सभा त्या हुकूमाविषयीं प्रजेची अमान्यता दाखविण्या साठीं भरत आहेत, आणि हिंदुस्थान सरकार जर गाऱ्हाणें ऐकणार नाहीं तर पार्लमेंट पर्यंत या प्रकरणाची दाद मागण्याचा सर्व जनसमूहाचा विचार ठरला आहे हें पाहून संतोष वाटतो. प्रयत्न करणें मनुष्याचें कर्तव्य आहे आणि यश देण्यास परमेश्वर समर्थ आहे. नेटिव लोक नवे नवे हक्क व अधिकार मागतात तेव्हां त्यांचीं तोंडें बंद करण्याची ही कृति असावी असा कित्येकांचा तर्क आहे जो हक्क व अधिकार दिलेला आहे तोच काढून घेण्याचा मार्ग स्वीकारला ह्मणजे परिणामीं तो कायम राखतां राखतां नेटिवाचे परिश्रम, धनव्यय, आर्जव, शक्ति हीं भिन्न दिशेला वळवीं जातील आणि तेणे करून राष्ट्रीय सभेची लटपटपंची अशा विघ्नानीं तहकूब राहील असा ज्यूरीच्या ठरावाचा हेतु असावा असें दिसतें.

## राष्ट्रीय सभा

( आठवा सभारंभ )

अल्हाबादेस पूर्व संकेता प्रमाणें या सभेस गेल्या बुधवारीं प्रारंभ होऊन सभेचीं सर्व कामें निर्विघ्नपणें व शांतपणें शेवटास गेलीं. या सभेचें कार्यपत्रक मागील सर्व बैठकी पेक्षां फार महत्वाचें व विचाराचें आहे. सभेचें शहर लांब असल्यामुळें माहिती अपुरी व उशीरा मिळाली व वर्तमानपत्राची जागा नियमित आहे ह्मणून राष्ट्रीय सभेची हकीकत पुढील अंका पर्यंत तहकूब ठेवणें आह्मास भाग आहे.

स्वागत मंडळीचे अध्यक्ष पंडित विश्वंभर नाथ आरंभीं जमलेल्या बंधुभगिनीचें अत्यपूर्वक आभार मानतांना अत्यानंदाच्या लहरींत बोलले कीं मी जरी मादक पदार्थांचें सेवन न करणाऱ्यामध्यें निस्सीम भक्त आहे तरी या समयाचा आनंद स्फूर्ती, उदात्त विचार यांनीं मी इतका गुंगून वेडावलो आहे कीं जमलेल्या लोकांची ही भरत भेट मला मोह पाडते. हर्षभरित व सद्गदित अंतःकरणानें त्यांनीं मंडळीचे आभार मानले त्यांचें सर्व भाषण मोठ्या आवेशाचें जोरदार व रसभरित असें झालें. त्यांच्या मागून मि. आनंदा चार्लू व मि. वाचा यांच्या सूचने वरून मि. उमेशचंद्र बानरजी यांनी अध्यक्षस्थान स्वीकारलें. त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या सप्तवर्षीय चक्राचा हा दुसरा फेरा आहे असें सांगून राष्ट्रीय सभा ही व्यक्तिचाच नसून सर्व ब्रिटिश राज्याच प्रभाव आहे असें ह्मटलें. ब्रिटिश विद्यागुरूंनीं विद्यामृत पाजलें व राजनीति शिकविली, ब्रिटिश इंजिनियरांनीं इंग्लंड व इंडिया य मधील अंतर नौकासाधनांनीं नाहींसें केलें, ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं इकडच्या मालास तेज आणून दिलें, ब्रिटिश ग्रंथकर्त्यांनीं इंडियांतकाय काय वस्तु पिकतात तें कळविलें आणि ब्रिटिश सभ्य गृहस्थांनीं अभिमान व स्वतंत्र विचार हे शिकविले—आणि येणें प्रमाणें हे सर्व कारणसमुदाय एकत्र जुळून राष्ट्रीय सभा उत्पन्न झाली आहे. राष्ट्रीय सभा सामाजिक विषयांच्या विचारास प्रतिकूळ नाहीं आणि तिच्या सभासदांची जात, धर्म, व आचारविचार यांच्या भिन्नत्वामुळें मागाहून सामाजिक विचार याच मंडपांत स्वतंत्रपणें व समतोल विचारानें होत असतात. नंतर त्यांनीं पंडित अयोध्यानाथ मि. रामस्वामी हे गृहस्थ राष्ट्रीय सभेचे कट्टे भक्त कसे सुविचारपूर्वक झाले याच वृत्तान्त कळविला. आपल्या मागण्या प्रमाणें कायदे कौन्सिलाचा कायदा झाला नाहीं. तरी तत्वतः त्याच्यामध्यें आपल्यामागण्यांच समावेश होत आहे ह्मणून आण त्याचे अमलबजावणी व्हाइसराय साहेबांच्या हातून नीटशी होईल अशी योजना केली पाहिजे. नामदार दादाभाई नवरोजी येथें येऊं शकले नाहींत तरी निवडणुकीच्या तंट्यांत त्यांच विजय झाला या बद्दल आपण फिन्सबरीच्या मतवाल्या लोकांचे आभार मानले पाहिजेत. नंतर त्यांचें भाषण सांप्रत निघालेल्या जूरीच्या हुकूमा संबंधानें झालें तें फारच मुद्देसूत, विचारानीं भरपूर आणि वीरश्रीचें झालें. 'बाबू इंग्लिश' ह्मणून जे परकी लोक आपली इंग्रजी भाषेच्या ज्ञानाविषयीं थट्टा व उपहास करितात त्यांना त्यांनीं धर्षणयुक्त अव्हान केलें कीं त्यांनीं आपल्या तोंडीचे कांहीं लेख द्

[illegible] लिहून दाखवावें. येणें प्रमाणें सं-[illegible] एक कमिटी नेमून सभेच्या [illegible] विषया संबंधानें काय तिज-[illegible] आलें.

पंजाबच्या लोकांचा आग्रह व मानसकार फार दिसला म्हणून सर्व लोकांनीं पुढील सा-लची राष्ट्रीय सभा अमृतसर येथें भरविण्या-चें ठरविलें. अद्यापपर्यंत त्या भागाला बैठक झाली नव्हती तव्हां ही नवी योजना सर्वो-त्कृष्ट झाली.

# The Berar Samachar

MONDAY JANUARY, 2 1893.

In his memorable Congress circular of 16 th February, 1892 Mr. Hume solemnly affirms that the sting of poverty and starvation is felt in every domestic circle and that it is difficult to say what may happen unless and until the British Government takes prompt, wise and liberal steps to avert the impending calamity. It is formal and customary to doubt the very existence of such an appalling & pitiable condition of the people. These doubtings and questionings are left in the back-ground altogether when we meet with straightforward, direct, and affirmative assertions quoted with numerous statistics in annual administrative reports. In Berar, if nowhere else, the reports carry a tale which other provinces will certainly envy. The one moral of revenue and trade reports is that the revenue is paid without difficulty, trade is assuming vast dimensions and the people are happy and prosperous. This epitome of official statements our experience belies. The general impression of progress and prosperity is far from being true. It does not hold water in the face of stern facts. We see the masses as a whole to live from hand to mouth. They continue life on half a meal even and that too a coarse one without ghee and sugar. The scale of life is low and trifling and the struggle for bread is still keen and desparate.

The province is purely agricultural and therefore the state of an average peasant is most typical and normal. The economic position of the agricultural classes and their mutual relations are every thing but satisfactory. The agriculturist is born to the status of his father. The implements and tools of husbandry, the little plot of land and the small cottage form the whole of his estate. Education presents him no good points of special merit. Even if he be taught some few standards he takes up work in the field and bids good-bye to his little knowledge of reading and writing. Some ten or twelve years before, the produce in the field was stored in his granary and it afforded him and his family food and clothing sufficient for his wants. Of course he is not the wisest being. He has [illegible] ideas of merriment, religious festivals, and joyous nuptial feasts. [illegible] he lived beyond want, his [illegible] to seek pleasure and amuse-[illegible] forces him to borrow gold and [illegible]. The Marwari has his bank [illegible] by. The rate of interest is rampant and usurping. He is then much in the books of money-lenders. The rent of his field is the first and formost charge. The Govt. knows no mercy and must be paid somehow at any cost whatever. The Marwari is more or less ready to advance money for seed, rent and provisional expenses till the harvest. The debts go on increasing and each year the peasant is less and less able to pay it off. The land must be sold when his Shylock presses him with his demands. The source of life-long maintenance passes into other hands and the Kunbi is a pauper. He with his family has to work hard in a field that may be let to him at a rack-rent. Happily the rains are seasonable and sufficient and there are hardly times of scarcity and famine He learns the sad experience of living within his means and learns it when he has lost all points and has nothing at stake. The process from debts to bankruptcy is not so simple as we have described. The lawyer has his own share and the Government dues in the shape of stamps, registation fees, and the costs of suits add to the debts and hasten the loss of land—the only resort available for food. We have all the while suppsed that the Kunbi lives in perfect harmony with the members of his family. He has however his trouble in the household itself. The partition and division of the family property is not the single evil. Many suits are to be fought before a right to it is claimed. The old ways of honesty and truthfulness are no more. Evidence lawyers dictate him to produce and he has to tutor, suborn and win witnesses to his side. The game is thus open and the pleaders who live upon the frauds and follies of others do not hesitate 'to fish in such troubled waters' The pleader makes the most of quarrels between parties. The Kunbi has in short three races to run before he is a slave and nothing more than that. He has to pay his debts, defray the Governments dues and buy dearly the privileges of laws and justice.

We have thus mentioned three classes that the grow rich out of the Kunbi's earnings. The gains of Government are sufficient to continue a large expensive administration. The Marwari and the pleader have undone the blessings of the ryotwary system They are masters of fields and live like Jamedars with peasants for their tenants They extort from the tenants the double, treble, quadruple and even quintiple of the rental assessment. We have however omitted to name a certain class of traders that makes a lot of money. The exports of grain from the province is facilitated by railways, European merchants and the native dealers who buy wheat, cotton and linseed to be sent to the sea—port towns. These drains deplete the provinces of the harvest produce, the prices of food grains rule high and the people are thereby more or less starved.

The money-lender, pleader, and exporter of grain are the gainers in the long run. They do not advance an iota of the national wealth. They take the lion's share of the earnings of the typical kunbi named above and the Govt. is not without its taxes for the management and control over the dealings of the three classes of people just stated. We can now answer the question who are rich, happy and prosperous and ascertain as well the poverty of the masses at large. Mr. Hume has said the same thing over and over again. He has moreover shown that the people of the land have no share in the administration while they have to pay for it.

Mr. Dinsha Edulji Wacha a well known Congress—leader has recently issued a pamphlet on the poverty—problem which was last year mooted by Mr. Hume. He has quoted statistics from the govt. documents, reproduced the select and well—balanced opinions of eminent administrators, and asked the Govt. to be wise from the past experiences of the best of gentlemen who had to govern provinces and presidencies. It is useful and instrctive to read and diget the forecast of Mr. Wacha. He sounds again the same note of alarm which Mr. Hume did last year. Mr. Wacha's conclusion is: "The deteriorating condition of the masses is a dismal fact. It is a stern reality. It is the skelton in the bureau of the mighty Government of India, because it is the great inevitable internal danger to which the empire is exposed—a danger which is sooner to overwhelm it than any external aggression of the character which with the official jingoes and their inspired organs from time to time pretend to threaten us. From the accompanying tabies A. and B. the careful reader who is intent on ascertaining the fact, whether the condition of the masses at present is worse or better than what it was in 1880, will perceive, that while on the one hand the density of the population has increased, there has been no corresponding augmentation of the area under food crops." Failing any speedy and thorough reform, Mr. Wacha apprehends that the sagacious forecast of Dr. Giffin will come to pass, and this forecast is, "that in India, from decade to decade larger and larger masses of the semi-pauperised or wholly pauparised, the landless classes, will grow up, requiring state subventions to feed them, and threatening all attempts to reform Indian finances, while raising social and political difficulties of the most dangerous kind". The last prediction does not seem to differ very much from the prediction for which Mr. Hume was so severely taken to task.

## वऱ्हाड

हवामान—या आठवड्यांत थंडी कमी होत होत दोन दिवस आरंभीं किंचित् पाऊस ही पडला. पण हल्लीं पुन्हां हवेचें तें मान पालटून थंडी चांगली पडूं लागण्याचा रंग दिसतो. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं. बाजारभाव तेजीचे आहेत.

कर्नल मेकंझी कमिशनर साहेब यांचें ठाणें आकोल्यास बरेंच दिवस राहिलें. मध्यंतरीं नाताळच्या रजेंत गेल्या ३० वे तारखेस यांच्या कन्येचा विवाह लेफटेनंट हार्सबरो आसि. कमिशनर बुलढाणा यांच्यांशीं मोठ्या थाटानें झाला. पाहुणे मंडळी प्रांतांतून व बाहेरून पुष्कळ जमली होती.

उमरावती पासून एका मैलावर एका हिंदुबाईचें छिन्नविछिन्न धड सांपडलें आहे डोकें कोणी कापून नेलें आहे. या खुनाचा अद्याप पत्ता नाहीं.

चांदूर तालुक्यांत एका इसमानें एक औरत बरेच दिवस ठेविली होती. गेल्या पंधरा दिवसांपूर्वीं त्या इसमाला काय चीड व उपरति झाली असेल ती न कळे. त्यानें तिला पुरून ठेविलेलें द्रव्य काढण्याची थाप देऊन जंगलांत नेऊन ठार केलें. तो गुन्हा कबूल करितो.

नेर पिंगळाई ता० मोर्शी येथें एका कानस्टेबलानें अंगारपच्या विकणाऱ्या मुसलमानास तंब्याखमध्यें लाथा मारून यमसदनास रवाना केलें. पोलिसांतील शिपायांनीं अघोर कृत्यें न करण्याविषयीं खबरदारी घ्यावी.

आज रोजीं येथे लोकल बोर्डाची सभा असून खुद्द कमिशनर साहेब त्यावेळी येणार आहेत.

रा. रा. केशव नारायण शेकदार क्लार्क डेपुटी इनस्पेक्टर वाशिम यांनीं तेथील लोकल बोर्डातील कारकुनाची जागा पतकरली आणि त्यांच्या जागीं शिरपुरचे हेडमास्तर रा. रा. गोपाळ नारायण यांप नेमलें.

नादारी मुकदमानंबर ३१ सन १८९२
नमुना ( जी )
विद्यमान नादारी कोर्टाचे नडज्य जिल्हे
वाशीम

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं, हाब राजी वल्द मनाजी राहणार इंझोरी तालुके मंगरूळपीर हा नादारी आहे करितां असा आज तारीख २३ माहे दिसेंबर सन १८९२ इसवी रोजीं नादार ठरवावे म्हणोन अर्ज दिला त्याची चौकशीची तारीख २८ माहे जानेवारी सन १८९३ हा दिवस नादाराचे सावकारानीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसाईनी नेमुन देण्याकरितां व नादारानें आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमला आहे. सदर्हु नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या श्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्स काढण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या श्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरें असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी. ह्मणजे ते दावे रजिष्टरीं दाखल होतील. तारीख २३-१२-१८९२ इ०

( सही ) अंबादास संतो
सिव्हिल जज्ज आणि नादारी कोर्टाचे जज्ज

### नोटीस

रा. रा. गणु केशव ठाकूर मुक्काम कसबे मांडवड ता० नांदगांव जिल्हे नासिक यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यास येतें कीं, तुह्मी बापु माहादु व दादा ठाकूर वस्ती मांडवड यान पासून सदरहु गांवची सर्वे नंबर १०९, २००, १८६, १३७, ३१९, ३६९, ३२२, ८२, ९३, चीं शेतें व एक घर खरेदी घेतल्याचें समजतें. हें खरें असेल तर तुम्हास असें कळवितों कीं, सदरहू मिळकत वर लिहिलेले बापु, महादु व दादा यांणीं मुद्दल १५०० रुपयांत आह्मास तारणगहाण लिहून दिलें आहे व हें गहाण आपल्या खरेदीच्या पूर्वीचें आहे. करितां या कर्जाचा बोजा आपल्या वर आहे. व हें गहाण सोडविण्याचा हक्क आपल्याकडे आला सबब ही नोटीस दिली आहे आपल्यास कळावें. ता० ३१।१२।९२

सही

बाळकृष्ण हनमंत गंधे व यशवंतराव हनमंत गंधे.

## वर्तमानसार.

दरोडे व लुटालूट यांच्या संबंधानें काठेवाडांत त्रास देणारी जी बाहारवती जातीच्या लोकांची एक टोळी आज कित्येक दिवस पुढें आली होती त्या टोळीशीं काठेवाडचा असि. पोलिस सुपरिंटेंड ले. गार्डन यांनी चिखली येथें सामना केला व कडक लढाई होऊन त्यांत दंगेखोरांचे बारा लोक ठार केले, पण ले. गार्डन व दुसरे दोन नेटिव आफीसर हेही ठार झाले व तीन स्वार जखमी झाले. आतां त्या दंगेखोरांचा पुरता पाडाव करण्याकरतां जास्त तजवीज करण्याचे इलाज चालू आहेत.

काठेवाडांतील दरोडखोरांवर हल्ला करण्यास गेलेले ले. गार्डन हे मारले गेल्यानें आपणास फार वाईट वाटत आहे असें गव्हरनजनरल यांणी मुंबईच्या गव्हरनरांस तारेनें कळविलें आहे.

लुशाई लोकांची सरहद्द कायम करण्याचा विचार करण्याकरतां आसामचा चीफ कमिशनर मि० वार्ड हा कलकत्यास आला आहे.

ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवर कचीन लोकांनी जी गडबड चालविली आहे ती जास्त होऊन कांहीं चकमक होणार असें दिसलें. गेल्याच्या मागच्या सोमवारीं एक लढाई होऊन त्यांची कांहीं ठिकाणे इंग्रजी फौजेने हिसकूनही घेतली आणि त्यांत कांही लोक घायाळही झाले.

महुच्या छावणीजवळ तोफखान्याची कवाईत होत असतां अपघात होऊन दोन माणसें ठार झालीं.

दिल्लीं व भाटिंडा यांच्या दरम्यान रेवले करण्याचा अदमास चालला आहे.

नेपाळचे दिवाण कलकत्यास आले व तेथून हिंदुस्थानांतील कांहीं ठिकाणे पाहाण्यास जात आहेत. हिंदुस्थानसरकाराकडून त्यांचा हिंदुस्थानांत चांगला सत्कार होत असून त्यांच्या तैनातीस किंवा त्यांच्या चलनवलनावर नजर ठेवण्यास सरकारानें एका गोऱ्या कामदाराची नेमणूक केली आहे.

डेरा इस्मायलखान येथून गोमाल खिंडीत जाण्याकारतां एक नवा रस्ता तयार करण्यांत येत आहे.

पामीरवर स्वारी करणाऱ्या रशियन टोळीवर हजारों चिनी लोकांनीं हल्ला करून त्यांस परगणा येथें गराडा घातला होता, पण पुढें काय झाले तें समजलें नाहीं.

मेटकिना येथें जो चीन लोकांनीं हल्ला केला त्यांत त्यांणी एक नेटिव आफीसर व शिपाई यांस ठार केले व त्या शहराचा कांहीं भाग जाळून टाकला व त्यांत कोर्टाची इमारतही जळाली असें अलहाबादची तार सांगत्ये.

टॅगर किल्ला व डिसगिरी यांच्या दरम्यानचा तारायंत्राचा फाटा कायम ठेवण्याचा हुकूम झाला आहे. इंग्रजसरकाचा चित्रळ येथील एजन्ट जमादार रमनवानखान लिहितो कीं, अफझूल मेल्याची गोष्ट खरी असून शेर याच्या बरोबर अगदींच थोडे अफगाण होते व तेही रेग्युलर फौजेंतले नव्हते. मी अमिराचा नोकर असें त्याणे लोकांस सांगितल्याचें खरें असून हल्लीं तो फरारी आहे.

ठा० अ०

तापावर कोयनेल प्रशस्त असल्याचें ठरलें आहे. सध्यां तें औषध सरकार आपल्या नजरेखालीं तयार करुन त्याची विक्री टपालखात्यामार्गे करण्याचे घाटत आहे. मिठाची विक्री सध्यामे त्याच खात्याकडून होणार म्हणतात जर हातावरसच्या लोकांकडून सक्तीने कामे करून घ्यावयाची तर त्यांच्या पोटाची तजवीज नीट ठेवावी हें बरें, आलिकडे पोष्टाकडे असलेल्या नोकरास वेळच्यावेळीं टपालरवानगी शिवाय मनिअर्डर तार, ब्यांक वगैरेची कामें करून बेजार झाले असून त्यातल्यात्यांत दुसरी कामें देणे जुलमाचे होईल. पगार वाढवून अधिक मदतगार देऊन कामें घेतल्यास आमचे कांहीं ह्मणणें नाहीं. पण फॅक्टरीमध्यें पाच तासावर अधिक काम घेता येऊं नये असा निर्बंध ज्या तत्वावर झाला तोच कायदा येथें कां लागु करूं नये असा प्रश्न केल्यास पुढें वाट कशी?

मनुष्याच्या रक्तांत लोखंड असतें असें एका डाक्टरानें खास प्रमाणें काढून प्रसिद्धीत आणलें. आलीकडील लोकांस ही कल्पना नवी वाटेल पण हिंदुशास्त्रज्ञ लोकांस ती गोष्ट अनादी काळा पासून ठाऊक आहे ह्मणूनच हिंदुस्थानीं लोक रक्ताला (लोह) ह्मणतात. हिंदु शास्त्रांत शरीरास पृथ्वीची उपमा दिली आहे यांजवरून शरीराच्या भागांत सर्व प्रकारच्या धातू निरनिराळ्या ठिकाणीं असल्याचे सिद्ध करून दाखवितां येईल. अशिरगडावर एक साधु रहात असे त्यानें दाखविलेल्या प्रयोगावरुन खात्रीनें सांगतां येते कीं, पृथ्वीत जेवढे ह्मणून पदार्थ आहेत तेव्हढे सर्व प्रत्येक जिवांत सापडतात. अशी एक वस्तु पृथ्वीत नाहीं की, जी शरीरात नाहीं. "जे पिंडी तेच ब्रह्मांडी" डोंगर, सूर्य, चंद्र, तारे, गुहा, शेतें, नद्या, जीव पंचमहाभूतें येथच्छ पृथ्वीवर व्यवहार करतात तोच व्यवहार शरीर रचनेत हुबेहुब दृष्टीस पडतो हा सर्व देखावा शरीरयात्रा करणारांच्या नजरे पुढें जसजसा येत गेला तसतसा तो अधिक शोधांत लागून योग साधनानें योग्यास परमात्म्याचे सुद्धा दर्शन झालें आहे ह्मणून हिंदुधर्म अनादि.

काश्मीरांत दुर्भिक्ष्य झालें आहे.

लाहोरास देवींची साथ आली तेथे धरणीकंपाचा धक्का बसला.

रशियन मुलखांत इन्फ्लु इंजा रोग पैदा झाला आहे.

नेपाळचे प्रधान व सेनापति यांस लाहोरास सत्वर येण्याविषयीं आज्ञापत्र गेलें आहे.

हिंदुस्थानांतील तुरुगांत कुल ८६९०२ कैदी आहेत.

काळे पाण्यावर पाठविलेले हिंदुस्थानांतील कैदी लोकांची संख्या १२६१९९२ आहे.

मा० मि०

अशुभचिन्हः- बंगाल्यांतील वर्तमान पत्राचें स्वातंत्र्य नष्ट करणारा कायदा करण्याचें सरकारांत घाटत आहे. निकाल ठरलेलाच आहे.

व्हिएन्ना शहरांत साठ हजार लोक काम धंदा शिवाय आहेत. बिचाऱ्यानां एखादें हिंदुस्थान नाहीं?

ज्या जागेंतून विजेचा प्रवाह गेलेला आहे अशा जागेंत जें पीक करावें तें फारच जोराचें येतें असें एक फ्रेंचमन म्हणतो.

न्या० सिं०

कोचिनच्या सरहद्दी बद्दल असलेला तंटा मिटविणें साठीं इंग्रेज सरकारानें आपल्या तर्फे राजा गोपाळा चयारी मलबारचे हेड असि. कलेक्टर यांस कमिशनर नेमिले आहेत.

आगबोट बुडाली– न्युबिअन नांवाची डाकेची आगबोट लंडनाहून केप येथें जात असतां टेगसच्या खाडींत बुडाली. टपाल व उतारू बचावले.

शाहाणी गाय– जबलपूर येथील शुभचिंतक पत्रावरून समजतें कीं, सिहोरा येथें एका खाटकानें ५ रु० स एक गाय घेऊन तिचा वध करण्या साठीं तो पाय बांधून तिला गाडीवर घालून नेत होता. त्या गाईनें सक्रोध होऊन रश्शा तोडून टाकल्या व ती खाटकाच्या पाठीस लागली. खाटकांस पळतां भूय थोडी होऊन तो एका गाडीच्या खालीं लपून बसला. तेव्हां गाय जंगलांत निघून गेली. व तेथें व्याली. खाटकास संताप येऊन तिला गोळी घालून ठार मारावें म्हणून त्यानें डे० कमिशनरांस अर्ज केला. तोच तेथील पोष्टमास्तर मि. खूपचंद यांणीं खाटकाला ५ रु० देऊन त्याणीं खाटकाची तिजवरील मालकी दुर केली. दुसरे दिवशीं ती गाय सवत्स पोष्ट मास्तराचे दारांत येऊन उभी राहिली मास्तरानें तिला चारापाणी खाऊं घातलें, तेव्हां पासून ही गाय प्रती दिवशीं सुप्रभातीं वासरासह पोष्ट मास्तरांकडे येऊन मिळेल ते खाऊन परत जगलांत जाते. लोक ह्या गाईला धरकाप भितात. पण पोष्टमास्तर तिच्यावर लडिवाळपणें हात फिरवितात, व ती सुखाने उभी राहते! गायांस आत्मा नाहीं म्हणणारांनी इकडे पाहावें!

स० शो०

डा० वामन गोपाळ यांचा सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग तसच सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरे औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चेतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जातंतु यांच्यामंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाले असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. डत्रे यांचे दवाखान्यांतव रील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

## जाहिरात

मुलुक अमानी हैद्राबाद यांतील अबकारी (दारू, ताडी (शिंदी), आफू व गज) विक्रीच्या तारखा सन १८९३–९४ साला करितां खालीं लिहिल्या प्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत.

एलिचपूर शिवाय करून इतर जिल्ह्यांत नेहमी प्रमाणें दारू, ताडी (शिंदी), अफू व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

एलिचपूर जिल्ह्यांत ता० १ एप्रील सन १८९३ पासून सदर महालांत सरकारी देखरेखीं खालीं दारू उतरून ठरीव दरानें मक्त्यानें विकण्याबद्दल नवीन योजना (Still head duty, central Distillery and guaranteed minimum revenue system.) अंमलांत आणणें आहे, करितां तेथें फक्त ताडी (शिंदी), अफू व गांजा यांबद्दल मक्ते हरास होतील.

प्रत्येक हरास दिपुटी कमिशनर साहेबांचे कोर्टांत १२ वाजतां होईल.

बुलडाना — सोमवार तारीख १६ जानेवारी १८९३.
आकोला — सोमवार ता० २३ जानेवारी १८९३
वाशीम — सोमवार ता० ३० जानेवारी १८९३
वणी (यवतमाळ) — सोमवार ता० ६ फेब्रुवारी १८९३
उमरावती — सोमवार ता० २० फेब्रुवारी १८९३
एलिचपूर. — सोमवार ता० २७ फेब्रुवारी १८९३

मक्त्याच्या व हरासाच्या शर्तींचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे आफिसांत मिळूं शकेल.

के. जे. एल मेकंजी,
कमिशनर.
मुलुक अमानी हैद्राबाद

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

[illegible] " ३ " ८९
सळअखेर " ७ " १ं८

किरकोळ अंकास ..........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे अत रु० १
पुढें दर ओळी ०१०६
दुसरे खेपेस ......०१

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................1as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition perline 3as

VOL XXII AKOLA MONDAY 9 JANUARY 1893 NO. 2

[illegible] २७ आकोला सोमवार तारीख ९ माहे जानेवारी सन १८९३ इ० अंक २



## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेंचा ऐेक दवा )

क्लेमेंटचें टानिक हें रामबाण, त्वरित, आणि कय ती एक खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जील क्षीणता, शरीराचा न्हास, चेतनाशक्ती हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतीं थकवा, धातुश्राव आणि दृष्ट हवा, मनः क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खेप अगर अविचार या पासून शरीर क्षीण होन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुष आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेल शक्ति येते. कमकुवत मनुष्यास सदृढबळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांधपानें मजबूत व पाणीदार अशातात.

तरुण मध्यम वयाचे, म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणाचे औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुः खड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टा यां पासून ज्यांना विकृति जडतात आ ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणाप्रवृत्ति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें आणून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आलअहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असना त्या न्हासाचीं लक्षणें या औषधानें तत्काळ नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार हो प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें ताकत राखीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, जाचा त्याला भरंवसा वाटेनासा झा, स्वभव अनावर व शीघ्र कोपी झाला, दासीनताव भित्रेपणा वाटला, गुडघे व र थकले छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सलका मारल्या तसेंच पाठीं दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिरुणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पद्मास थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्र शय यांची आग होणें लवकी पांढरि होणें प्रमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कर्मांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टॅानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे. हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूंची जबरदस्त शक्ति वाढविणारे टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञानतूंच्या योगें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोंपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळेंत F. Moor Clements. हीं सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.


## नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १ मि. नंबर १७/१८९२

ने. स्पे अ. कमिशनर साहेब बहादूर जि अकोला यांचे कोर्टांत.

नांव परशराम बापाचें नांव दर्याजी कुणबी राहणार कानलेश्वर ता० अकोला जि० अकोला यांस मयत.

म्हसाजी बापाचें नांव दर्याजी राहणार कानलेश्वर तालुके अकोला जिल्हा अकोला याचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचें द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता० १४ माहे जानेवारी सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयी लेखी हकीकत दाखल करावी.

आज ता. ३ माहे जानेवारी सन १८९३ इ.

Shamsuddin Alikhan.

सिविल ज्यडज्य.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

बडोदा ता. ९ माहे जानेवारी सन १८९३

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

वि. वि. खालील मजकुरास जागा मिळावी. श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज यांचे विलायतेहून राजधानीमध्यें आगमन—

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज संस्थान बडोदें यांची स्वारी ता० १ जानेवारी सन १८९३ रोजीं मुंबईस येऊन आज रोजीं सायंकाळीं बडोदें मुक्कामीं येऊन दाखल झाली स्वारी बरोबर राणी साहेब व मुलें फत्तेसिंग महाराज हेही होते. स्वारी नगरांत येणार ही वार्ता ऐकिल्या बरोबर सर्व नागरिक जनांस व संस्थानचे अंमलदार लोकांस अत्यानंद होऊन त्यांचे चेहऱ्यावर टवटवी आली. सर्व लोक आपापल्या स्थिती प्रमाणें श्रीमंत महाराजांचा आदर सत्कार करण्याचे कामास लागले. सरकार स्वारी सायंकाळीं ५॥ वाजतां येण्याची वर्दी आली होती त्याप्रमाणें सर्व लोक तयारीस लागले. संस्थान मार्फतही आदरसत्कार करण्याची जंगी तयारी सुरू झाली. बडोदा रेल्वे स्टेशन निशाणें व चित्रविचित्र कपड्यांनीं व आम्रपर्णांनीं अत्यंत सुशोभित केलें होतें. प्लाटफार्मवर नानातऱ्हेच्या रंगित सतरंजा व गालिचे पसरलेले होते. स्टेशनावरच महाराजांस पानसुपारी करण्याचा नियम ठरला होता. स्टेशनाचे बाहेरचे बाजूस मैदानांत संस्थानच्या तोफा व घोडेस्वार पलटणी रस्त्याचे दोन्ही बाजूस हत्यारबंद उभ्या केल्या होत्या. त्या प्रमाणें पोलिस शिपाई उभे राहून व्यवस्था करण्यांत गुंतले होते. स्टेशना पासून तों महाराजांचे वाड्यापर्यंत रंगिबेरंगी निशाणें लावून गर्दी करून दिली होती. मधून मधून "महाराज चिरायू होवो. "स्वागत असो." अशा प्रकारचीं सोन्याचीं अक्षरें झळकत होतीं. पलटणीचे अंमलदार क्याप्टन बस्तिसिंग वगैरेचीं घोडेस्वार नीट रीतीनें उभे करण्यांत तात्काळ होऊन गेली आहे. तों इतक्यांत महाराजांच्या खुद्द चार चार अरबी घोड्यांच्या बग्या धाड धाड येऊन स्टेशनापाशीं धडकल्या. त्याचे पाठीमागून लगेच संस्थानाचे सोने चांदीचे दागिन्यांनीं शृंगारलेले व रंगविलेले भले मोठे हत्ती झुलतझुलत येऊन स्टेशनापाशीं आले. इकडे दुसऱ्या बाजूनें खुद्द महाराजांच्या सोन्याच्या व चांदीच्या देशी गाड्या व त्यास शृंगारलेले मोठ मोठे बैल जोडलेले हे ही येऊन पोंचले. तिकडून राणी साहेबां करितां लागणारे भरजरी सोन्याचे व रुप्याचे मेणे दासदासीसह हलकारी घेऊन आले. या प्रमाणें कोणी कांहीं कोणी कांहीं असें सर्व प्रकारचे लागणारे जिन्नस व सामान सर्व घेऊन स्टेशनावर येऊन दाखल झाले तो इतक्यांत दरबारची मंडळी कोणी सरदार कोणी मानकरी नायबें दिवाण खानगीं कारभारी व महाराजांचें आप्तजन व महाराणी साहेबांची नातलग मंडळी सर्व आपआपल्या इतमामा प्रमाणें लहान मोठ्या घोड्याचे गाड्यांतून येऊन स्टेशनावर झळकूं लागली इकडे शहरामध्यें ठिक ठिकाणी शाळेतील विद्यार्थी गायन, समाजातील विद्यार्थी मुलीच्या शाळेतील तरुण व सुंदर मुली या आपआपल्या ठिक ठिकाणी महाराजांचें सुदर्शन घेण्यास व त्यांचा जयजयकार करण्यांस उभा राहिल्या त्या प्रमाणेंच कित्येक शहरांतील व्यापारी व मोठे मानकरी हे महाराजांचा सत्कार करण्या करितां हार तुरे अतर गुलाब हातात घेऊन महाराजांची वाट पहात बसले. शहरांत खिडकींतून नागरिक तरुण व सुंदर स्त्रिया हातांत आर्ती घेऊन श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज यांचे मुख दर्शनाचा लाभ केव्हां घडेल या इच्छेनें चकोरा प्रमाणें वाट पहात उभ्या राहिल्या. या प्रमाणें सर्व तयारी झाल्यावर सर्व संस्थानचे अंमलदार व नागरिक जन व स्त्रिया वाट पहात आहेत, बेंडबाजे झपाट्यानें वाजत आहेत, व नगारखाने, ताशे व सुस्वर वाजंत्री हीं ही वाजूं लागलीं. इतक्यांत स्टेशनावर "धाड धाड" तोफांचे आवाज ऐकूं आले. हे आवाज एकिल्या बरोबर महाराजांची स्पेशलट्रेन स्टेशन कांपाउडांत आली असें वाटून, सर्व लोकांची एकच धांदल होऊन आनंदित मुद्रेनें आपआपल्या जागीं बसून "महाराज आता येतील" असें ह्मणत तटस्थ बसले. ४० तोफांची सलामी होत आहे तो स्पेशल ट्रेन प्लाट फार्मवर येऊन धडकली. महाराज खाली उतरल्यावर त्यास भेटण्या करितां आलेले मानकरी व सरदा

र मंडळी यांचीं भेट घेऊन व पान सुपारी घेऊन स्वारी थाटानें शहरांतून "मकम पुऱ्याचे" राजवाड्यांत जाण्यास निघाली. प्रथमतः पुढें महाराणी साहेब यांची गोषाची घोड्याची गाडी होती व तिचे पुढें व मागें ६० गार्ड घोडेस्वार होते. गोषाचें गाडी पाठीमागें राणी साहेबांची सुंदरदासी उभी होती. या गाडी पाठीमागें महाराजांचे दोवे चिरंजीव फतेसिंग व जयसिंग महाराज व कन्या इंदिराज यांची गाडी होती. या गाडी पाठी मागें खुद्द महाराज सरकार सयाजीराव व दिवाणसाहेब यांची गाडी होती व यांचे पाठी मागून सर्व रिसाला व पलटण हत्ती गाड्या घोडे वगैरे सर्व इतमाम होता. महाराजांची मुद्रा फार सुप्रसन्न व आनंदित दिसली. या प्रमाणें स्वारी पानसुपारी व हार तुरे रस्त्यानें घेत घेत व लोकांचे राम राम घेत घेत आपल्या राजवाड्यांत सायंकाळीं दिवे लागल्यावर येऊन पोंचली. संस्थानाचे अंमलदार यांणीं रस्त्यानें सर्व बंदोबस्त उत्तम रीतीचा ठेविला होता हें त्या अंमलदारांस फार भूषणावह आहे.

आपला

"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ७ शके १८१४

---

## राष्ट्रीय सभा

(आठवी बैठक)

गेल्या अंकीं कळविल्या प्रमाणें आठवी राष्ट्रीय सभा मोठी टोलेजंग भरली असून सर्व कामें यथासांग झालीं. सभेचें स्थळ भव्य असून फार रमणीय बनविलें होतें. सर्व बातबेत व व्यवस्था उत्कृष्ट टेविली होती. आल्हाबादच्या स्वागत मंडळीचे सर्वजणांनीं आभार मानले पाहिजेत कीं त्यांनीं पंडित अयोध्यानाथ यांच्या पश्चात् राष्ट्रीय सभेचा समारंभ उत्तम प्रकारें उठविला. यंदा सभेचे कर्णधार मि. ह्यूम हेही नव्हते पण जेव्हां मि० ह्यूम साहेब या बैठकीची हकीकत साग्र एकतील तेव्हां त्यांस परम आनंद वाटून संस्थापित राष्ट्रपरिषेदचा व तिच्या सुकृती चालकांचा अभिमान वाटेल यांत तिळमात्र संदेह नाहीं. सुमार आठशेवर मुखत्यार जमले असून रोज दोन दोन हजारापर्यंत लोक जमत असत.

पहिले दिवशीं पंडित विश्वंभरनाथ यांचे संभाषण स्वागतपर झालें पण तें मोठें आवेशाचें व विचारांनीं आलंकृत. असें होतें. त्यांच्या मागून सभेचे अध्यक्ष बाबू उमेशचंद्र बानरजी यांचें ही संभाषण वीरश्रीचें, पोक्त विचाराचें, आणि बहुविध विषयांनीं ओतप्रत असें झालें. उभयतांची वर्णनीय वक्तृत्वशक्ति, व गोड वाणी व एकनिष्टेची आस्था हीं पाहून सर्व सभाजन आनंदानें प्रफुल्लित होऊन एक सारख्या टाळ्यांच्या व जय घोषाच्या नादानें सभागृह दणाणून गेलें होतें.

गेल्या अंकीं राष्ट्रीय सभेची हकीकत थोडीशी कळविल्या नंतर बाकीची हकीकत बहुतेक मराठी वर्तमान पत्रांतून आल्यानंतर तीच पुन्हा सविस्तर देण्याचें आह्मास प्रयोजन दिसत नाहीं.

दुसरे दिवशीं ह्मणजे तारीख २९ गुरुवार रोजीं आरंभीं तो दिवस मि. ग्लाडस्टन यांचा वाढ दिवस असल्यामुळें त्यांच्या नांवानें त्रिवार जयघोष होऊन सभेच्या कामास सुरुवात झाली. मद्रासचे प्रसिद्ध राष्ट्रभक्त आनंदाचार्लु यांनीं सूचना आणली कीं जरी इंडिया कौंसिल बिलांत लोकनियुक्त प्रतिनिधी निवडण्याचें तत्व स्पष्ट लेखानें घातलें नाहीं तरी त्यावर जें विवरण झालें व लार्ड क्रास, ग्लाडस्टन, सालिसबरी इत्यादिकांची संभाषणें झालीं यांच्या धोरणानें इंडिया कौन्सिल आक्ट हिंदुस्थानांत लागू झाला पाहिजे. लोकांस खरोखरीचा हक्क मिळाला तरच न्याय्य गोष्ट होईल. तेव्हां नवीन नियम करून ते अंमलांत आणण्या पूर्वीं जनसमूहाच्या संमती साठीं सरकारी ग्याझेटांतून जाहीर करावे. या सूचनेवर अनुमोदन करतेवेळी तांना बाबू सुरेंद्रनाथ बोलले तेव्हां अद्भुत वक्तृत्वानें, जोरदार विचारसरणीनें व विषयाच्या महत्वानें सर्व श्रोतृजन चकित होऊन माना डोलवूं लागले. ते ह्मणाले कीं राष्ट्रीय सभा ही चिरायु, भक्कम, व अभंग संस्था आहे आणि तिच्याच प्रभावानें कौन्सिल आक्ट पसार झाला. इंग्रजी राज्यपद्धतीच्या ढोबळ चुका दाखवितांना त्यांनां आश्चर्य वाटलें कीं, स्वदेशांत चाकरी मिळावी ह्मणून नेटीवास दहा हजार मैलावर जाऊन परीक्षा द्यावी लागते. खरोखरी हा राक्षसी विपरीतपणा पाहिला ह्मणजे राणीचा जाहीर नामा पोकळ व दुस्साळ लागल्या प्रमाणें भासतो. स्थानिक स्वराज्य ही केवळ हिंदु राष्ट्राची प्राचीन संस्था असून इंग्लिश राज्यपद्धतीचे अधिकारास आह्मी योग्य व लायक आहों तेव्हां या पराजित देशाला ईश्वर करून स्थानिक स्वराज्याचा लाभ होवो ह्मणजे झालें. राजा रामपालसिंग, नारायण स्वामी नायडू, नामजोशी इत्यादिकांची भाषणें होऊन पहिला ठराव सर्वानुमतें पसार झाला.

पुण्याचे प्रोफेसर गोखले यांनीं दुसरी सूचना आणली कीं पब्लिक सरव्हिस कमिशनच्या रिपोर्टावरील सरकारचा ठराव असमाधानकारक असून नेटीवासाठीं राखून ठेविलेल्या जागा स्टाटयुटरी जाग्यामध्यें समावेश करावयाच्या असतां त्या निराळ्या काढल्या आहेत, १०० जाग्यांच्या ऐवजीं फक्त ९० च जागा सध्यां खुल्या करून ही अद्याप भरल्या नाहींत, आणि योग्य व सारखा न्याय मिळण्यासाठीं इंडियात व इंग्लंडांत एकाच वेळीं सिव्हिल सर्व्हिस परीक्षा झाली पाहिजे. सध्याची राज्यपद्धती नेटीवास प्रतिकूळ आहे हे दाखवितांना त्यांनीं जूरीच्या संबंधानें सरकारी हुकूम, शाळाखात्याकडील खर्चांमधील काटकसर, म्युनसिपालिट्याविषयीं कटाक्षयुक्त वर्तन हीं ही उदाहरणें सांगितलीं. नेटीवांस राज्यकर्त्याप्रमाणें हक्क आहेत असें राज्यकर्त्यांनींच ह्मणावें आणि वेळ बेतली ह्मणजे नेटीवास लाथा ही मारून मार्गें सारण्यास विसरूं नये हें नवल नव्हे काय! पंडित मदनमोहन मालवीया यांनीं अनुमोदन देतांनां हिंदुस्थानांत विदेशीय लोकांनीं कशी लूट मांडली आहे हें उघड करून दाखविलें.

तिसरी सूचना वऱ्हाडचे वकील रा. रा. रंगराव नरसिंह मुधोळकर यांनीं आणिली कीं मुलकीखातें व न्यायखातें यादोहों मध्यें निराळेपणा ठेऊन त्यावरील अधिकारी स्वतंत्र असावेत. मुलकी कामा मुळे न्यायाचीं कामें नीटशीं होत नाहींत आणि न्यायाच्या कामामुळें मुलकी कडील कामास व्यत्यय येतो आणि न्यायखात्या कडे जसे चांगले हुषार, कामदेपंडित व बाबकुशल न्यायाधीश असावेत तसे न मिळाल्या मुळें न्यायमनसबीची कामें चांगलीं चालत नाहींत. मुलकी अधिकाराच्या जोरावर जिल्ह्याचे मुख्य अंमलदार न्यायाचें पारडें पाहिजे तसें फिरवितात कारण इतर न्यायाधीश त्यांच्या हुकमतींतले असतात. ही सूचना दुरुस्ती प्रमाणें सर्वानुमतें पसार झाली.

चवथा ठराव सूचवितांना मि. दिनशा एदलजी वाचा बोलले कीं हिंदुस्थान सरकारानें कृपा करून सैन्याच्या खर्चाच्या नव्याच्या संबंधानें लोकमत विचारल्या शिवाय कांहीं कायमचा निकाल करूं नये. परकी राष्ट्रानें भाग केल्या शिवाय ब्रुसेल्सच्या चळवळी नाच्या संबंधानें नसलेल्या कमिशनच्या निकाल बाहेर येई पर्यंत इंडिया सरकारानें कांहीं हालचाल करूं नये आणि लार्ड हर्शेलच्या कमिटीचा निकाल लोकांच्या साठीं जाहीर करावा. मि. वाचा यांनीं या विषयाचें पुष्कळ उद्घाटन करून सूचविलें कीं हिंदुस्थान सरकारानें एखादा दूरीव कोणता ही कायदा पसार करूं नये.

तिसरे दिवशीं वऱ्हाडचे वकील रा. रा. गणपत श्रीकृष्ण खापर्डे यांनीं एक कळकळीचा ठराव सभेपुढे आणिला कीं मिठावरील नवीन वाढविलेला कर कमी करावा; सालिना एक हजार रुपये उत्पन्नापर्यंत इनकमट्याक्स घेऊं नये; १८९० च्या मार्च महिन्यात प्रसिद्ध केलेल्या अबकारी पद्धतीची अंमलबजावणी वरिष्ठ सरकारानें प्रांतिक सरकार मार्फत करवावी व गांवोगांव कलालीं दुकान लोकांच्या संमती वाचून घालूं देऊं नयें; वारंटच्या खटल्यांत सेशन कोर्टाला ज्युरीच्या समोर आपला खटला चालावा ह्मणून मागणी करण्याचा आरोपीला अधिकार द्यावा; पोलीस खात्यांत आवश्यक व जरूरीप्रमाणें सुधारणा केल्या जाव्या; हत्याराचा कायदा कमजोर व अधीक सवलतीचा करावा, नेटीवासाठीं लष्करी कालेजें स्थापावीं, व नेटीवांतील लढवय्या व शूर लोकांस व्हालंटीअर पलटणीचे अधिकार द्यावे. या सूचनेवर बहुत संभाषणें होऊन ती सर्वानुमतें पसार झाली. त्या नंतर बंगाल व आसाम येथें कांहीं मुख्य मुख्य अपराधा संबंधानें ज्युरीची न्याय पद्धत बंगाल सरकारानें बंद केली आहे ही गोष्ट सर्व राष्ट्रास भयप्रद व अपायकारक वाटते; लोकांचे अधिकार असे कमी करण्यांत येतात अशी हीनत्वदर्शक नाशसूचक, व नोकरशाहीची पद्धत इंडिया सरकारानें अमान्य करावी, आणि इंडिया सरकार चुकेल तर इंग्लिश सरकारानें ती चूक दुरुस्त करून जेथे जेथें ज्युरीची न्याय पद्धति सुरूं करणें इष्ट वाटेल तेथें ती सुरू ही करावी हा सहावा ठराव होय.

फारेस्टच्या कायद्यांतील कडक नियम काढून टाकावे, पब्लिक सरव्हिस कमिशनच्या संबंधानें व इंडियांत व इंग्लंडांत एककालीन परीक्षा घेण्या संबंधानें बाबू सुरेंद्रनाथ, उमेशचंद्र, मेथा व आनंदाचार्लु या चौघांची कमिटी नेमून तिच्यामार्फत पार्लमेंटास अर्ज करावा, कांहीं लष्करी खर्च विलायतच्या तिजोरींतून दिला जावा, आणि यावा साठी एक नवें कायदे कौंसिल द्यावें अशा निरनिराळ्या चार सूचना करण्यांत येऊन सर्वानुमतें पसार झाल्या.

विद्याखात्यांत सरकारानें जी काटकसर आरंभली आहे ती गैरवाजवी असून विद्येच्या सर्व शाखांकडे खर्च पूर्वी प्रमाणें चालवून देशाची औद्योगिक स्थिति कळण्यासाठीं एक कमिशन बसविण्यांत यावें अशी एक महत्वाची सूचना पास झाली.

पांच सहा कोटी जन प्रत्येक दहा दहा वर्षांनीं उपासमारीनें मरतें म्हणून मत वर्षी प्रमाणें यंदा ठराव करण्यांत येतो कीं लष्करी खर्च कमी करावा, जमिनीचा धारा कायमचा ठरवावा आणि शेतकीच्या पेढ्या घालाव्यात.

ब्रिटिश कमिटीचे आभार मानून 'इंडिया' पत्र व कमिटीचा कारभार हीं कायमप्रमाणें चालविण्याचें ठरलें. कांग्रेस फंडांतून पांचशे पौंड देऊन तर पुढील सालीं २८०० पौंड ब्रिटिश कमिटीकडे पोचते करण्या साठीं फंड गोळा करण्यास सुरुवात झाली तेव्हां मंडपांतच तत्काळ सुमार रु. लाख जमले. पंडित विश्वंभरनाथ यांच्या ताब्यांत सभेचा फंड देऊन अलाहाबाद १८९३ ची बैठक भरविण्याचे ठरलें. अमृतसरची बैठक होई पर्यंत विलायतेंत राष्ट्रीय सभा भरविण्याचे तहकूब करण्यांत आलें. मि. ह्यूम यांस सभेचे जनरल सेक्रेटरी कायम ठेऊन मि. आनंदाचार्लु यांस त्यांच्या मदतीसाठीं जाइंट सेक्रेटरी नेमलें. आणि दुर्भंगाचे महाराजांनीं ह्या बाबत राष्ट्रीय सभेच्या बैठकीसाठीं दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून महाराणी सरकारचा जयघोष व धन्यवाद चालला असतां सभा बरखास्त झाली.

---

## Berar Samachar

MONDAY JANUARY, 9 1893.

### THE MORAL OF THE CONGRESS-MEETINGS.

The fact that this huge and august assembly the nation has outlived the bristling period of trial and opposition for the last eight years, indicates that it has a long vital power to continue its existence for something great, and noble. The first cycle of seven years is fruitful events of vast significance. It has opened a new period of clam, deliberate and thoughtful movements. It has made the Congress a national power and that power holds out bright prospects of the common good weal. Each year's meeting is a stepping stone of further peace and progress and the eighth meeting of the last year marks a new epoch altogether. Till now, the Congress has been formulating, from year to year, the national wants and grievances and has done an immense service to arouse the English nation to do its duty towards India. The resolutions of the Congress present a brief and short summary of the hundred-fold improvements that are needed in the system of the present government of India. The bureaucratic

and despotic Governors of the country have wide and divergents interests and are altogether at cross—purpoes with the affairs of the Congress. They do not stoop to lend a listening ear to what the Cogress has been saying all along. The Congress has done however a preeminent good to the nation. The educated and liberal men who have posed themselves as the leaders of the masses, have popularized the views and opinions of the Congress, evoked the sentiments of strong, loyal, and devout advocacy of its proceedings, and gathered under its standard men of all rank and position from the cot tage to the palace.

The National Congress which is the growth of British influences and education, has now entered a career of real success and useful entity. It is but rare that we can hope to realize our ambitions and aspirations at the hands of Govt. of India. All our work must lie in England. The Englishman at home and in the Parliament ought to be won to our side. If he once listens to our tale and be convinced of the rightness of what we advocate and demand then, in the eloquent words of Babu Surendra Nath Bannerji, 'God help those who oppose him in his will'. In full view and prospect of this aim the eigth National Congress has taken time to collect funds and to make doubly sure that it can augment the energies and resources of its constituents equal to any chance and occasion. The one eminent request that runs through the whole proceedings is intended to move the Govt. to let slip no time to consult the people on all topics of public concern. For example, the India Councils Act of 1892 is to be introduced in the immediate future. The Congress requests the Viceroy to interpret truthfully the various sections of the act in the light of the discussions that turned upon them and to make 'a living representative principle' the sole guide of its policy. In order that the Govt. may not ill consult its own wishes the Congress urges the Govt. to take people in confidence. The Currency problem is another example. The Currency Associations in India and Lord Hershell's Committee in England are holding deliberations after the failure of the Monetary Conference in Berlin to come to a decision. In order that the Govt. of India should not unwisely uphold a measure of loss and ruin to the nation the Congress is on the watch to request it not to preceed until the Congress has its say. The British Congress Committee is to be maintained at any cost and subscriptions are invited from all quarters. It is gratifying to find that Rs. 10,000 were subscribed to in the Congress-itself. We have in short to lead a crusade in England to the very doors of the Parliament and for the fulfilment of this sacred and ennobling duty we ought to hold Congress—sessions in India to call upon people to send at least a hundred chosen leaders with sufficient funds to fight for the national weal.

The 'Hindu' of Madras has ably noticed the effects of English education in India. The article is stirring and eloquent and it is well to reproduce the closing portion of it which summarizes in short the striking changes effected in our ways of living and thinking by the rapid advancement of Western education:—

Our English education is almost wholly a protest against our Hindu ideas. Look at it from any point of view you please, that is its speciality It is so in its merits and in its defects. It wars against superstition, and is opposed to the current form of our religion. It calls us away from our complex family ties, and goes counter to our social peculiarities. It teaches us the evils of indiscriminate charity, and roots out all notions of benevolence and charity, discriminate and indiscriminate. No explicit exposition of details is needed to bring this tendency of English education home to our country men. What the education of England inculcates by precept, Englishmen living in our midst confirm by their example. Their princely salaries serve for their luxury, and for that alone. Mothers and fathers depend not upon their charity; and brothers dream not of help from them. Each Englishman, as he lives here, lives himself alone; and of course he is animal or man enough to live for his wife and children also. But of his spirit of charity in word or in deed, we have seldom an instance; at least not one in these days of ours. Their wants are gratified to the grief of many and they are regaled with tamashas and displays to the disgust of all. Choultries and hospitals, parks and pettahs rise in their names out of contributions written 'voluntary' in the tears of the squeezed populace; but they go through their pleasures unconcerned at the griefs and cries of those around them. Why then may we not say that here, in this education and in this living example, we have the explanation of the mischief so palpable in our men of eminence?

Books on Indian politics belie the strange events that pass here. They are mostly written on the gaudy views and ideal utopias that are to be found in lectures and speeches of eminent men who take a general surface-view of the matter. Here is a mention of England's duty to India which we request the Englishmen in india to peruse with attention:—

"Nevertheless the case is more clear in respect of countries like British India, in which, through a series of fortuitous circumstances, England has been called to govern a population of alien race, language, and customs, out of all numerical proportion to the English residing in the country. In such a case, the duties of Government can neither be ignored nor resigned nor transferred. They are a trust for a coming generation and for a new age. Every opportunity must be taken, as it is being taken in practice more and more, to habituate the native population to the duties of self-government and to prepare them for a time when the imposed and alien rule can prudently be first relaxed, then shared, and finally withdrawn."

If this be the ideal polity which Mr. Sheldon Amos discovers in the paths of his tory and observation we regret to say that he has taken fictions for facts as we observe a different course altogether pursued by the British Government and we claim to ourselves the rightness of our observation from our being in the field of action and face to face with the rulers *de facto*.

Indian school boys and College students now-a-days command a share of the attention of their rulers. Sir Dennis Fizpatrick, the Lieutenant Governor of the Punjab, in reviewing the report for 1891-92, makes the following remarks:—"Indian students in too many instances fail to acquire either the highly polished manners of their fathers or the quiet self-contained and modest demeanour which commonly characterizes the young Englishman, at least when in the presence of his elders. An Indian youth, when he has acquired the small amout of education involoved in getting through one or two University examinations, is too often apt to adopt a self-asserting, aggressive and dumptious manner which is inconsistent with either English or Native ideas of what a gentleman ought to be." It is indeed gratifying to find that Sir Dennis found no occasion to pass a similar remark in regard to the conduct of a student in Berar.

## वऱ्हाड

हवामान—पावसानें अनर्थ करून सोडला. ठिकठिकाणीं गारांचे पाऊस पडले. खरीपाचीं पिकें मागील अतिपर्जन्यानें बुडाली आणि या पावसामुळें रब्बीचीं नवस वगैरे पिकें सर्फ बुडतील अशी भिती आहे. हवा सर्द, दुष्ट व रोगकारक आहे. काल परवा पासून पाऊस बंद होऊन पूर्ववत थंडी पडू लागण्याचा रंग दिसत आहे.

वऱ्हाड मुनसिपाल कायदा यवतमाळ गांवास लागूं करण्याचा स्थानिक सरकारचा विचार आहे तेव्हां या नव्या मुनसिपालिटी संबंधानें कोणाची प्रतिकूलता असल्यास ती त्यानें दर्शवावी म्हणून जाहीर खबर गेल्या रेसिडेन्सी आरडर मध्यें आहे.

रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे इन्स्पेक्टर—रेजिस्ट्रेशन खातें यांचें आफीस आकोल्यास या जिल्ह्याचे सर्वे नंबरवारीनें नोंदणीच्या माहितीचें सूचीपत्रक तयार करण्या साठीं बरेच दिवस येथें होतें. तें काम संपल्य वरून त्यांचें आफीस या नंतर वाशिमास जात आहे.

नव्या साळच्या किताबाची याद प्रसिद्ध झाली आहे त्या वरून दोन आनंददायक बातम्या कळतात कीं मि. टी. सी. क्रोडन रेसिडेंट यांस कंपानियन आफ दी स्टार आफ इंडिया व कर्नल के. जी. एल. मेकंझी कमिशनर यांस कंपानियन आफ दी इंडियन एम्पायर अशा बहुमानदर्शक पदव्या देण्यांत आल्या. उभयतां अंमलदार वऱ्हाडांत नांवाजलेले असून आपापल्या परीनें राज्यकारभारांत निष्णात, प्रजेच्या कल्याणा विषयीं दक्ष व मोठे चलाख आहेत तेव्हां त्यांच्या बहुमोल चाकरीची ही सन्मानपूर्वक वाहवा झाली हें पाहून सर्वांस संतोष वाटेल.

खानबहादुर शमसुद्दीन अल्लीखान यांस आकोल्यास स्पेशल असिस्टंट कमिशनर नेमल्या प्रमाणें ते सिव्हील जज्जाचें काम पाहूं लागले आणि तुंबलेलें दिवाणी काम संपविण्या साठीं त्यांच्या मदतीस स्पेशल असिस्टंट कमिशनर रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर यांस दिलें आहे.

आकोला स्माल्लकाज कोर्टाचे नाझरचे जाग्यावर रा. रा. वासुदेव काशिनाथ परांजपे शिरस्तेदार-स्पेशल असि. कमिशनर यांस कायमचे नेमून त्यांच्या ३५ रु. पगारावर रा. रा. मोहनसिंग यांस बढतीवर नेमून शेवटील ३० पगारावर खामगांवचे रा. रा. गणेश विष्णु खरे यांची बढती केली. ही वर्गावर्गी हक्कवारीनें झाल्यामुळें सर्वजणास आवडली पाहिजे.

ल्यांड रेव्हेन्यु रेकार्डची कचेरी आकोल्यास पूर्वी ठरल्या प्रमाणें स्थापित झाली.

चिखलीचे नायब तहशलिदार रामराव गोविंद यांजवर लायब्ररीचे वर्गणीचा पैसा गैरविल्हेस लावल्या बद्दल खटला चालला होता त्याची चौकशी बराच काल चालून अखेर आरोपीस १ दिवस कैद व ५०० रुपये दंड अशी सजा झाली.

मि. इ. मार्शल व रा. रा. गोविंदराज मुदलियार एक्स्ट्रा असि. कमिशनर व माजिस्ट्रेट वर्ग १ बुलढाणा यांस क्रिमिनल प्रोसिजर ११० वें कलमा अन्वयें चांगली वर्तणुक राखण्या बद्दल खातरी घेण्याचा अधिकार दिला आहे.

खान बहादूर महमद सला मुल्लाखान स्पेशल माजिस्ट्रेट वर्ग २ बुलढाणा यांस नवीन अधिकार फटके मारण्याची शिक्षा देण्या संबंधानें मिळाला.

रा. रा. गोपाळ रामचंद्र पिटके बी. ए. असि. मास्तर हायस्कूल व आक्टि. डेपुटी इन्स्पेक्टर इलिचपूर यांस कै० केशव ब्रह्मगिरी पाळेकर यांच्याच जागेवर १२५ रुपये पगारावर कायम केलें. ही नेमणुक खुद्द त्या गृहस्थांची लायकी, विद्वत्ता व वाकबगारी या संबंधानें पाहतां आनंदप्रद व समाधान कारक आहे परंतु त्या खात्यांतील चाकरीचीं वर्षें व पगार या मानानें अधीक हक्कदार व सारखेच लायक गृहस्थ दुसरे बाजूस पडले ह्मणून विस्मय वाटतो.

रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट डेपुटी इनस्पेक्टर उमरावती हे तीन महिन्यांच्या आजारीपणाच्या रजेवर असल्यामुळें त्यांच्या जागीं येथील ट्रेनिंग कालेजचे प्रिन्सिपाल रा. रा. वामन रघुनाथ जोशी यांस धाडलें.

या आटवड्यांत आकोला गांवच्या नजीक एका कडब्याच्या गुडावर वीज पडून दोन मनुष्यें ठार झालीं व तिसरा घायाळ झाला. आणखी कांहीं ठिकाणीं गारांच्या वर्षावामुळें अपघात झाल्याचें कळतें.

कमिशनर कर्नल मेकंझी यांचा मुक्काम आकोल्यास फार दिवस लांबली तरी साहेब बहादुरांनीं हा वेळ निरनिराळीं आफिसें वारकाईनें तपासण्यांत, लोकल बोर्डाचा कारभार सुरळित व सुयंत्र करण्यांत व अशाच महत्वाच्या कामांत वाल्वविला हें कळविण्यास संतोष वाटतो.

यंदाच्या म्याट्रीक्युलेशन परीक्षेस उमरावती हायस्कुलांतील १६ पैकीं १४ व आकोला हायस्कुलांतील १२ पैकीं ९ असे पसार झाले. दोन्ही हायस्कुलांचे निकाल उत्कृष्ट व समाधानकारक झाले ही गोष्ट त्यांच्या हेडमास्तरांस भूषणास्पद आहे.

आकोला— महादेव बळवंत घटे, गंगाधर गोविंद हरडुले, गणेश नारायण काळे, शंकर भगवंत काळे, महादेव गणेश कुळकर्णी, महादेव गंगाधर मराठे, नारायण माधव मोहरीर, गणपत प्रल्हाद मुनशी, व मोतासिंग बभुतासिंग सोडिये. त्र्यंबक वामन जोशी (खानगी.)

## वर्तमानसार.

बर्लिन येथील एका रेल्वे कंपनीनें उतारूंस आपोआप टिकिट मिळण्याचें यंत्र काढलें आहे. पैसे टाकले कीं, त्या किंमतीचे टिकीट पुढें पडतें.

आस्ट्रियाचे युवराज प्रिन्सफर्डिनांड हे एडन येथें येऊन दाखल झाले.

सेक्रेटरी आफ स्टेट यांचा पगार कमी करण्याबद्दल मि. दादाभाई नवरोजी पार्लमेंटांत प्रश्न काढणार आहेत.

चमत्कारिक खटला—एका कुटुंबांत भावांची वांठणी होत असतां देवांच्या वाटणीचा प्रश्न आला. त्यांत एक भाऊ विलायतेहून जाऊन आला असल्यामुळें त्याकडे देवांच्या मुर्ती जाऊं नयेत अशी बाकीच्या भावांनीं तक्रार केली आहे. हल्लीं हा खटला कलकत्ता हायकोर्टांत आहे. निकाल सांगण्याचे विचाराकरितां जज्जसाहेबांनीं मुदत घेतली आहे.

भूमिगत संचयः— गेल्या तेहतीस वर्षांत हिंदुस्थानांतल्या लोकांनीं १,६०,००,००,००० रुपयांचें सोनें आणि त्याच्या दुप्पट किंमतीचें रुपें जमिनींत पुरून ठेविलें असें एका इंग्रजी पत्रास एका बातमीदारानें कळविलें आहे. इंग्रजाचें राज्य गेलें बिलें तर मग काय करावें! पुढची तरतूद आतां करून आह्मी ठावतों असा विज्ञापती शोध निघाला असल्यास कोण जाणें.

डा. महेंद्रलाल सरकार यांस कलकत्ता युनिवर्सिटीचे व्हैसचान्सलर नेमण्याचा सरकारचा विचार आहे.

हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचे प्रदर्शन लाहोर येथें येत्या फेब्रुआरीस भरणार आहे.

हर्दवार मेळ्यासंबंधी पुनः पार्लमेंटपर्यंत चवकशीकरितां प्रकरण पाठविण्याचा कलकत्ता येथील इंडियन असोशिएशनचा विचार आहे.

जुरीसिस्टिम बंगाल सरकारानें बंद केल्याबद्दल लंडन टैम्सनें ही सरकाराविरुद्ध आर्टीकल लिहून त्यांनां दोष दिला आहे.

पामीर प्रकरणासंबंधीं राशियाचा पत्रव्यवहार चीन व इंग्लंड याजबरोबर निरनिराळा चालला आहे.

लार्ड क्रोमर हे पुढचे व्हैसराव होणार असें ह्मणतात.

शिकंदराबादेस घर घेतांनां व विकतांनां निझाम सरकारास ५ टक्के शेंकड्या मागें द्यावे लागतात.

कनाडा इंग्लंड पासून स्वतंत्र होण्याबद्दल कांहीं लोकांची खटपट चालली आहे असें ह्मणतात.

राशियानें टर्कीकडील बाकी बद्दल फारच तगादा लावला आहे. टर्की पैसे जमा करीत आहे. सु० प०

वकील व जज्ज— हैदराबादच्या सिटी हायकोर्टांत गेल्या १५ व्या तारखेस एक वकील जज्जापुढें तकरार करीत असतां जज्ज त्या तकरारीकडे लक्ष्य न देतां दुसऱ्या कामाकडे लक्ष्य देत आहे असें आढळल्यावरून माझ्या तकरारीकडे लक्ष्य द्या अशी वकिलानें सूचना केली व त्याबद्दल जज्जास राग येऊन जज्ज व वकील यांच्या दरम्यान थोडो बाचाबाच झाली आणि शेवटीं त्या वकिलास कोर्टांतून घालवून दे असा जज्जानें शिपायास हुकूम केला; इतकें होतांच कोर्टांचे वकील एकत्र जमले आणि सगळी गोष्ट कळविण्याकरतां चीफ जस्टिसकडे गेले व त्यांस सर्व हकीकत सांगितली, त्यावरून चीफ जस्टिस यांणीं हें प्रकरण निकालाकरता सरकाराकडे पाठविलें आहे असें सांगतात.

मि. अबदुल हक उर्फ सरदार डिलरजंग यांणीं गेल्या आठवड्यांत माहिमच्या दरग्याच्या उच्छहापीत्यर्थ ४१,५०० मुसलमान नुष्यांस एक मोठीं जेवणावळ दिली! हिंदुस्थानांतल्या सर्व ठिकाणच्या लोकांस आमंत्रण केलें असून बहुत्येक ठिकाणचें आले होते. मुंबई व माहिम यांच्या दरम्यान स्पेशल गाड्या चालूं होत्या! रात्रीं दरग्या जवळ प्रार्थना झाली व सकाळी ७ वाजतां जेवणावळ सुरु झाली. मोठाली ४०० भांडीं चुलीवर चढविली होती! ११९ फरे तांदुळाचा भात झाला! १५,००० पौंड मटन शिजलें! तितकेंच तूपही लागलें! सरदार डिलरजंग स्वता व्यवस्था करीत होते. बंदोबस्तार्थ पोलिसांस कांहीं श्रम पडले नाहींत.

हिंदुस्थानच्या लश्करी कामदारांनीं राशियन भाषेची परिक्षा द्यावी असा सरकारानें एक नियम केला असून त्याप्रमाणें इकडचे कित्येक कामदार परवा विलायतेंत त्या परिक्षेंत पासही झाले.

तिबेटांच्या संबधानें चीन सरकारच्या तर्फेनें बोलणें करणारा मि. हाट हा दार्जिलिंग येथून कलकत्यास आला आहे.

ग्वालेरचे महाराज जानेवारींत कलकत्यास जाणार आहेत.

अफगाणिस्थानच्या अमिराचा कर्नल हैदेदार हल्लीं कलकत्यास आला असून अमिराची कांहीं गुप्त पत्रें गव्हरनर जनरल यांस देण्याकरतां आणलीं आहेत अशी गप आहे. त्याणें आपल्या येण्याची बातमी सरकारच्या परराज्यसंबंधी खात्यास देणें जरूर होती, पण त्यानें ती शनिवार पर्यंत दिली व्हती असेंही सांगतात.

पामीर संबंधानें चीनसरकार घ्यावी तितकी खबरदारी घेत नाहीं यामुळें राशियास चांगली सवड होत आहे व तें वाईट आहे असें विलायती पत्रें ह्मणत आहेत.

बुखाऱ्याचा अमीर आपल्या मुलासह नजर नजराणे घेऊन राशियन बादशाहास भेटण्यास जाण्याकरतां निघाला.

पामीर संबंधांत चीन व इंग्रज या दोघांशीं मिळून बोलण्यास आपण तयार नाहीं, एकेकल्याशीं बोलूं असें असें राशियाचें ह्मणणें आहे.

चित्रळचा नवा होतर निझाम उलमुलक हा सर्व प्रांतांचा अधिकार हळू हलू बळकावीत आहे.

कुरमव्हाली खिंडींत आज जरी शांतत आहे तरी कांहीं गडबड होण्याचा रंग आहे असें तार सांगत्ये.

टर्कीच्या दरबारीं जो इंग्रजसरकाचा एक राजकीय वकील असतो त्याच्या जवळ एक व्यापारी सेक्रेटरी ह्मणून कायपचा असावा असें इंग्रजांस वाटूं लागलें आहे. ठा० अ०

जोड्याचा दगडी तळ—जर्मनीतील चांभारानें जोड्यास एका जातीच्या दगडाचा तळ घालण्याची नवी युक्ती काढिली आहे. हा दगड हलका असून खुपत नाहीं, आणि पुष्कळ वर्षे टिकतो असें ह्मणतात.

कठिण डोक्याची माणसें— लंडनांत हल्लीं दोन मनुष्यांचे प्रदर्शन सुरू आहे ह्यांचीं डोकीं इतकी कठिण आहेत कीं त्यांवर दगड ठेवून तो घणानें फोडला तरी त्यांच्या डोक्यांस बिलकुल इजा होत नाहीं असें तिकडून आलेल्या वर्तमान पत्रावरून समजतें. शु० सू०

असाम प्रांतांतील जमिनीवरचा सारा वाढविण्याचा विचार सुरू आहे. सारा वाढविण्याचें कारण पुढील प्रमाणे सांगण्यांत येत आहे. आसामांतील लोक फारच आळशीं आहेत तेव्हां त्याना काम जास्ती पाडून उद्योगाची संवय लावली पाहिजे तो सारा वाढविल्यानें लावतां येईल. कारण जमिनीवरील सारा वाढला ह्मणजे मेहनत करून जमिनीचें उत्पन्न वाढविल्या वाचून त्यांना दुसरा मार्गच राहणार नाहीं!

वेड्या लोकांना गाणें शिकविलें असतां त्यापासून बराच फायदा होईल. कारण गाण्याची गोडी लागली असतां चित्तभ्रंश विकारापासून कमी इजा होते असें डाक्टर लोकांचें मत आहे.

१८९३ सालच्या दिसेंबर महिन्यांत निजाम सरकार हैद्राबादेस ५० हजार रुपये खर्च करून कलाकौशल्य प्रदर्शन करविणार असून त्याकरितां ३० हजार रुपयांचें चिकागो प्रदर्शनांतील कांहीं जिन्नस खरेदी करणार आहे.

सरकारांत असें वाटत आहे कीं जागजागीं खेडोगणती मीठ सांठवून तेथें सॉल्ट कलेक्टर अगर असिस्टंट सॉल्ट कलेक्टर ठेवावे, आणि मिठाचे दरदाम भाडें वगैरे चक्क ठरवून टाकावें ह्मणजे मग ज्यांना मीठ पाहिजे त्यांणीं पोष्टांत पैसे भरले कीं ते पैसे परभारे साल्ट कलेक्टरकडे पोंचून तिकडून मिठाच्या थैल्या रवाना व्हावयाच्या आणि ज्यांच्या त्यांना त्या रेल्वे मार्गानें अगर अन्य उपायानें मिळावयाच्या.

शतकऱ्यांस कर्ज देण्याचा कायदा बंगाल्यांत लगूं केल्या पासून शतकऱ्यांची स्थिति पुष्कळ सुधारली आहे, व नापीक सालवांचून त्यांस कचितच कर्ज काढावें लागतें असें बंगाल सरकार सांगतें.

येत्या फेब्रुवारी महिन्यांत लाहोर येथें एक औद्यागिक परिषद भरणार आहे.

राणीचे नातू सांपतेच जर्मनचे बादशाहा यांचा हिंदुस्थान देश पहावयास येण्याचा बेत आहे व त्या संबंधानें विचार चालूं आहेत. क० त०

## जाहिरात

### हे पाक पाहा

हा हेमंत ऋतु युक्त हिवांळाच खाण्यानें पौष्टीक शक्ती व स्फूर्ती व स्मरणशक्ती मिळेल व हस्तपाद व कटी ठणक व शूळ व सर्व वात विकार नाहींसे खात्रीनें होतात व बाळंतीनीस व सर्वा स्त्रीयांस गुण देणारें सौभाग्य सुंट हे पाक विक्रीस तयार आहेत लागेल त्यांनीं मागविल्यास व्हालुपेबलनें पाठऊ. पोष्टेज खर्च निराळा पडेल त्वराकरा गेली वेळ येणार नाहीं.

| | |
|---|---|
| सालम मिसरी पाक द० शे० ८० तो. | ३रु. |
| बदाम पाक | २॥ |
| गोखरू पाक | ७ |
| कुस्मांड पाक | ५ |
| सालम मिसरी व बदाम पाक प्रत २ | २ रु. |
| सौभाग्य सूंट | २ |

(पत्ता व सही) शिवचरणागिर रामगीर
वैद्य कुणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षघातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग तसेंच सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरें कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कलप.

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांतवरील सर्व औषधें मिळतील

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेरांव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही ,, ३ ,, ८८
सळअखेर ,, ७ ,, १८८
किरकोळ अंकास ........................८४

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy...............................4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस .........८१

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition perline 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXVII AKOLA MONDAY 16 JANUARY 1893 NO. 3

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १६ माहे जानेवारी सन १८९३ इ० अंक ३



## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति येते. कमकुवत मनुष्यास सदृढ बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा होतात.

तरुण मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तात्काळ नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सल्का मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टॅानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे. हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रेनें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारे टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालू असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळेंत F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांना सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्टिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.


---

## नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ४ प्रमाणें.

र. नं. ११ क्लास नं. १५ पैकीं मि. नंबर १/१८९३

वि. अंबादास संतो सिव्हिल जडज्य साहेब जिल्हा वाशीम यांचें कोर्टांत.

नांव कोंडजी बापाचें नांव गोंडाजी घनवट राहणार सेलगांव ता० मेहेकर जि० बुलडाना यांस मयत.

परसाजी बापाचें नांव मल्हारजी राहणार एकाम्बा तालुके वाशीम जिल्हा वाशीम याचे कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें म्हणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे काहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचें द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता० ६ माहे फेब्रुवारी सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयी लेखी हकीकत दाखल करावी.

आज ता. १० माहे जानेवारी सन १८९३ इ.

अंबादास संतो
सिविल ज्यडज्य.

---

( पहिल्या अंका वरून पुढें चालू. )

ज्यांनीं आपलें निम्में शिमें आयुष्य जगराहाटींत वागण्यांत लोटलें असेल त्यांना वरील वचनाचा पूर्ण अनुभव येऊन चुकलांच असेल. " यौवनारंभे कालुष्यमुपयाति बुद्धिः" या वाक्याची सत्यता वारंवार येत असेल. हजारो वेळा त्यानां स्वतांना आशाभंगाचे प्रसंग आले असतील. व बरेच दिवस मोठ्या हालांत काढावयास लागले असतील

सभोंताली त्यानां मोठें, नामी देखावे पाहण्यांस मिळाले असतील. कोणी आपल्याच मूर्खपणानें व दिरंगाईनें आपल्या पायावर धोंडा पाडून घेत असतील. कोणी दुसऱ्याच्या गोड बंगालांत अज्ञानामुळें म्हणा, अगर आपल्या पोकळ मिजासीनें म्हणा सांप हल्यामुळें अक्काबाईच्या सपाट्यांत गोते खात बसले असतील. कोणी आपल्या भोळेपणानेंच संकटांत दिवस काढीत असतील. यांचें कारण काय? वरील जें सिद्ध पुरुषांचें वचन आहे म्हणजे "जगांत दुर्जनांचा भरणा फार आहे" त्या वचनाची व त्यांची ओळख होत नाहीं. व म्हणून तरुण जनांना त्याबचनाची पूर्ण ओळख करून द्यावी, त्यांचें अंतर्बाह्य स्वरूपाचें चित्र त्यांच्यापुढें मांडावें असें जे अनुभविक लोक म्हणतात त्यांत नवल तें काय?

ही जीवयात्रा चालविणें फारच कठीण आहे. प्रत्येक जणास आपणास सुख मिळावें चार चौघांत आपली प्रतिष्ठा व्हावी असें वाटत असतें परंतु ही इच्छा सफळ होण्यासाठीं कसलीं धोरणें बांधावीं लागतात हें त्याला पूर्ण ठाऊक नसतें. आतां एखाद्या गर्भश्रीमंताच्या मुलाचें उदाहरण घेऊं. तो लहान असतो त्या वेळीं म्हणजे साधारण त्याला कळूं लागलें म्हणजे त्याच्या बापाचे जे कारकून असतील, चाकर नोकर असतील, गावांत जे चार ओळखीचे लोक असतील ते सर्व त्या मुलाची "हांजी हांजी" करतात "बाळासाहेब तुम्ही फारच सुरेख आहात, तुम्ही फारच हुशार आहात, बाकी सर्व मुर्ख आहेत" इत्यादि मिथ्या भाषणांनीं त्या मुलाचा एक सारखा स्तुतिपाठ चाललेला असतो. हा स्तुतिपाठ करण्याचा उद्देश उघड उघड आहे. त्या मुला पासून त्याच्या बापाच्या पाठी मागें कांहीं तरी आपल्यास लाभावें असा या भाट मंडळी पैकीं प्रत्येकाचा मतलब असतो. आतां त्या स्तुतिपाठाचे सप्ताहावर सप्ताह ऐकिल्या मुळें आमचे "बाळासाहेब" किंवा "बापूसाहेब" कोणी असतील ते फुगतात. जगाचा अनुभव नसल्यां मुळें, वरिष्ट, कनिष्ठ हा भेदाभेद त्याला समजत नाहीं, आपण सागूं ते लोक करतात आपण बोलूं तें खरें असें लोक मानतात अशी त्याची खात्री झाल्यामुळें आपल्या विरुद्ध कोणी जाईल या विषयीं त्याला तिळमात्र संशय वाटत नाहीं. हे लोक इतक्या कर्णमधुर गोष्टी सांगतात व माझ्या सेवेविषयीं अगदीं तत्पर असतात तेव्हां ते मला म्हणजे कधी फसवितील असें त्यांच्या ध्यानीं मनीं सुद्धां येत नाहीं. अथवा आपल्यांशी कोणी निमकहरामी पणा करील हे त्याच्या गांवीं सुद्धां नसते. उलट सर्व आपणास चहातात, सर्व आपल्यावर प्रीति करतात म्हणून स्वतां ही त्यानां प्रेमभाव दाखवूं लागतो. कोणी अनोळखी मनुष्य त्याच्या कडे गेला व त्यानें नमस्कार किंवा राम राम ठोकला कीं पुरे! ओळखही झालीच व पुढें ही आपमतलबी ओळख वाढता वाढतां त्या बाळा साहेबास तो अपरिचित मनुष्य आपला पक्का दोस्त आहे असें वाटूं लागतें व जगामध्यें प्रेमभावच जिकडे तिकडे आहे, प्रेमभावा सारखी दुसरी चीज दुनियेंत नाहीं अशी त्याची बालंबाल खात्री होते. पुढें बापानें मुलाच्या स्वाधीन सर्व कारभार केल्यावर किंवा बापाच्या मागें सर्व जिंदगीचा घरांत बघण्या सवरण्याचा अधिकार हातीं आल्यावर मग त्याच्या सभोंवती जो स्वकार्यसाधु बंदीजनांचा रमणा भरतो त्याला कांहीं सीमाच रहात नाहीं. व त्यां पैकीं प्रत्येक जण "बाळा साहेबाचीं" तब्येत कोणच्या रीतीनें खुष राहील व आपल्यावर बहाल मर्जी कशी जडेल या धोरणांत तो असतो, "बाळासाहेब" ही त्यां मंडळीवर मनःपूर्वक प्रेम ठेवितात. पण त्या अनुभवशून्य बाळासाहेबांना हे खुशामतकऱ्यांचे तांडे आपल्या भोंवती कां घिरट्या घालतात त्यांत त्यांचा मतलब काय हें कळतें काय? फुरसत सापडली कीं बस आपला ते घात करतील, आपल्याला फशी पाडतील, आपल्याला सर्वस्वी बुडवितील हें त्याला त्या वेळीं समजतें काय? तसेंच संधी आली म्हणजे आपल्या घनावर डल्ला मारून त्यांच्या पैकीं कोणी चैनबाजी करीत बसतील व ते पाहण्याचे आपल्या

कपाळीं येईल हें त्याच्या या वेळीं स्वर्मी तरी असेल काय!

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य १४ शके १८१४

कर्नल मेकंझी कमिशनर वऱ्हाड यांस सी. आय. इ. हा किताब मिळाला म्हणून साहेब बहादुरांचें अभिनंदन करण्या करितां येथील 'मित्रसमाजा' नें त्यांस गेले बुधवारीं पानसुपारी दिली. पानसुपारी श्रीमंती थाटाची असून सभागृह रोषनाई, मंगल वाद्यें, कमानी तोरणें, फळाहारासाठीं दिलेले शोभिवंत तंब यांनीं मोठें रमणीय बनविलें होतें. युरोपियन व नेटीव मिळून आमंत्रित गृहस्थ मोजके असल्या मुळें सभा फार छोटी दिसली. इतर बातबेत उत्तम प्रकारचा ठेविला होता. कर्नल मेकंझी आदिकरून लोक स्वस्थानीं विराजमान झाल्या नंतर राव बहादुर जठार यांनीं समयास शोभेल असें कर्नल साहेबांच्या स्तुतीपर संभाषण केलें. भाषण फार गोड व मनोवेधक झालें. मधून मधून टाळ्यांचा गजर चालला असतांना रावबहादूर इंग्रजींत म्हणाले कीं कर्नल मेकंझी यांचा जन्म वऱ्हाडांत व त्यांची बहुतेक चाकरी वऱ्हाडांत या मुळें वऱ्हाडांतल्या लोकांचे ययारनिरहे साहेब हें एक विश्वासाचें व भरंवशाचें स्थळ आहे. वऱ्हाडांतच यांचा उदय होऊन ते या प्रांताचे हुद्दी राजे आहेत. यांना बहुसाल कामें असतात व फुरसत नसते तरी यांच्या पाशीं कोणाला मज्जाव नाहीं. आणि त्या मुळें वऱ्हाडांत आणि त्यांत विशेषें करून वाशीम व ईलिचपूर येथील कांहीं मोठी ठाऊक नाहींत व कोणी ओळखीचे लोक नाहींत असें विरळा घडेल. सरकारी परिपाठा प्रमाणें हे फारसा पत्रव्यवहार लांबवीत नाहींत आणि समक्ष लोकांच्या भेटी घेऊन व सभा भरवून निकट व घास्वाळ्याचे प्रश्नांचा विचार सुबावह व तावडतोब असा करितात नंतर कर्नल साहेबांच्या सद्गुणांचें वर्णन करून राव बहादूरांनीं इच्छा दर्शविली कीं जसे मि. प्लौडन व कर्नल मेकंझी यांस एका समयीं सी. एस. आय व सी. आय. इ. हे किताब मिळाले तसेंच एकाच समयीं उभयतां अनुक्रमें पंजाबचे लेफटनेंट गव्हर्नर व रेसिडेंट झाले तर सर्वत्र जयजयकार होईल. वरील आशयाचें संभाषण झाल्यावर कर्नल मेकंझी साहेबांनीं त्यांच्या झालेल्या आदरसत्कारा बद्दल व बहुमाना बद्दल सर्व जणांचे आभार मानले आणि लोककल्याणा साठीं हा देह पर्यंत झटलों तसाच माझ्या कारकिर्दीच्या अखेर पर्यंत झटेन असें आश्वासन देऊन व दुबार मंडळीचे आभार मानून त्यांनीं नव्या किताबा बद्दल सरकारास कृतज्ञता दर्शविली. त्या नंतर दोन मुलांनीं कांहीं स्वागतपर पद्यें गायलीं आणि रा. रा. गंगाधर बोवा गवयी यांनीं सतार वाजवून व कांहीं चिजा म्हणून युरोपियन गृहस्थांस फार खुष केलें. कमालखानी हार, गुच्छ, विडे, अत्तर वगैरे वाटल्या नंतर दूर करून आणलेल्या फळफळावळीचा उपहार करून मंडळी मोठ्या प्रफुल्लित व व आनंदित अंतःकरणानें कर्नल मेकंझी यांचे गुणानुवाद गात व मित्र समाजाची तारीफ करीत घरोघर परत गेली.

---

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं इलिचपूरचे डेपुटी कमिशनर कर्नल एच. डी. रेनिक हे विलायतेस फर्लोवर गेले असतां तिकडेच गेल्या पंधरवाड्यात मरण पावले. सन १८५९ त यांनीं लष्करी खात्यांत प्रथम चाकरी धरली आणि बीन, बेल्लारी, सिकंदराबाद, हैदराबाद वगैरेकडे त्या खात्यांत दहा वर्षें गेल्या नंतर वऱ्हाड कमिशन मध्यें आले. डेपुटी कमिशनरचे अधिकारापर्यंत ते या प्रांतात चढले तरी त्यांची भरभराट त्यांची योग्यता, गुण, व विद्वत्ता या मानानें फार उशीरा झाली. या गृहस्थांस विलायतच्या चालू भाषा खेरीज हिंदुस्थानी, परशियन, मराठी, व तलगू या भाषा चांगल्या अवगत होत्या. मराठी भाषातर हे चांगल्या बहुश्रुत लोकां प्रमाणें अस्खलित बोलत असत. यांच्या वर्तनांत नवलाची गोष्ट ही कीं त्यांना हिंदूंचे रितीरिवाज व जातींमधील फरक हीं फार आवडत असत ब्राह्मणांनींच कारकुनी करावी असें ते बोलून ही दाखवीत. साहेब स्वतां कुशल सुतारा प्रमाणें काम करीत असत. शरीरानें सुदृढ व बांध्यानें देखणे असे हे कर्नल रेनिक साहेब श्रीमान, नीतिमान व उद्योगशील होते. रयतेच्या कल्याणाविषयीं हे फार दक्ष असत पण यांना विनाकारण शिवीगाळी व भांडण तंटे कोर्टांत आणणाऱ्यांचा अत्यंत धिक्कार असे. एकंदरीनें यांच्या मरणानें वऱ्हाडांतील एक सरदार व व्हाराखाशील कोकांचा एक कृपाळू अधिकारी नाहींसा झाला. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो!

---

The Berar Samachar

MONDAY JANUARY, 16 1893.

The Mitra Samaj (Native Club) of Akola congratulated at an evening entertainment on Wednesday last, Colonel Kenneth Mackenzie on his recent appointment to the Most Eminent Companionship of the Indian Empire( C. I. E. ) The arrangements were perfect The triumphal arches,, the rows of flower-pots, the Shamiane with tables laden with rich and choice-fruits, the new ceiling of the club-room with its agreeable light ... to mention each of which separately would mean a trifle—conjoined to enhance the grand scene of the day. The rich and influential members of the club subscribed liberally to make the entertainment a perfect success and so it was really gorgeous and enjoyable. The whole get up was of a short time and most creditable to its managers. The European gentlemen of the station were almost all present and besides the members of the club there was a sprinkling of some few native gentlemen.

The proceedings of the day began with the speech of Rao Bahadur Jathar. His august figure, silvery voice and eloquent words were most impressive and won him the applause and cheers of the whole meeting. His speech conveyed an accurate and just estimate of the nature, character, and capacities of the distinguished guest It would, if reproduced, appear in the following words:—

"Ladies and gentlemen

You all know for what purpose we have assembled here this evening. It is to congratulate our worthy and popular Commissioner Colonel Mackenzie on his being admitted by Her Majesty the Queen Empress to the most exalted order of the Indian Empire. In honouring Colonel Mackenzie Her gracious Majesty and His Excellency the Viceroy have honoured the people of Berar. You are aware, Ladies and gentlemen, that Colonel Mackenzie belongs emphatically to Berar. He was born in the province and the best years of his life have been passed in it. The people therefore have great confidence in him; nay they all feel that he is one of us. As far as our recollection goes he is the only officer of the Commission who has risen from the lowest to the highest post on the commission, namely, to the permanent Commissionership. This is neither the time nor the place to speak of his great administrative abilities and of the services he has rendered to the province as an Assistant Commissioner, as Deputy Commissioner, as Judicial Commissioner and finally as Commissioner If to recount his services to the province were permissible here it would require longer time than is at our disposal this evening and it would also require an eloquent tongue that is a far abler speaker than the one who has been honoured by being asked to speak a few words on this occasion. I would refer only to one or two prominent characteristics of Colonel Mackenzie's highly successful administration. With his multifarious duties and pressing calles on his time he is easily accessible to the humblest of her Majesty's subjects and consequently it can be justly said that he is intimately acquainted with every thing and every body in the province. He has served as Deputy Commissioner in each of the six districts and he is known every where; but in Basim and Ellichpur espacilly it would be difficult to find prominent men in any part of the district who have not spoken freely and familiarly with Mackenzie Sab.

Those who have had the honour and pleasure of working under Colonel Mackenzie. know the admirable way in which he promptly gets important work done. His note-books contain every detail of information regarding the departments entrusted to his care; and when any knotty question is to be settled he arranges a meeting with the individuals or bodies principally concerned, and, by allowing free discussion, puts the matter in the way of speedy settlement. I need not add that in this way some difficult questions have been settled in *days* when as many months could have been insufficient by the ordinary method of official correspondence.

As I said before our time would not be sufficient if I continued in this way; besides we meet Colonel Mackenzie here, not as Commissioner, but as a constant and generous friend of long standing, and we take this opportunity to give vent to our feelings of admiration for his suavity of temper, affability and cheerfulness of disposition and winning kindness of manners. When the news of the honours conferred by Her Gracious Majesty on Mr. Plowden and Colonel Mackenzie reached Berar early this month there was a thrill of joy through out the province and our newspapers, which do not often agree, were unanimous in expressions of gratitude and joy. Two officers, both intimately acquainted with the province, were probably never in authority before at Hydrabad and Amraoti at one and the same time; but this is the case now and it was a most happy and singular coincidence that both were honoured on the same day.' On behalf of the Mitra Samaja I offer our humble and respectful thanks to Her Majesty the Queen Empress and his Excellency the Viceroy and hearty congratulations to Colonel Mackenzie; and we hope, that this is only the begining of the honours which are to be showered in rapid succession hereafter. We cannot also for bear expressing our hope that when there is again a movement from the Capital of the Nizam for a Lieut. Governorship the precedent of the other movement from Amraoti to Hydrabad will also be similarly followed. Ladies and gentlemen, I thank you on behalf of the Samaja for coming here and assisting us in honouring ourselves by troubling Colonel Mackenzie to come here and be subjected to our congratulations."

In reply Colonel Mackenzie thanked all those that were present in a short and appropriate speech. He said he was unworthy of the high praise which partial friendship so freely bestowed. Old friends like Messrs Jathar, Daudekar, Ganesh Bapuji knew the speaker well from the start of his service and he did his most to further the interests of the people and hoped to do so to the end of his career. He felt himself grateful to the Govt. for the title conferred on him and in warm and joyous terms of thankfulness resumed his seat amid loud cheers. Some students from the local schools sang well the verses composed for the occasion. Then followed the native music for a time. Mr. Gangadhar Boa played excellently on the Satar and sang a few pieces upon it. The European guests showed much appreciation of the native performance and showed also that they had a good ear for tunes usic. The guests rose up to partake of the refreshments; when that was done the guests dispersed with an expression something like the following:—

"Joy have I had; and going hene
I bear away my recompensce:
In spots like these it is we prize
Our memory, feel that she hath eyes:"

---

## वऱ्हाड

मि. आर. डी. हेयर डेपुटी कमिशनर हे रजेवरून परत येऊन वाशीमास नेमणूक झाल्या अन्वयें तिकडे गेल्या गुरुवारीं रवाना झाले.

आणि इलिचपूरचे डेपुटी कमिशनर कप्तान बाइन हेस्तिंगस हे तीन महिन्यांच्या रजेवर जात असल्या कारणानें वाशिमचे आ. कि. डेपुटी कमिशनर चार्लस डेव्हीस यांस तीन महिने पावेतो इलिचपूर येथें आ. कि. डेपुटी कमिशनर नेमिलें.

मि. शमसुद्दीन व्हेटरनरी असि. जिल्हा आकोला हे दौऱ्यावर असतांना मेहकर मुक्कामीं अल्प ज्वरानें मरण पावले.

कर्नल मेकंझी सी. आय. इ. हे गेल्या शुक्रवारीं बुलढाण्यास रवाना झाले आणि तेथून तारीख १७ रोजीं येथें परत येतील.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. डायरेक्टर यांची स्वारी आकोटाकडे फिरण्यास गेली असून आलिशान रेसिडेंट साहेबांच्या आगमनाच्या सुमारास आकोल्यास परत येईल.

## नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सरटीफिकिट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याचे माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं.

सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्रमाणें.

अर्जीचा नंबर क्लास ११ मिसल नं. २ / ९२

दि० स्पे० अ० कमिशनर साहेब जिल्हा अकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार तारासिंग बापाचे नांव लालसिंग जात रजपूत राहणार बोर्डी ता. अकोट.

( अज्ञान ) बालूसिंग वा डोंगरसिंग जात रजपूत राहणार बोर्डी तालुके अकोट जिल्हा आकोला याचे पालन व माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा म्हणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारे ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ कर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं आणी तारीख २१ माहे जानेवारी सन १८९३ इ. रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे. तेवेळी या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी तारीख १३ माहे जानेवारी सन १८९३ इ०.

( सिका )

Shamsuddin Alikhan.

स्पे० अ० कमिशनर.

---

दि० कि. क्लास नंबर १६ मिसल नं. २ / १८९२

पेश ता० १६।१२।९२ इ.

लाउ आवी दाखल नं० २९८९

ता० १६।१२,९२ दि. ८ आणे.

सरकार दि० डिस्ट्रिक्ट साहेब बहादूर जिल्हे अकोले.

तारासिंग वा लालसिंग जात परदेशी राठोड राहणार मौजे बोर्डी ता. अकोट जिल्हे मजकूर अर्जदार:—

सरटीफिकीट मागणें बद्दल

मी अर्जदार आपल्या करितो कीं मजकूर सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्रमाणें अज्ञानाचें पालन करण्याबद्दलचे सरटीफिकेट मिळण्या बद्दल मारूजा खालीं लिहिल्या प्रमाणें:—

असा अर्ज करितों कीं धर्मीनाबाई मर्द डोंगरसिंग जात राठोड ही माझा भावजई असून ती सुमारें ९।१० महिने झाले मरण पावली. तिचा मुलगा नामे दलुसिंग वा डोंगरसिंग जात राठोड हा अज्ञान आहे. त्याचें पालन करण्याबद्दलचे सरटीफिकीट मिळण्या बद्दल खालीं लिहिल्या प्रमाणें अर्ज आहे.:—

( अ. ) अज्ञान दलुसिंग हा पुरुष वड नाहीं जन्माची तारीख माहीत नाहीं. सुमारें सन १८८३ इ० सालांत जन्मला. राहणार मौजे बोर्डी ता० अकोट.

( ब० ) अज्ञान हा पुरुष असून त्याचे लग्न झालें नाहीं.

( क ) अल्पवई मनुष्याची जमीन अजमासें ३०० तीनशें रुपये किंमतीची आहे व ती मौजे १ बोर्डी, २ सुकळी, ३ व वसाली ऊर्फ नागापूर परगणे व ता० अकोट या गांवीं आहे या शिवाय लोकांकडे वेणें आहे. तें सुमारें ४०० शे रुपयाचे आहे या पैकीं, कांहीं वेणें इलिचपूर जिल्ह्यांत आहे एकूण रुपये ७०० चे आहे.

( ड. ) अल्पवई मनुष्याच्या शरिराची किंवा मिळकतीची रखवाली किंवा कबजा अर्जदार तारासिंग वा लालसिंग राहणार मौजे बोर्डी तालुके अकोट याचे कबजांत आहे.

( इ० ) अल्पवई मनुष्याची जवळचे नातलग त्याची आजी नामे मैनाई ही नायको आहे. मनुष्या सबब अर्जदाराशिवाय अज्ञानास दुसरे कोणी नाहीं.

( फ० ) अल्पवयी अज्ञानाच्या मालमिळकतीची किंवा शरराची अर्जदार शिवाय दुसरी कोणाची नेमणूक केली नाहीं.

( ग० ) अल्पवयी मनुष्याच्या शरिराच्या किंवा मिळकतीच्या संबंधानें अर्ज आजपर्यंत कोणत्याही कोर्टांत केला नाहीं.

( ह० ) अल्पवयी मनुष्याच्या शरिराची आणि मिळकतीची या दोन्हींची व्यवस्था करण्याबद्दल अर्जदार याचा अर्ज आहे.

( आय० ) अर्जदार याजजवळ ६०११ सरकारी साऱ्याची असून लोकांकडून वेणें वगैरे सुमारें ८०० आठशे रु० पर्यंत आहे.

( जे० ) अर्जदार याचा अज्ञान हा साक्षात पुतण्या लाहे सबब याचें पालनपोषण व त्याच्या मालमिळकतीची व्यवस्था करणें या अर्जदाराशिवाय दुसरे कोणी प नाहीं.

( के० ) इलिचपूर जिल्ह्यांतून कोर्टांतून कामदार बबकलसिंग राजे राउणार शाहापूर ता० मेळघाट याचे बद्दल कोर्टांत जमा असलेले रु० अज्ञानास सरटीफिकिटावाचून मिळू शकत नाहीं सबब सरटीफीकट पाहिजे.

( एल० ) सदरहू वर लिहिलेल्या प्रमाणें अज्ञानाचें पालन करण्याबद्दल व या मिळकतीचे व्यवस्था करण्या बद्दल सदरहू अज्ञानाचे कलमा अन्वयें सरटीफिकिट मिळावें.

वर्णे प्रमाणें लिहिलेला मजकूर खरा असून सरटीफिकीट मिळण्याविषयीं हुकुम होणार कोर्ट मालिक आहेत. हा अर्ज तारीख २२—१२—९२ इ० हुजूर सुबरअल कायत दि० ता० अकोलें.

( सही.)

तारासिंग वलद लालसिंग राठोड बोर्डी इ. खु.

---

## जाहिरात

म्युनिसिपल नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोले म्युनिसिपल कमिटीतील तारीख ३१।३।९३ इसवी रोजीं ज्या मेंबराच्या जागा सदरहू नियमा पैकीं नियम ३१ प्रमाणें खालीं होतील त्या भरण्या करिता तारीख ६।७ फेब्रुवारी सन १८९३ हा रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतो इलेक्शन ( निवडणूक ) होणार आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत प्रत्येक वार्डापैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें त्या वार्डा करितां होणाऱ्या निवडणुकीची तारीख, जागा पोलिंग आफिसरचें नांव व उमेदवारांनीं कोणते तारीख पर्यंत पोलिंग आफिसर कडेस म्युनिसिपल रूल १३ प्रमाणें आपले अर्ज द्यावे हीं माहिती दिली आहे.

| वार्ड | मेंबरांचीं नांवें | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसरचें नांव. | कोणत्या तारखेचे आंत उमेदवारांचें नांवचा कागद द्यावयाचा |
|---|---|---|---|---|---|
| वार्ड १ | मि. हरी रामचंद्र अनवीकर<br>मि. व्यंकटेश कृष्ण देसाई | ६ फेब्रुआरी ९३ | पाटील चावडी | मि. शमसुद्दीन साहेब | जानेवारी २९ तारखेचे आंत. |
| २ | मि. शंकर गोविंद<br>मि. गोविंद विश्वनाथ<br>मि. सुरजमल गोविंदराम | ७ फेब्रुआरी १८९३ | ग्रेनमार्केट आफिस | मि. अझिझुद्दीन | ३० चे आंत. |
| ३ | मि. व्यंकटेश रा. मुधोळकर<br>मि. पि. थोरीस सा. ( मयत ) | ६ फेब्रुआरी १८९३ | टाऊनहॉल | मि. कोलंब साहेब. | जानेवारी २९ चे आंत |

ता. अकोले. १४।१।९३

B. M. Sathe.
सेक्रेटरी.
मु. क. अकोल.

---

### नोटीस.

भगवानदास गुरू रामचरणदास बैरागी राहाणार संस्थान तेल्हारा ता० अकोट यास.

खालीं सही करणार याजकडून नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, माझा वृद्धापकाळ झाला असून नेत्रानें दिसत नाहीं. माझी सेवा चाकरी तुम्ही चांगली कराल असें मी खात्रीनें समजत होतो. मंदीराची व्यवस्था चांगली ठेवाल म्हणून मी ता० १९—१—८३ रोजीं मृत्युपत्र लिहून दिले असून त्या प्रमाणें मी जिवंत असतांना तुम्ही चांगली व्यवस्था ठेविली नाहीं. मी मेल्यावर मंदीराची व्यवस्था तुम्ही चांगली ठेवाल अशी आमची तुमच्या वागणुकीमुळें खात्री होत नाहीं. याजकरितां लिहून दिलेलें मृत्युपत्र कायम राहू देण्याची माझी इच्छा बिलकुल नाहीं. कसें म्हणाल तर सियारामदास मारवाडी साधु यांस मंदीरांत राहू देऊं नये व गाई विकू नये अशी माझी सक्त ताकीद तुम्हास होती. परंतु तुम्ही न ऐकतां तुमचे मतानीं गायी विकल्या व साधु याणी माल नेला व पुष्कळ नुकसान केलें तरी त्याजवर तुम्ही दुर्लक्ष केलें. तसेंच गावचे व परगांवचे शेती संबंधानीं व्यवस्था ठेवण्याची जशी होती त्यांत तुम्ही बिलकुल लक्ष पुरविलें नाहीं. पुष्कळ प्रकारानें तुमचा खोटेपणा दिसून आल्या कारणानें मी तुम्हास जें मृत्युपत्र लिहून दिलें आहे. तें रद्द असें समजावें. व रद्द आहे. आतां मृत्युपत्रांत लिहून दिल्या प्रमाण कोणतेच कामाचे अधिकारी तुम्ही राहिला नाहीं. आतां मृत्युपत्र कायम आहे असें समजूनये. दुसऱ्यास मी मृत्युपत्र लिहून देणार आहे. सबब तुम्हास जें मी मृत्युपत्र लिहुन दिलें होतें तें तुमचे गैरवर्तणूकी मुळें मृत्युपत्र रद्द केलें आहे. आणि जें मृत्यूपत्र लिहिलें होतें त्यांत गणेशदास गुरू किशवरदास असें लिहिले गेले आहे तर किशवरदास हे हैद्राबादचे गादीचें नांव आहे. करितां तमृत्युपत्र चुकीचे झालें आहे. म्हणून रद्द केलें आहे. माझे गुरूचें नांव खास रामचरणदास असून त्याचे नांवानि माझे खाते सरकारांत चालू असून दुसरें मृत्यूपत्र खरे नांवाचे मजला करणे भाग आहे. म्हणून दिली नोटीस सही ता० १४-१ ९३ इ०

गणेशदास गुरू रामचरणदासजी महंत सं० श्री बालाजी पेठ खामगांव तर्फे मुखत्यार सुंदरलाल मनूलाल मुनशी राहाणार खामगांव द० खु०

---

### NOTICE

Under rule 12 of the Municipal rules, it is hereby published for general information, that elections, to fill up the vacancies of members in the Akola Municipal Committee who retire on the 31st. March 1893 under the operation of Rule 31 of the Municipal rules, shall take place from 7 A. M. to 5 P. M. on the 6th. and 7 th February 1893. The following table gives for each ward, names of retiring members, date and place of election, names of polling officers and dates before which nomination papers under rule 13 of the Municipal rules should be delivered to the following officers.

| Ward | Name of retiring member | Date of election | Place of election | Name of polling officer | Date before which nomination papers to be submitted |
|---|---|---|---|---|---|
| Ward No 1 | Mr. Hari Ramchandra Anvikar<br>" Vyankatesh Krishna Desai | 6 th February 1893 | Patil's chawry | Mr. Shamsuddin | 29 th January 1893 |
| Ward N. 2 | " Shankar Govind<br>" Govind Vishwanath<br>" Surajmal Govindram | 7 th February 1893 | Grain Market office | " Azizuddin . | 30 th January 1893 |
| Ward 3 | " Vyankatesh R. Mudholkar<br>" P. Thoris. (Died) | 6th February93 | Ton Hall | Cap. R. P. Colomb | 29 th January 1893 |

Dated Akola 14 January 93

B. M. Sathe
Secretary
Municipal Committee Akola

## वर्तमानसार.

अमिराची फौज खोस्ट प्रांतांत जात आहे आणि तुमच्या मदतीस फौज येत असें खोस्टच्या अधिकाऱ्यानें बुलंदखरु लोकांस कळविलें आहे. ही फौज इंग्रजाच्या विरुद्ध उपयोगी पडण्याकरतां असावी असें इंग्रजाचें अनुमान आहे.

इंग्रजसरकार हरकत करणार नाहीं तर अमिराचें कामदार बुलंदखरु प्रांतावर अभिवर्चस्व स्थापन करून करही वसूल करूं लागतील असें इंग्रजांचें अनुशन आहे.

न्यु चमनच्या शेजारीं काबूलचा अमीर हा आपली एक नवी छावणी स्थापन करीत आहे. तेथें फौज किती ठेवणार हें समजलें नाहीं पण बराकी, वगैरे बांधण्याची तयारी चालली आहे.

एक राशियनपत्रकर्ता राशियन सरकारास सांगतो कीं, मध्यएशियाच्या प्रकरणांत इंग्लंडास एक मजबूत ठीसा लगाऊन अफगाण अमीर अबदुल रहमान याच्यापाशीं स्नेह जोडण्याची हल्लींची वेळ फार चांगली आहे.

मीरत येथील छावणींतल्या बंदुका चोरीस जात असल्याबद्दल आतां विशेष प्रकारचा तपास चालू आहे व त्याचा पत्ता लाऊन देणारास इनाम मिळेल असे जाहिरनामेही लागले आहेत.

हिंदुस्थान सरकारानें आपल्या करतां लागणारीं उंटें सोमारी व साकोत्रा येथून आणण्याचा विचार केला आहे.

अफूची जमाबंदी यंदा इतक्यांतच तीस चाळीस लाख रुपये जास्त झाली असें सांगतात.

फैजाबादचा प्रोफे. मि. व्हाइट यांचे २५ १० व १७ वर्षांचे तिघे मुलगे गंमतीनें होड्यांत बसून खेळत असतां होडी बुडाली व तिघेही ठार झाले.

दिल्लीच्या किल्ल्यांत चांगल्या पाण्याचा पुरवठा करण्याकरतां ५२,००० रुपये मंजूर झाले आहेत.

मुंबईचे व्यापारी मि० तुळशीदास लधा याचें चार लाखांचे दिवाळें निघालें असें सांगतात.

कोठा संस्थानानें आपले २०० लष्करी स्वार हिंदुस्थान सरकारच्या स्वाधीन केले.

फ्रान्सांत राज्यक्रांती करणाऱ्या पक्षाच्या मंडळीनें फार चळवळ चालविली आहे.

विलायतचा प्रसिद्ध कवी उइलियम वाटसन वेडा झाला व त्यास वेड्यांच्या इस्पितळांत पाठविलें.

विलायतेस इतका गारठा झाला आहे कीं, टेम्स नदीचें पाणी गोठून गेलें आहे,

वजिरी लोकही आह्मी अमिराची प्रजा आहों असें कबूल करूं लागले आहेत.

पार्लमेन्ट मेंबर मि० समर्स हे मुद्दाम अलहाबादच्या कानग्रेसकरतां विलायतेहून आले असून अलहाबादेस येतांच त्यांस तापानें पच्छाडलें व ते गेल्या रविवारीं मरण पावले! कानग्रेसकरतां आलेले गृहस्थ अशा रीतीनें मेले हें वाईट झालें.

बुलंदखेल येथें इंग्रजी फौज व अफगाणच्या अमिराची फौज यांची एक कडक लढाई होण्याचा रंग आहे व पुष्कळ वजिरी लोक अफगाणच्या पक्षास मिळाले असून ते अगदीं चवताळे आहेत असें सांगतात. ठा० अ०

कोटाच्या राजानें ब्रिटिश सरकारास मदत करण्याकरितां दोनशें सांडणी स्वारांची एक पलटण चाकरीस ठेवण्याची विचार केला आहे.

उत्तर हिंदुस्थानांत धरणीकंपाचा धक्का बसून एक मैल पर्यंत आगगाडीचे रूळ उलथे पालथे झाले व आसपासच्या घरांचा नाश झाला.

एडन येथें २९ वर्षांत दोन वेळांच कायतो पाऊस पडला असें ह्मणतात.

दोन वर्षांपूर्वी जगांत जितकी साखर खपत होती, त्या पेक्षां हल्लीं ४,७०,००० टन जास्त खपते.

लंडन शहरांत जे पात्र खातात त्या पैकीं सात अष्टमांश अमेरिकन गव्हांचे केलेले असतात.

चिनी बागवान फळांची लागवड करण्यांत फार कुशल असतात. लंडनात दर आठवड्यांत सरासरी चोवीस तास सूर्य प्रकाश पडतो.

मेक्सिकोच्या नाटकगृहांत नाटकाच्या प्रत्येक अंकाला पैसे द्यावे लागतात. सोय चांगली!

टर्कीच्या सुलतानाच्या घरांत दहा हजार शेर वजनाची रोटी रोज लागते, असा अनमास आहे.

राशियांत दरसाल ३,००,००,००० तीन कोटी लांकडी चमचे तयार होतात.

सर्व जगांतील संपत्ती सुमारें ६,०,००,००,००० सहा खर्व पौंड आहे असें ह्मणतात.

हिंदुस्थानांतील दगडाच्या खाणीची मंडळी एक दगडाचा हत्ती खोदून तयार करून शिकागोच्या प्रदर्शनाला पाठविणार आहे.

लंडन शहरीं दोन मनुष्य आले आहेत. त्यांची डोकीं इतकी कठीण आहे कीं, त्यांवर संयगरवरी दगड खुशाल फोडावा! क. णू.

तोतया युरोपियन—अलाहाबाद येथील एका नेटिव पेढीवाल्यास मी जाइंट माजिस्ट्रेट आहे असें सांगून एका युरोपियनानें ५०० रुपयांस ठकविलें. त्यावर खटला होऊन त्यास सेशन कमिट केलें आहे. ह्यानें त्या दुकानदारास जी चिटी लिहून दिली आहे तीवर जाइंट माजिस्ट्रेट ह्या हुद्यानिशीं सही केली आहे. हा मनुष्य पूर्वीं मार्निंग पोस्ट नामक इंग्रजी पत्राच्या कारखान्यांत नोकर होता.

अपशकुनी मूल—रावळपिंडी येथील एका भंग्यास एक मूल झालें. तें उपजल्या बरोबर त्यास बत्तीस दांत उगवलेले होते. हें मूल नव्हे, आपल्या कुटुंबावर विघ्न आलें आहे असें कुटुंबांतील सर्वांस वाटलें. त्याच्या पांचव्या दिवशीं त्या कुटुंबांतील एक, आणि तेराव्या दिवशीं ५ मनुष्य मेलीं. ह्या अनुभवावरून तें मूल अभद्र होतें असें ह्मणावें लागतें. शू० सू०

जर्मनीचे बादशहा हिंदुस्थान पहावयास येणार आहेत.

नेपाळचे दिवाण हिंदुस्थानभर फिरावयास लवकरच निघणार आहेत.

गोदोहोनाचें यंत्र—एका स्विडिश कल्पकानें गोदोहोनाचें यंत्र काढिलें आहे, ह्या यंत्रानें गोदोहोन फार सफाईनें व अतिशय लवकर होतें. सु० प०

लिव्हरपूल येथें अमेरिकन कापसाच्या एका वखारीला आग लागून ११,००० गठड्या जळून खाक झाल्या व नुकसान सुमारें ३०,००,००० रुपयांचे झालें.

वाईकर शेखमिरा ह्यांचा सरंजाम आणि इनाम मिळकतीच्या संबंधानें नुक्ताच जो प्रिव्ही कौन्सिलचा ठराव झाला आहे तो फार विलक्षण आहे त्यामध्यें असें तत्व घालून देण्यांत आलें आहे कीं, सरंजामदाराच्या मुलग्याचा बापाच्या सरंजामाच्या मिळकतीवर नाहीं हक्क वराण्यातील कोणत्या पुरुषाकडे ती मिळकत जावी हें ठरविण्याचें काम सर्वस्वी सरकारचें आहे. ह्या ठरावामध्यें घालून दिलेलें हें तत्व सरंजामी आणि वतन मिळकतीच्या मालकास फारच धोक्याचें आहे.

शिकंदराबादेस घर घेतांना व विकतांना निजाम सरकारास ३ टक्के शेकड्यामागे द्यावे लागतात. क. त.

क्युबेकच्या एका लोहारानें पोलादाप्रमाणें तांब्यांस पाणी पाजण्याची रीत काढली आहे. त्याचें म्हणणें कीं ही रीत पूर्वी इजिप्तच्या लोकांस माहीत होती व पिरामिदच्या कामगारांनीं तिचा उपयोग केला आहे. न्या० सु०

इंदूरचे महाराज यांणीं कलकत्त्यास मुद्दाम आगबोटींतूनच जाण्याचा बेत केला. प्रथमतः त्यांनीं शास्त्री मंडळीस विचारलें, व त्यांनीं जाण्यास कांहीं हरकत नाहीं असें सांगितलें. महाराज यांणीं आपले बरोबर ब्राह्मण जातीचे मुत्सद्दी घेतले आहेत इतकेंच नाहीं पण मुद्दाम कित्येक जुन्या तऱ्हेचे शास्त्री पंडित घेतले आहेत. उच्च जातीचे हिंदूनीं समुद्रपर्यटन करावयास हरकत नाहीं, महाराज यांचें हें प्रत्यक्ष उदाहरण घालून देत आहेत; यावरून ते बोलके सुधारक नसून कर्ते सुधारक आहेत, व त्यांच्या उदाहरणाचा खरा उपयोग झाल्या वांचून राहणार नाहीं.

एक दिवस पारीसच्या एका नाटक गृहाचे रंगभूमीवर नाटक चाललें होतें; नाटकामध्यें एखाद्या पात्रानें उत्तम काम केल्यास फुलांचें तुरे व गजरे त्याकडे फेकण्याची चाल आहे. त्या दिवशीं एका पात्रानें आपलें काम चांगलें केलें; तोंच एक बोज्याच्या आकाराचा एक प्रचंड पुष्पगुच्छ रंगभूमीकेच्या बाजूनें त्या पात्रा पुढें येऊन पडला. दी० बं०


## जाहिरात
## हे पाक पाहा

हा हेमंत ऋतु युक्त हिवाळाच खाण्यानें पौष्टीक शक्ती व स्फूर्ती व स्मरणशक्ती मिळेल व हस्तपाद व कटी ठणक व शूळ व सर्व वात विकार नाहींसे खात्रीनें होतात व बाळंतीनीस व सर्वां स्त्रीयांस गुण देणारें सौभाग्य सुंट हे पाक विक्रीस तयार आहेत लागेल त्यांनीं मागविल्यास व्हाल्युपेबलनें पाठऊ. पोष्टेज खर्च निराळा पडेल त्वरकरा गेली वेळ येणार नाहीं.

| | |
|---|---|
| सालम मिसरी पाक द० शे० ८० तो० | ३रु. |
| बदाम पाक | २॥ |
| गोखरू पाक | ७ |
| कुस्मांड पाक | ५ |
| सालम मिसरी व बदाम पाक प्रत २ | २ रु. |
| सौभाग्य सूंट | ३ |

( पत्ता व सही ) शिवचरणगीर रामगीर. वैद्य कुरणखेडकर अकोला गंगाधरचे माडीवर चौकांत दवाखाना. वऱ्हाड

डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग तसचें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तात्काळीन नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा ( मेंदु ) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्हि. छत्रे यांचे दवाखान्यांतव रील सर्व औषधें मिळतील

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही ,, ३ ,, ८८
सळअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ..........................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Annum in arrears, 7 ,,Rs. 5 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition perline 3 as

THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII | AKOLA MONDAY 23 JANUARY 1893 | NO. 4

वर्ष २७ | आकोला सोमवार तारीख २३ माहे जानेवारी सन १८९३ | अंक ४

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक

( दुनियेंचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीचें औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतील थकवा, धातुस्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देतें. कमकुवत मनुष्यास सदृढ बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया यांच्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचें गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उबट्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरिर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेंत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरी होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टॉनिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे. हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॉनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू यांगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clement.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.

### नोटीस.

मलु वल्लद बगाजी गंगेवार बनीये आणि त्यांच्या पक्षांतील लोक राहाणार अकोलें यांसः—

मी खालीं सही करणार नोटीशीनें असें कळवितें कीं, मी हल्लीं ज्या वाड्यांत रहाते तो वाडा कन्हयालाल किंवा झुमकाबाई यांचे मालकीचा नसून तुह्मी माझे अपरोक्ष येऊन घरांतील भिंत पाडली आणि देवाचें कांहीं सामान तुह्मी नेले आणि तुह्मांस असें ही ह्या नोटीशीनें कळविलें जातें कीं, तुह्मी आमच्या घरीं येऊन दंगा वगैरे करून त्रास देता. याज करितां तुह्मांस कळवितें कीं, तुह्मी घरांत येऊन दंगा वगैरे करूं नये. केल्यास त्याज बद्दल मजला योग्य अशी तजवीज करणें भाग पडेल. याज करितां तुह्मास हें अगोदर कळविलें आहे. सदरील लिहिलेले देवाचें सामान नेले व भिंत पाडली या दोन्हीचें नुकसान जें झालें आहे त्याजबद्दल नुकसानी जी तुह्मी केली आहे ती ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत भरून द्यावी. असें केले नाहीं तर तुम्ही जी नुकसानी वगैरे केली त्याज बद्दल रीतीप्रमाणें सरकारांत काम चालविलें जाईल. व तो सर्व खर्च तुम्हावर पडेल. हें अगोदर कळविलें आहे. मी बायको माणूस घरांत आहे. व तुम्ही येऊन दंगा करून त्रास देतां तो देऊं नये. दिल्यास त्याजबद्दल ही योग्य तजवीज केली जाईल व तुम्ही विनाकारण नुसकान करून त्रास देतां याजबद्दल आम्हास ही नोटीस देणें भाग पाडिले. ह्मणून ह्या नोटीशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल म्हणून दिली नोटीस. ता० १८ माहे जानेवारी सन १८९३ इ०

( सही )

निशाणी बांगडी काशी मर्दे गुरू बक्ष अगरवालें राहणार अकोलें इच्या हातची असे.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ६ शके १८१४

१८८१ चा इंडियन फ्याक्टरी आक्ट १९ वो १८९१ च्या ११ वे आक्टा अन्वयें सुधारला आहे तो वऱ्हाड प्रांताला पूर्वीच १८९१ चे २३ आक्टोबरचे इंडिया सरकारच्या हुकुमानें लागूं करण्यांत आला आहे. त्या कायद्याचें कलम १८ व पोट कलम ४ या बरहुकूम नोटीस देण्यांत आली आहे. कीं ठरवून दिलेल्या नमुन्या प्रमाणें दरसालीं जुलै १५ व जानेवारी १५ या तारखेच्या सुमारास सहामाही रिपोर्ट जिल्हा म्याजिस्त्रेटाकडे फ्याक्टरीच्या ताबेदार इसमानें द्यावा.

सदर्हू नमुन्या मध्यें किती पुरुष व स्त्रिया व किती मुलें व मुली फ्याक्टरींत सरासरीनें काम करीत असतात, फ्याक्टरीच्या कामाचें स्वरूप कोणतें आहे आणि रविवार अगर दुसरी एखादी आठवेड सुट्टी असते किंवा न देण्याची त्या फ्याक्टरीला परवानगी आहे, फ्याक्टरींतील प्रत्येक खोलीचा चौरस परिघ, यंत्रालयाच्या खोलीचा विस्तार व प्रत्येक पुढील महिन्यांत किती दिवस सुट्या दिल्या जातील त्याची माहिती इत्यादि गोष्टी कळवाव्या लागतील.

या नोटीशीचा अखेर विचार येत्या मार्चच्या १ ले तारखेस अगर त्या नंतर करण्यांत येणार आहे तेव्हां ज्या कोणाची या नोटीशी बद्दल तक्रार असेल त्यानें ती तक्रार त्या तारखे पूर्वी दाखल करावी. बैल गेला व झोंपा केला असें होऊं नये म्हणून आम्ही मुद्दाम ही माहिती दिली आहे. फ्याक्टरी आक्टा पासून फायद्याच्या ऐवजीं तोटे फार आहेत असा अनुभव मुंबई इलाख्यांत अलिकडे येत चालला आहे आणि पूर्वी पासून ही तसेंच भाकीत होतें. तेव्हां अर्ज करून व तक्रारी काढून ज्या सवलती मिळण्या सारख्या असतील त्या वऱ्हाडांतील लहान मोठ्या फ्याक्टरीवाल्यांनीं मागण्यास चुकूं नये अशी आमची सूचना आहे.

## साऱ्यांत सूट पाहिजे.

यंदा वऱ्हाडांत पाऊस अती [illegible] पडला आणि त्यामुळें पीकें [illegible] बुडाल्या सारखीं झालीं आहेत. [illegible] कपाशीचा हंगाम फार थोडा आहे. ज्वारी रुपया मागे सरासरी आठ आणे हातीं लागेल असें दिसत नाहीं. जवस, तीळ वगैरे पिकें गेल्या पावसानें नाहींतशीं झालीं. आणि सर्व उमेद काय ती गव्हाच्या उत्पन्नावर आहे. शेतकरी लोक नेहमी साऱ्याचा पैसा कपाशी व जवस यांच्या उत्पन्नावर फेडतात आणि तीं पिकें यंदा तर हातीं लागतील किंवा नाहींत याचीच वानवा आहे तेव्हां साऱ्याचा तगादा सुरू झाला ह्मणजे गरीब रयतेला पोट बांधून ज्वारी व गहूं ( ज्यांवर वर्षभर पोट चालणार तीं ) विकावीं लागतील. सावकारांचीं घरें पाहावीं लागतील. सावकाराचा उंबरठा चढल्या नंतर कूळ कर्जमुक्त बाहेर पडणें ह्मणजे त्याला त्याच्या आयुष्याची कमाई व घरदार हीं गमवावीं लागतात. साऱ्यांत सूट मिळण्याची आशा करणें ह्मणजे मनोराज्य करण्या सारखें आहे. गुदस्ता मद्रासेस भयंकर दुष्काळ पडला होता तरी तिकडे देखील साऱ्याची सूट फार थोड्या ठिकाणीं मिळाली. वऱ्हाडांत शेतकऱ्या साठीं तगाई साठीं ह्मणून पैसा दरसाल ६१. रुपये व्याजावर देण्याचा सरकारनें कायदा सुरू केला आहे पण त्यांतील नियमा खालीं सरकारी सारा भरण्या साठीं कर्ज देण्याची सवड नाहीं. वऱ्हाड प्रांताची पुष्कळ वर्षांची शिलक जमा आहे तेव्हां ठिकठिकाणचीं पिकें तपासून पिकाच्या माना प्रमाणें या वर्षी सूट देण्याविषयीं स्थानिक सरकारनें ह्मणजे कमिशनर व रेसिडेंट यांनीं तजवीज केली पाहिजे. आणि लोकांनीं सर्वत्र सभा भरवून अलिजान रेसिडेंट वऱ्हाडांत फिरावयास येतील त्यावेळीं त्यांच्या कानावर सर्व हकीकत घालण्यास बिलकूल आळस करूं नये. हें चळवळीचें व महत्वाचें काम या प्रांतांतील

शिकलेल्या सवरलेल्या, अनुभवी व पुढारी लोकांनीं गरीब व मुक्या कुणबी लोकांच्या कल्याणा साठीं अवश्य केलें पाहिजे आणि ते तसें न करितील तर ते आपल्या कर्तव्यांत चुकले इतकेंच नाहीं, तर सार्वजनिक व लोकोपयोगी सत्कार्यांत हात घालण्याचा त्यांस अधिकार पोचला नाहीं असें ह्मणावें लागेल.

यंदाच्या पिकाच्या हकीकती वरून लोकांच्या ध्यानांत येईल कीं सरकार आपला सारा पैशाच्या रूपानें घेतें त्या पासून प्रजेचें अहित असून सरकार देणें पकि होतो अगर न होवो तें दिलेंच पाहिजे असा दुर्घट प्रसंग येतो. तो धान्याच्या रूपानें सारा वसूल केल्यास टळण्या सारखा आहे. आमच्या इंग्रज सरकारचा खर्च काडीमात्र कमी व्हावयाचा नाहीं त्यास एक वर्ष नापीक झालें तरी खर्च जशाचा तसाच चालविण्या साठीं सारा वसूल करणें भाग पडतें. नेटिव राज्यांत असें असतें कीं अवर्षण अगर अतिवृष्टि होऊन पीकें बुडालीं तर सरकारच्या पदरच्या नोकरांचे पगार हिस्सेरशीनें कमी करून व इतर खर्च कमी करून दुष्काळाचें संवत्सर कसें तरी लोटून नेतात पण इंग्रज सरकारचे अवाढव्य राज्यकारभाराचा खर्च कमी होणें नाहीं तेव्हां अशा कायमच्या पक्या, व ठरीव खर्चा करितां उत्पन्नाची मुख्य बाब म्हणजे काळीचा वसूल हा मुकर, नियमित व वक्तशीर असा वेतलाच पाहिजे आणि अशा सोयी साठींच पैशाच्या रूपानें सारा घेण्याची पद्धत चालूं केली आहे. आम्ही धान्याच्या रूपानें सारा घ्यावा म्हणतो त्याचा अर्थ सरकारनें धान्याचीं कोठारें सांठवावीं असें नाहीं तर प्रत्येक हंगामाच्या वेळीं धान्याचा सारा बाजारभावाच्या दरा प्रमाणें पैशांत वसूल करावा. असें करण्यास नड काय तो पकि किती झालें हें दर वर्षी ठरवावें कसें या प्रश्ना संबंधानें आहे. पण हरएक गांवच्या सामान्य शेताच्या एका एकरा मागें पिकाची आकारणी केली म्हणजे एकदम सर्व सारा ठरविण्यास विलंब लागणार नाहीं. आणि या व्यवस्थेनें सरकारासही पिकें चांगलीं वाईट आलीं म्हणजे जीं सुखदुःखें होतात त्यांचा अनुभव येईल. अगदीं नापीक होई पर्यंत सरकारी सार न थकतां कांहीं वसूल शिल्लक राहण्याचा संभव आहे आणि नापीक झालें तर त्या साली मागील शिल्लकेनें व खर्चाच्या कमतरतेनें कसा तरी वर्षभर निभाव लागण्या सारखा असतो. पण आमच्या सरकारास हे विचार कांहीं उपयोगाचे नाहींत कांकीं तें कुबेरासही दारिद्र्य आणतील.

* बंगाल्यांतील मेमनसिंग शहरचे राजे बहादूरांनीं आपल्या वाड्या लगतच्या गटारांत घाण पाणी तुंबविल्यामुळें सार्वजनिक आरोग्यास धक्का पोचला ह्मणून त्या जिल्ह्याचे अधिकारी मि. फिलिप्स यांनीं तेथील माजिस्ट्रेट मि. हालिफाक्स यांच्या समोर राजे बहादुरांवर फौजदारी केली आणि त्या खटल्याचे पुढील संविधानक इतके खोडसाळपणाचे, दुष्टबुद्धीचे व राजे साहेबांस अपमानकारक आहे कीं, त्याबद्दल उभयतां युरोपियन अंमलदारावर बंगाल सरकारनें ठपका ठेविला आहे आणि त्या दोघेजणांनीं साधारण लहानपणा, वर्तनाचा सरळपणा, व माणसकीचा समजूतदारपणा यांचा वरील खटल्यांत अत्यंत लोप केला आहे असा शेरा लिहून ही लेफ्टनंट गव्हरनर ह्मणतात कीं मि. फिलीप यांनीं हें कृत्य द्वेषमूलक हेतूनीं केलें नसून सार्वजनिक कल्याणा साठीं सद्विचारानें, आणि सद्धेतुक व खरेपणानें केलें आहे. या प्रकरणांत प्रथम सार्वजनिक आरोग्य बिघडलें अशाबद्दल कोणाची तकरार नव्हती व ती गोष्ट राजे बहादुरांस ही कबूल नव्हती; आणि त्या खेरीज खटला उभा केल्या नंतर चौकशी होण्या पूर्वींच राजे बहादूरांनीं मुनसिपालिटी पाशीं एक हजार रुपये अनामत ठेऊन गटार दुरुस्त करून देण्याचें कबूल केलें होतें. खटला चालला असतांना राजे बहादुरांस आरोपीच्या पिंजऱ्यांत उभें केलें होतें, आणि त्यांची मानमान्यता व इतमाम, सरकार दरबारांतील वजनदारी, व लोक कल्याणाच्या कामीं उदारपणा हीं तिळमात्र लक्ष्यांत न घेतां वरील दोघा युरोपियनांनीं स्वल्प काळांत राजे बहादुरांचा गैरलौकिक व मानखंडना करून सोडली.

वरील खटल्याचे कागदपत्र कलकत्याचे प्रसिद्ध बारिष्टर बाबू मनमोहन घोस यांनीं कलकत्ता हाय कोर्टाचे माजी चीफ जस्टिस सर रिचर्ड गार्थ यांजकडे धाडले होते त्यांनीं सर्व बाजूंनीं विवेचन करून नामदार न्याय मूर्तींनीं मि. फिलिप्स यांस दोषी ठरविलें आणि उपसंहारांत लिहिलें कीं या खटल्यावरून तीन गोष्टी व्यक्त होतात त्या अशाः—(१) इंडियांत जे सिव्हिल सरव्हंट माजिस्त्रेटी चालवितात ते फार अन्याय करितात, (२) उच्च प्रतीच्या माजिस्त्रेटांसही फौजदारी काम चालविण्याचे नियम ठाऊक नसतात. त्यामुळें हायकोर्टाकडून फार दक्षतेची पैरवी राहिली पाहिजे; आणि (३) सर्व देशांत न्याय कोडता वरील अधिकारी व मुलकी अधिकारी हे परस्परांच्या हुकमा खालीं नसावेत आणि स्वतंत्रपणें ज्याचा त्याला बिनहरकत आपापला अधिकार चालविता यावा. शेवटला मुद्दा स्पष्ट करिते वेळीं त्यांनीं मि. फिलिप्स यांनीं आपल्या मुलकी अधिकाराच्या जोरावर मि. हालिफाक्स यांच्या कडून राजे बहादुरांस दुर्बल व खोट्या अपराधावर कशी शिक्षा देवविली हें सांगितलें.

सर रिचर्ड गार्थ हे आणखी लिहितात कीं मेमनसिंगाचा खटला हें एक त्या प्रकारचे जे शेकडों व हजारों अन्याय घडतात त्याचें उदाहरण आहे. अन्याय मोडण्यासाठीं कलकत्ता हायकोर्टानें पुष्कळ प्रयत्न केला आहे आणि विलायतेस आल्यावर ही 'खऱ्या खऱ्या गोष्टी' ह्मणून एका पुस्तकांत त्यांनीं ओरड केली आहे पण सर्व फुकट हिंदुस्थान सरकार व विलायत सरकार बहिऱ्या सारखें वागतें आणि राष्ट्रीय सभेची हीच ओरड असल्यामुळें तर सरकार पक्का बहिरेपणा पत्करितें. गार्थ साहेबांनीं बाबू मनमोहन यांस अभिवचन दिलें कीं सरकारनें चौकशी शिवाय फिलिप्स व हालिफाक्स यांचें परित्राण केलें तर आपण स्वतः लार्ड चान्सेलर पर्यंत या खटल्याची दाद मागूं. असो.

येणें प्रमाणें सर रिचर्ड गार्थ यांनीं वर जो अभिप्राय नमूद केला आहे तो ध्यानांत आणून प्रत्येक स्थानिक सरकारनें फौजदारी न्याय चांगल्या सत्वस्थ रितीनें दिला जाईल. अशी व्यवस्था करण्यास माघार घेऊं नये असें आह्मी मनापासून इच्छितों.

* बंगाल सरकारनें जूरीची पद्धत बंद करण्या संबंधानें जो लोकमता विरूद्ध एकाएकीं ठराव प्रसिद्ध केला आणि त्या प्रकरणांत हिंदुस्थान सरकारनें जें प्रांतिक सरकारास पाठबळ दिलें त्या बद्दल कलकत्यास मोठी चळवळ व गडबड उडाली आहे. सभा वर सभा भरत आहेत, वर्तमानपत्रें चोहीकडून ओरड करीत आहेत आणि तशांत इंग्लंडच्या ही वर्तमानपत्रांचे अभिप्राय सरकारी ठरावाला प्रातिकूल असें बाहेर पडत आहेत तेव्हां अशी आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदुस्थान सरकारचे खालील्यावर स्टेट सेक्रेटरी लार्ड किंबरले हे काय शेरा देतात आणि नव्या उद्भवलेल्या वादांगाचा शेवट कोणत्या मजलेला पोचतो हें समजण्या कडे सर्व राष्ट्राचे डोळे लागले आहेत.

कलकत्या कडील वर्तमानपत्रांतून अशा ही खबरा बाहेर येतात कीं लार्ड लान्सडाऊन, त्यांचे कौंसिलदार फिलिप हिचिन्स आणि सर चार्लस इलियट हे आपल्या लेखास व ठरावास प्रतिरोधी असा दुसरा ठराव स्टेट सेक्रेटरी कडून आल्यास आपापल्या कामगारीचे राजिनामे देणार आहेत. किंबहुना तशा प्रतिकूळ हुकूमाच्या भितीनें त्यांनीं आगाऊच राजिनामे दाखल केले आहेत अशी ही लोकवार्ता आहे. या बातमींत सर्व तथ्यांश असेल असें आम्ही मानीत नाहीं तरी स्वमताचे समर्थनार्थ व मंडनार्थ लाट साहेबांनीं असा त्रागा करण्याचा मार्ग स्वीकारला अगर तशा प्रकारचा बागुलबोवा दाखविला तर त्या पासून लोका मध्यें त्याचें हंसें होणार असून आंग्लो-इंडियन अधिकारी नेटिवांच्या राजकीय हक्कांस कितपत बेपरवाईने जपत असतात हें सहजीं कळून येण्या सारखें आहे.

## The Berar Samachar

MONDAY JANUARY, 23 1893.

We are glad to observe that the indexes which are in progress in the work of registration in Berar, are complete as regards the district of Akola. The new indexes are introduced to point out as against each survey—number in a village the one and many reference, as the case may be, to the registered deeds and instruments affecting the tangible innoveable property included in that particular number. The information that is at present available from these indexes extends to the past ten or twelve years and we think that this period is just sufficient to let one know the existence, nature and extent of the rights and liabilities of different persons interested in a particular property. We hope however that if the work of the indexes comprehends all the years since the introduction of the Registration Act in the Hydrabad Assigned Districts the index—books will be a complete departmental volume of sound, useful and instructive information in regard to the highly appreciated property in land. As far as the interests and requirements of the probable parties to the non-testamentary instruments are at stake the indexes that have gone to completion in this district for the last ten years are most urgent and necessary; and when similar ones will be ready for the whole province we hope that the Inspector-General of Registration will arrange to take up the work as regards the rest of the period from the begining of the registration department. Our thanks are due to Colonel Lane and Mr. Chintaman Moreshwar Apte who is a specialist in his work for the preparation of these indexes. We are obliged to them not for the use and application which the Government have in view in regard to indexes but for the ease, facility and accuracy with which the dealings of people will prosper and safely continue with respect to the inmoveable property. Before we make ourselves more explicit in our views we give below the view of the Inspector-General as regards the new indexes:—

"By means of these indexes it will be possible at once to find all documents which have been executed affecting each survey field in each village without difficulty. It is believed that this will be of great use to the officers engaged in the revision of the settlement, for they will be able to take any particular field or groups of fields and trace by means of the documents affecting it their values as shown by the consideration given when they have been mortgaged, sold or leased. The principle of the new form is that the survey field is taken as the unit instead of the village. The village index is broken up so as to group the documents referring to each field under the survey number of that field."

We shall oppose to the last to any enhancement in the revenue demands of govt. however plausibly the latter may try to justify and strengthen, on the basis of such information as these indexes will supply, any argument as to the resettlement of the governmental dues upon the land. This is not the occasion when we should indicate the line of arguments on the other side because we have here to show the advantages of the indexes that are ready for this district.

The new indexes will act as a strong and salutary deterrent in point of litigation. Those who deal in transactions of landed estates will be deemed to have a sort of notice of the previous and prior claims upon a certain specified estate. Whenever they will create a charge on or interest in that kind of property they should, as a matter of form and practice, get all the information of the prior claims over it from the registration-office. The parties will then ascertain the actual value of the property under transaction—which will at once set limits to the mutual dealings and make them as safe and secure as if those were the first transactions.

The doctrine of notice will be far simpler in its operation and the knotty and intricate questions of prior and antecedent claims and the voluminous record of evidences will not as regards future affairs at least recur and multiply with their manifold difficulties. Suits for the claims over the immoveable property will tend to assume an aspect of the simple and direct suits in the Courts of Small Causes.

By—the—by the actual value being known, the land will be exchanged for larger sums than they would have been till now because with the help of these indexes the people will no longer hesitate to invest money in doubts of previous claims of third persons upon it. It is of course true that this will be the case with the property of the value of Rs. 100 or upwards i. e. where the registration

of document is compulsory and not optional. The indexes will then sharpen the trade in proportion as they afford facilities to the transactions in the landed estates.

The indexes will not be without benefit to the department itself. There will be heavy and importunate references to them and at so many times as there will occur transactions with respect to the survey—numbers. We would however like to make a request for the the gains of the department as well as for the interest of those who resort to registration. The inspection—fee of Re. 1 for each reference is a heavy one. Such references ought to be very cheap so as to be of popular acceptance. At the most the charges ought to be 4 As. The cheap rates will increase the registration—work but will pay well in the long run. For an illustration, we may instance the introduction of the postal cards of a pice each and the ample revenue from its general and widespread use throughout.

"The Chief Commissioner of the Central Provinces has strictly enjoined upon the Executive authorities to see that, during his tours, the people are not in any way harrassed and ill-treated by the Police or the Subordinate Executive Officers, who make arrangements for his reception. In no Province is an order of the kind more necessary than in Bengal, whose Governor knows nothing better than to tour. Will he follow the example of the Chief Commissioner of the Central Provinces?"

We would strongly endorse this opinion of the Indian Opinion and request the authorities of this province to give a kind and liberal thought to the subject of the well-known Sarbarai which acts like a curse to the people whose lot is it to supply and arrange for these *Sarbarais*. Better if the system be stoped altogether.

## वऱ्हाड

आलिशान रेसिडेंट मि. टो. सी. क्रोडन यांची स्वारी पुढील महिन्याच्या आरंभीं रेलमार्गानें वऱ्हाडांत येणार आहे.

मे. अजिजुद्दीन एक्स्ट्रा असि. कमिशनर आकोला हे लवकरच फारिन सर्व्हिसवर बलुचिस्थानांत जाणार असें समजतें.

विलक्षण चमत्कार कीं गेल्या शनिवारीं येथील हायस्कुलांतील एका अमृतराव नांवाच्या विद्यार्थ्यांच्या डोक्यांतून अकस्मात ज्वाळा निघून डोकीवरील जरतारी अंजिरी रुमाल पेटला आणि आग विझे पर्यंत शेंडी जळाली व बोटेंही भाजलीं. कारण काय असेल तें परमेश्वर जाणे!

आमचे एक मित्र कळवितात कीं बाळापूरची लायब्ररी चांगल्या स्थितींत नाहीं. ती अशी मोडकळीस कशानेंहि आली असो पण नवीन तहशील्दार रा. रा. कृष्णाजी अनंत व गांवांतील चार शिष्ट लोक मिळून एकदीलानें पुन्हा लायब्ररी सुस्थितीस आणून पोंचवितील अशी आह्मी उमेद बाळगतों. पातुर येथील "श्रीकुमार शंकरसिंह लायब्ररी" विषयीं ते ह्मणतात कीं ती संस्था उत्तरोत्तर उर्जित दशेस येत आहे आणि तिच्या साठीं स्वतंत्र इमारत उभारण्याचा मंडळीचा इरादा आहे ही मोठी संतोषाची गोष्ट होय.

जाह्मास कळविण्यास आनंद वाटतो कीं रा. रा. वामन गणेश यांची तिसरे वर्ग तहशीलदारीवर बढती झाल्यामुळें रा. रा. विठुजी नारायण आक्टि. तहशीलदार यांस वर्ग ४ चे कायमचे तहशीलदार नेमिलें.

आणि या बढतीवारीमुळें अकोल्याचे जिल्हा नाझरची जागा रिकामी झाली आहे तेव्हां ती जागा पक्की पणीं भरते वेळीं जिल्ह्यांतील निरनिराळ्या पगारवाल्या लोकांचे हक्क, विद्वत्ता, व कामांत वाकबगारपणा हीं लक्षांत आणून काय तो निकाल व्हावा असें आह्मी इच्छितों. कदाचित् हक्कदारी, योग्यता व कुशलता हे गूण पाहिले न जाण्याची लोकांस भिती वाटते आणि खरोखर तसा प्रकार घडूं नये ह्मणून आह्मी आरंभींच हें ध्वनित केलें आहे त्याचा वरिष्ट अंमलदारांनीं योग्य विचार करावा.

आज दोन प्रहरीं डेपुटी कमिशनर साहेबांच्या कचेरींत आकोला जिल्ह्याचे अबकारीचा ह्रास होणार आहे

गेल्या १७ वे तारखेस कर्नल मेकेंझी कमिशनर यांची स्वारी मलकापूर मुक्कामीं असतांना त्यांच्या अभिनंदनार्थ तेथील लोकांनीं मोठ्या प्रेमानें एक टूमदार पानसुपारी दिली.

जागले शिपायांचे पगार १॥.–२॥. पर्यंत असत ते पांच रुपये सरकट करण्याविषयीं बहुत वेळां जिल्ह्या जिल्ह्यांतून सूचना होत गेल्या आहेत त्या प्रमाणें पांच रुपये पगार ठरावीक करण्याचें कमिशनर साहेबांनी कृपाळूपणानें अभिवचन दिलें आहे अशी आनंदाची बातमी अकोल्याचे लोक सांगतात.

मे. बहिमनजी जामासपजी दस्तूर सी. आय. इ. यांनीं कर्नल मेकेंझी कमिशनर सी. आय. इ. यांच्या सन्मानार्थ गेल्या बुधवारीं आपल्या बंगल्यावर मोठ्या थाटमाटाची पानसुपारी दिली. रोषनाई, चिराकदान, खाना फोटो काढणें वगैरे श्रीमंतीचे सर्व प्रकार केले होते.

कर्नल मेकेंझी कमिशनर सी. आय. इ. यांचा तळ गेल्या गुरुवारीं येथून हालल्यानंतर स्वारी पायरस्त्यानें बोरगांव, कुरणखेड व मूर्तिजापूर, इकडून आज तारखेला जामठीला जाणार होती आणि त्यापुढें कुरुमाहून २९ तारखेला उमरावतीस पोंचणार आहे.

### नोटिस

रा. रा. हंसराज किसनराम दलाल कंपनी पोकरणी ब्राह्मण राहणार उमरावती यांस—

खाली सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येतेकीं तुमचा एजंट किसनराम याने आमचे दुकानीं बोजे २९ दर १६॥।= प्रमाणें तारीख १३।११।९२ मिती मार्गशीर्ष वद्य ९ रोजीं मारूला विकले त्याचे नांव सरकांत अद्याप दिलें नाहीं करितां नोटिस देण्यांत येतेकीं आज पासून चार दिवसांत नांव लिहून कळावेणें. तसें न केल्यास बाजार भावानें बोजे घेऊन तुमचे नांव भरून घेऊं त्यांत जें नुकसान राहील तें तुमचे नांवें मांडू. तें नुकसान तुह्मी दिल्यास ठीक. न दिल्यास रितीप्रमाणें तजवीज करण्यांत येईल कळावें तारीख २२ जानेवारी १८९३ इ.

(सही) बाबुजी जगन्नाथ दस्तूर हरसुकदासजी दुकान आकोले ताजनापेठ.

### नोटिस

भीमा मर्द नारायण बारी राहणार नांदूरा इजला खाली सही करणार नारायण वल्द जानू बारी राहणार घरणगाव ता. मलकापुर जिल्हा बुलडाना यांज कडून नोटिस देण्यात येतें की तू माझे लग्नाची बायको असून लग्न झाल्या दिवसा पासून तो सुमारे दीड वर्षा पूर्वी पावेतों रीती प्रमाणे माझे घरी राहात होतीस व कधीं कधीं तू आपले आईबापाचें घरी ही जात असे. परंतु ह्या दिड वर्षांत तू आपले आई बापाचे घरीं असतांच तुझ्या आई बापानीं व तू माझेवर खोटी आळ घेऊन अजपार्से सात महिने झाले. मजला नोटीस देऊन खाण्यापिण्याच्या खर्चा बद्दल मागणे केले त्या वरून मी एक टपाल मार्फत रजिस्टर त्यांचें उत्तर ही दिलें. त्यांत लिहिलेच आहे कीं माझी ही नोटीस पावल्या पासून लागलीच तू माझे घरीं यावें मी तुजला वागविण्यास तयार आहे वगैरे मजकूराची नोटीस मी दिली असतां तू अद्यापि माझे घरी आली नाहींस. तशांत मी तुजला माझे घरी आणण्यास दहा पांचवेळां तुजला आणण्या करितां मूळ गाडीबैल देऊन पाठविलें असतां तू आली नाहींस. आणखी उलट माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं तुझा बाप नामे येडू वल्द यादो बारी अमडकार व त्यांचे व तुझे पक्षांतील लोक हे एक खोटी बनाऊ फारकती करून तुझा घरठाव दुसरा करून देणार आहेत. जे लोक तुझे व तुझ्या बापाचे पक्षाचे लोक खोटी फारकती करणार आहेत त्या सर्व इसमा बदल एक अल्हाहिदा जाहिरात या बरोबर दिलीच आहे. आता ह्या नोटीसी वरून तुजला कळविण्यात येते कीं तुजला वागविण्यास तयार आहे तर तू ही नोटीस पावल्या दिवसा पासून एक महिन्याचे आत माझे घरचे डागिणे जे तुझ्या आंगावर आहेत त्या सुद्धा माझे घरीं यावे आणि रिती प्रमाणे वागावे असे न केल्यास तू कबजात मिळणें बदल व डागिण्या बद्दल दिवाणी कोर्टात दावा करून ह्या नोटिसीचे व जाहिरातीचे ही खर्चा सुद्धा भरून घेण्याची तजवीज केली जाईल हें खास समजावें कळावे तारीख २१।१।९३ इ०

सही

नारायण वल्द जानू बारी राहणार घरणगाव दस्तुर जानजी बारी खुद्द.

### नोटिस.

रा. रा. भीमराज मारवाडी दुकान काजीखेडे ता० बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं तुमचा आपचा एक महिन्या पूर्वी एका शुक्रवारीं एक खंडी कापूसाचा सवदा ठरला आणि त्या प्रमाणें कापूस लागलींच तिसरें दिवशीं ह्मणजे रविवारी रुपये रुपये बाकीचे ७७ देऊन एक खंडी कापूस तुह्मी आपच्या वरून नेण्याचा करार केला. व बयाणा १ रुपया देऊन चालते झाला. ठरलेल्या तारखेस तुह्मी हजर न झाल्या मुळें तुमचा बयाणाचा रुपया बुडाला व मला कापूस दुसरीकडे विकण्याचा हक्क पोंचला. दुसऱ्या विक्रींत तुमच्या नशिबानें भाव कमी न आल्यामुळें नुकसान भरून देणें तुह्मास जरूर नाहीं. परंतु या नोटिशीचा खर्च तुमच्या कडून भरून घेईन. फिर्याद वगैरे केल्यास त्याबदलची सर्व जबाबदारी तुमच्या माथी राहील कळावें ता० २२।१।९३ इ०

(सही) सोनाजी वा॥ यादव धनगर राहाणार नेर जानोरी ता० बाळापूर नि० नांगर.

### जाहिरात

रा. रा. एडू वल्द यादोबारी आमडकर, २ जानजी वल्द गोविंदा बारी नांवकुट राहणार नांदुरा व ३ महादू वल्द रायजी व ४ होनाजी वल्द विठोबा बारी राहणार मलकापूर, व ५ भवानी वल्द राजाराम बारी व ६ नारायण बारी राहणार बोदड तालुके भुसावळ जिल्हा खानदेश, व ७ काशिनाथ वल्द निबाजी बारी पोलीस पाटील जळगांव जामोद व ८ गोविंद वल्द खंडू बारी राहणार बाळापूर, ९ भदु वल्द कृष्णाजी उमरकर बारी राहणार अकोले, १० शंकर वल्द जानजी सांगडे बारी राहणार पाहूरजिरें तालुके खामगांव, व ११ त्रिम्बक वल्द गबाजी बारी खरोडकर राहणार धरणगांव तालुके मलकापूर, व १२ रामू वल्द बहादू बारी भुसकटे राहणार पिंपळगांवराजा तालुका मलकापूर हल्लीं नांदुरा, निसबत एडु बारी, व १३ रामचंद्र वल्द सखाराम सांगडे बारी व १४ विठोबा वल्द सखाराम सांगडे बारी, व १५ तुकाराम वल्द नारायण बारी, व १६ बापू वल्द नथू बारी सांगडे राहणार खामगांव, व १७ तुकाराम वल्द साबाजी व १८ मारुती वल्द गबाजी बारी राहणार खामगांव, व १९ त्रिंबकराव गुमास्ते निसबत जोरावरमल्ल दुकान नांदुरा, व २० लक्ष्मण वल्द जानजी लाड बारी राहणार जयपूर कोथळी तालुका खामगांव, व २१ गोविंदा वल्द खंडू बारी राहणार पातूरशेखबाबू तालुके आकोला, व २२ लक्ष्मण वल्द जयराम बारी दुधे, आणि २३ मुकाजी बारी राहणार बारसी टांकळी तालुके अकोलें आणि या शिवाय आमचे जात बिरादर बारी लोक या सर्वत्रांस कळविण्यांत येतें कीं:–

माझी बायको नामें भीमा इचा बाप एडू वा॥ यादो बारी राहणार नांदुरा याजकडून तुह्मी सर्व लोक ता० १४ माहे जानेवारी सन १८९३ इ० रोजीं शनिवारीं माझे घरीं ह्मणजे धरणगांव ता० मलकापूर जिल्हा बुलढाणा येथें सर्व येऊन माझ्या बायको संबंधीं पंचाईत केली असतां कांहीं पंच माझे जवळून विनाकारण फारकती मागुं लागले व कांहीं पंचांनीं ठरविलें कीं, माझे बायकोस माझ्या घरीं आणून घालण्याचें ठरविलें. या प्रमाणें तुम्ही पंचाईत करून तुम्हीं सर्व एकमत करून आपापले गांवीं निघून गेल्यावर ह्याच पंचा पैकीं कांहीं पंचांचे द्वारें मी असें ऐकिलें कीं तुम्हीं सर्व पंच मिळून खोटी एक बनावटची फारकती करून माझी बायको जी भिमी इचा घरठाव दुसरा करणार असें खात्रीलायक ऐकिल्या वरून तुम्हा सर्व पंचास कळविण्यांत येते कीं या अशा खोट्या कामांत तुम्ही सर्वत्रांनीं पडूं नये. जर खोटा पक्ष धरून हें कृत्य कराल तर त्याज बदल तुम्हास जबाबदार समजून योग्य तजवीज केली जाईल कळावे तारीख २१–१–९३ इ०

(सही)

नारायण वल्द जानू बारी दस्तुर जानजी बारी दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार.

पब्लिकवर्क्स डिपार्टमेंटमध्ये एकंदर हिंदुस्थानांत चीफ इंजिनियर १८
सुपरिटेंडिंग इंजिनीयर ४३
एग्झीक्यूटिव इंजिनीयर ३५३
असिस्टंट इंजिनीयर ४६६
सर्व मिळून ८८० आहेत. हे सर्व कायमचे कामगार.

पोर्टलंड जवळ एक तेलाची विहीर खणता खणतां लागली. तीमधून दररोज १०, ००० ग्यालन तेलाचा प्रवाह वहतो.

मुंबईस लवकर लंडनहून फायरब्रिगेड एनजिन मागविलें आहे. ह्या एन्जीनच्या योगानें दर मिनिटास ३६० ग्यालन पाणी उपसून वर फेंकितां येतें.

हिंदुस्थानातील सर्व लहान मोठ्या नद्यांच्या कालव्यांच्या योगानें दोनकोट एकर जमीन भिजते.

निजामाच्या राज्यांत हैद्राबाद येथें पुढच्या डिसेंबरांत व्यापार आणि शेतकी ह्यांचे मुख्य व्यवस्थापक जे सयद महमद हुसेन हे औद्योगिक प्रदर्शन भरविणार आहेत.

लष्करी खात्यातील सर्व अंमलदारास रशियन भाषा शिकून परिक्षा पास होण्याचा हुकुम सुटला.

गायकवाड व होळकर यांच्या उदार आश्रया खाली २ वर्तमानपत्रें निघणार असें समजतें. मा० मि०

स्टांडर्डपत्रावरून असें समजतें कीं, पामीरासंबंधी तंटा मिटवून इंग्लंदच्या न कळत रशियाशी अमिराचा सलोखा करण्या करितां रशियाचे वकील काबूलमध्यें येऊन धडकले आहेत. ही बातमी विश्वासनीय असावी असें मार्निंगपोष्टपत्रकर्त्यांचे मत आहे हें खरें असल्यास अबदुल रहमान यानें लार्ड राबर्टस यांचा जलालाबादेस भेट घेण्याचा बेत एकदम कां बदलला, तो सरहद्दीवर तंटे भांडणे कां उपस्थित करीत आहे व तेथें मोक्याच्या जागेवर जास्त बंदोबस्त कां करित आहे ह्याचा तेव्हांच खुलासा होतो. एकीकडे लढाईची जय्यत तयारी करावयाची व दुसरीकडे रशियाचे लोकांना आपले राज्यांतून हांकवून द्यावयाचे ही अमिराची दुटप्पी वृत्ति प्रसिद्ध असल्यामुळें पुनः अफगाणीस्थावर चाल करून जाणें सेईवार नसतां ही भाग पडेल कीं काय अशी भिती वाटत आहे.

नाशिक व पंचवटी यांस जोडणारा एक पूल तयार करण्यास मद्रास सरकारानें मंजुरी दिली. हा पूल तयार झाल्यावर यात्रेकरू व गांवातील रहिवासी यांस मोठी सोय होईल. न्या० सु०

पेनसिल व्हायन येथील शाळेंत एक मुलगी आहे तिच्या वरून हवा मापक यंत्रा प्रमाणें अगदी बरोबर हवेचें मान कळतें. ज्यावेळेस फार सोसाट्याचा वारा वाहतो, व वादळ होण्याचा संभव असतो, त्यावेळेस तिच्या डोक्यांतील केसाची वर्तुळाकार कडीं बनतात व ती आपल्या वर्गांतील मुली पेक्षां अधिक गडबड करिते. त्या प्रमाणें ऊन पडून हवा स्वच्छ पडावयाची असल्यास तिचे केश पूर्ववत होतात व ती अगदी शांत स्वभावाची मुलगी होते. याचें कारण काय असावें या विषयीं पुष्कळ डाक्टरांनीं तपास केला परंतु त्यांस कांहीं कळत नाहीं.

शिकागो येथील प्रदर्शनांत पाठविण्याकरितां पेनसिल व्हायना येथें एक युनायटेड स्टेटचा नकाशा केला आहे त्याची लांबी १८ फूट व रुंदी २४ फूट आहे. तो फळें भाजी व पाणी आणि एक प्रकारचा क्षार यांचे मिश्रणाच्या तयार केलेला आहे. त्यांत नद्या, सरोवरें ही व्हेनेगार नांवाच्या मद्यानें दाखविली आहेत. नकाशावर आच्छादन घालण्या करितां कांचेची एक मोठी तबकडी तयार केली आहे. या नकाशाची किंमत १९ ००० डालर्स आहे. न्या. सिं.

चिकागो प्रदर्शनास हिंदुस्थानांतील जे लोक जावयाचे आहेत त्यांत कांहीं अगदी जुन्या चालीचे ब्राह्मणही आहेत. नेपाळच्या दरबारी १८ वर्षें दिवाणाच्या पदरीं राहिलेला एक जुना ब्राह्मण पंडितही चिकागोस जावयाचा आहे. जुन्या वेदांतपर कविता ह्मणून चिपळ्या वाजवीत फिरण्याचा या ब्राह्मणाचा धंदा आहे.

हिंदुस्थानच्या यंदाच्या काँग्रेसची मागणीं योग्य व मर्यादीत अशीं आहेत असें विलायतच्या टाइम्स पत्राचें ह्मणणें आहे.

स्माळकाज कोर्टाबद्दल हिंदुस्थानसरकार लवकरच एक नवा अक्ट करणार असून त्यांत या पुढें कोणाही मनुष्यास, दाहा वर्षें बारीस्टरचे किंवा अडव्होकेटचें सर्व जज्जाचें काम केल्यावचून स्माळकाज जज्ज नेमलें जाणार नाहीं असें ठरविणार आहे असें समजतें.

काळ्यापाण्याचे मध्य प्रांतांतले कैदी बनारस आग्रा, वगैरे ठिकाणच्या तुरुंगांत ठेवण्याचे ठरलें आहे असें सांगतात. काळ्या पाण्याची जागा भरली ह्मणून कीं काय? ठा० अ०

आपल्या मुलीची विपुल संपत्ति आपल्यास मिळावी ह्मणून व्हियेना (आस्ट्रिया) येथील एका श्रीमान् जमीनदारानें आपली मुलगी मरण पावली असें १८६० मध्यें जाहीर केलें होतें. ती मुलगी मेली नसून ह्या द्रव्य लोभी बापानें तीस आपल्या जमीनदारींतील एका गुहेंत नेऊन कोंडून ठेविलें होतें. ह्याबद्दल लोकांत हळू हळू चर्चा चालू होती. व पोलिसासही त्याबद्दल संशय होता ह्मणून तेव्हांपासून पोलिसचा एक सारखा तपास चालला होता. तिचा पोलिसास नुकताच तपास लागला आहे. द्रव्य सार्ठी पोटच्या गोळ्यास अंधार कोठडींत ठेवणारा हा बाप कीं कसाई!!

इकडील कापसाच्या बियांस मागणी—युनायटेड स्टेटस संस्थानचा जो वकील कलकत्यास आहे त्यानें व्यापारा करितां इकडे जो कापूस करितात त्याच्या अनेक प्रकारच्या बियांचें नमुने युनायटेडस्टेटस सरकारच्या मागणी वरून मागितले आहेत असें समजतें

अमीर व रशिया—पामीर प्रांतांत मर्घाव येथें रशियाची जी छावणी आहे तिच्या मुख्याकडे अफगाणिस्थानच्या अमिरानें आपला एक मुनीम पाठविला होता. तो अफगाणिस्थानांतून रशियाकडे गेला ही गोष्ट बाहेर फुटूं नये ह्मणून तो वर जाक्सस नदीच्या खोऱ्यांतून काश्गारियांत शिरला, आणि तिकडून मर्वा येथें गेला. तो काय निरोप घेऊन गेला होता हे कळत नाहीं, पण तो गेला याबद्दल इंग्लिशांचें मन स्वस्थ नाहीं. आपल्या वायव्य सरहद्दी नजीक रशियाची कायमता व्हावी असा अमिराचा पुर्ण कल आहे असें अलाहाबादच्या टाइम्स आफ इंडया पत्रास आलेल्या तारे वरून समजतें. शु० सू०

निझाम हैद्राबाद येथील राज्यव्यवस्था सुधारण्याच्या हतूनें तेथें बरेच फेरफार व्हावयाचे आहेत असें वाटत आहे तेथील चीफ जास्टिसच्या कामावर एक युरोपिअन नेमणार व तसेंच मद्रासेहून एक सिविलियन कंट्रोलर जनरलचें काम पहावयासाठीं आणविण्याचा निझाम सरकारचा हेतु आहे असें समजतें. तसेंच एक प्रिवी कौन्सिल नेमून सर्व व्यवस्था चालवावयाची असेंही कळतें. एकंदरींत या फेरफारांत युरोपिअन लोकांचा बराच शिरकाव होईल असें दिसतें आजपर्यंतच्या एकंदर व्यवस्थवरून तिकडे अंदाधुंदी बरीच आहे असें तेथें वारंवार निघणाऱ्या खटल्यांवरून व्यक्त होतें; तथापि निझाम साहेबांनीं दिवाणांच्या मार्फत कडक बंदोबस्त ठेविल्यास फारशी अडचण पडेल असें आह्मांस वाटत नाहीं.

अफगाणिस्थानचे अमीर साहेब येत्या माचे महिन्यांत लॉर्ड रॉबर्टस् ह्यांस भेटण्यास जलालाबाद येथें जाणार आहे.

एका स्कॉटिश व्यापारी कामगाराकडून कळतें कीं,—राशियामध्यें जिकडे तिकडे परशिया जिंकून घेण्याकरितां कडेकोट तयारी चालली आहे सु० प०

बोलन पासून केटा पर्यंत रेलवे करण्या करतां साठ लाख रुपये मंजूर झाले आहेत.

मुलतान येथील जुन्या किल्यावर तोफखाना स्थापन करण्याची तजवीज लष्करी खात्याकडून हल्लीं चालली आहे.

सोमयाग-श्रीक्षेत्र गाणगापूर येथें वे शा. सं. रा. गोविंद दीक्षित गजेंद्रगडकर हे येत्या फाल्गुन शुद्ध पंचमीस सोमयाग करणार आहेत. तर यास सर्वांनीं यथा शक्ति मदत करावी. व यज्ञाचें पुण्याचा अंश घ्यावा. रुपये पाठविणें ते राव साहेब नरसिंगराव तहशिलदार शहाबाद यांजकडे पाठवावेत, अशी गुलबुर्गा समाचार कर्त्यानीं विनंती केली आहे.

निजाम शाईंतील टपालाचा बंदोबस्त—निजामाच्या राज्यांतील ज्या ज्या नेटिव संस्थानांतून सरकारचे टपाल जातें; त्या टपालास दंगा फटका झाल्यास त्याची सर्व जबाबदारी त्या संस्थानिकावर आहे. असा निजाम सरकारानें गेल्या आठवड्यांत एक ठराव केला आहे. स. शो.

## हे पाक पाहा

हा हेमंत ऋतु युक्त हिवाळाच खाण्यानें पौष्टीक शक्ती व स्फूर्ती व स्मरणशक्ती मिळेल व हस्तपाद व कटी ठणक व शूळ व सर्व वात विकार नाहींसे खात्रीनें होतात व बाळंतीणीस व सर्वां स्त्रीयांस गुण देणारें सौभाग्य सुंट हे पाक विक्रीस तयार आहेत लागेल त्यांनीं मागविल्यास ब्हालुपेबलनें पाठऊ. पोष्टेज खर्च निराळा पडेल त्वरा करा गेली वेळ येणार नाहीं.

साळम मिसरी पाक द० शे० ८० तो. २रु.
बदाम पाक २॥
गोखरू पाक ७
कुशमांड पाक ९
साळममिसरी व बदाम पाक प्रत २ रु.
सौभाग्य सूंट ३

( पत्ता व सही ) शिवचरणगिर रामगिर. वैद्य कुणखेडकर अकोला गंगावरचे माडीवर चौकांत दवाखाना. वऱ्हाड

### डा० वामन गोपाळ यांचा सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खाली लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षघाताही भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग तसेंचे सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरें कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुस्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा ( मेंदु ) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा कलप.

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांतवरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही " ३ " ८८
सळअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ....................८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ......०१

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL XXVII AKOLA MONDAY 30 JANUARY 1893 NO. 5

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ३० माहे जानेवारी सन १८९३ अंक ५



## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचे टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीचो औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ठ हव, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांधपानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्त्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तात्काळ नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूळ झाला, कंबरेत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरि होणें परमा व गुप्तस्त्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टॅनिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे. हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रेनें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांधयाकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clement.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्टिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांधयाचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.


---

### बक्षीस. ( रु० ५० )

खालीं सही करणार याजकडून सर्वत्रांस जाहीर करण्यांत येतें कीं, माझे दुकानदारीच्या वह्या संमत १९४३।१९४४ या दोन सालच्या वह्या पांच त्यांत कीर्द, २ खतावण्या २, व संमत १९४१ ची हिशोब वही १, असे पांच वह्या. आणि सोन्या वा। रावो महार, जानक्या वा। रामा महार, हासम वा। शामहमंद याचे हुकुमनाम्याची नकल व रामजी वा। वाहदन तेली व सिताराम वा। रूपचंद पाटील यांचे हुकुमनाम्याची नकल व याशिवाय दस्तऐवज वगैरे चोरीस गेले आहेत तर सदरहु कागज जो कोणी आम्हास आणून देईल अगर याचा पत्ता सांगेल त्यास आंम्ही ५० रुपये इनाम देऊं म्हणून दिल्हा तारीख २६।१।९३ इ०

( सहीं )

हिऱ्या वल्लद चांगो माहार
पिंपळगांव काळे
दस्तुर खुद.

---

### नोटीस

लक्ष्मीबाई कोम खंडेराव गवळी राहणार घर नंबर १८१ पेठ कसबा शहर पुणें इजला.

खालीं सही करणार यांजकडून नोटीसीने कळविण्यांत येतें कीं तुह्मी तुमच्या घराच्या दुसऱ्या मजल्यावर जी मोरि केली आहे आणि जी हल्लीं खुली आहे तिच्यामुळें आमच्या शेजारच्या नंबर १८२ च्या घराचे नुकसान होतें मोरिचे पाणी आमच्या त्या बाजूकडील भिंतीत मुरतें आणि मोरीच्या घाणीनें आमच्या घरची स्वच्छता बिघडते तेव्हां ती मोरी बंद करून किंवा तिचें पाणी दुसरीकडे सोडून देऊन आमच्या घराची नुकसानी दूर करावी. तसें न केल्यास सरकारी हुकूमानें तुमच्या कडून मोरीची व्यवस्था होई पर्यंत जे इमारतीचें नुकसान होईल व त्या मोरि मुळें आमच्या घराच्या भाड्याचे उत्पन्नांत नुकसान होत आहे तें सर्व नोटीशीच्या खर्चासुद्धा कोर्ट मार्फत वसून घेतलें जाईल. नोटीशीचा जबाब ८ दिवसांच्या मुदतींत न पोंचल्यास आह्मास नीट वाटेल ती तजवीज करण्यांत येईल. कळावें तारीख २४ जानेवारि १८९२ इ.

( सही इंग्रजींत )

रामचंद्र गोपाळ ढेरे
शहर आकोला
वऱ्हाड.

---

दृष्टं कमपि जगत्यस्मिन्
निर्दोषं निर्गुणं हिवा॥

( ३ रे अंकावरून पुढें चालूं. )

तसेंच वख्त आला म्हणजे आपल्या घरांत हे खुषमस्कऱ्यांचे पेंढार मारून लपलूट मांडतील अशी कल्पना तरी त्याच्या मनांत येईल काय? परंतु असा प्रसंग जेव्हां मूर्तिमंत येऊन बेततो तेव्हां त्या बाळा साहेबांचे डोळे उघडतात. व ज्यांना आपण चांगले लोक समजत होतो, ते निव्वळ स्वार्थपटु दुष्ट, चांडाळ, अधम, दुरात्म होते असें मग वाटूं लागतें. मग त्याला "असतील शितें तर जमतील भूतें" ह्या वचनांची पूर्ण साक्ष पटते पण ही गोष्ट मग कळून उपयोग काय? ती अगोदरच कळली पाहिजे. ही गोष्ट त्याला अगोदरच कळत नाहीं. यांत त्याचा कांहीं अपराध नाहीं. ह्मणून तरुण जनांस या जगांत दुष्ट लोक आहेत त्यांची ओळख जो करून देतो तोच खरा उपदेशक व खरा उपकारी.

मनुष्याला ईश्वरानें विचार करण्याची शक्ति दिली आहे. बरें कोणतें वाईट कोणतें हें समजण्याची किंवा समजून घेण्याची अक्कल त्यांच्यामध्यें आहे. व ह्मणून त्यांच्या अंगामध्यें दुष्टभाव-असावा, अधम कृत्यें करण्यास त्याच्या मनांत प्रेरणा व्हावी हें विसंगत व विशेष चमत्कारिक दिसतें. परंतु नीच व चांडाल कर्में मनुष्याच्या हातून होतात ही गोष्ट सर्वसिद्ध आहे. क्षणोक्षणीं त्याचीं उदाहरणें आढळून येतात. असो. ही गोष्ट विचारशक्ति ज्यांना दिली आहे त्यांची झाली.

आतां ज्यांना विचार करण्याची शक्ति नाहीं, अमुक बरें व अमुक वाईट हें जाणतां येत नाहीं—किंवा येत-असल्यास फारच थोडें-अशा पशुपक्षादिकांची गोष्ट घेऊं. या प्राण्यानां उपजतबुद्धि दिली आहे असें ह्मणतात. असें धरून चाललों तर त्यांच्यामध्यें "दुष्टपणा" हा नैसर्गिक किंवा उपजतच आहे असें ह्मणावें लागतें. वसंत ऋतूला आरंभ झाला ह्मणजे फुल पांखरें उत्पन्न होतात. तीं जात्या अगदीं मुग्ध व निरुपद्रवी अशीं असतात परंतु तीं जेव्हां इकडून तिकडे, या फुल झाडावरून त्या फुल झाडावर मोठ्या मौजेनें उडत असतात. तेव्हां अशा तऱ्हेनें विहार करीत असतांनां मध्येंच एखादी चिमणी त्या पैकीं एका दोघांवर झडप घालते व आपल्या चोंचींत त्यांनां धरून आपल्या पिलानां चारा ह्मणून आपल्या घरट्यांत त्यांनां घेऊन जाते. बरें ही चिमणी एखादे वेळेस दाणे वेंचीत असतानां एखादें मांजर टपलेलें असतें तें तिच्यावर उडी घालतें व मांजरांच्या भक्ष्यस्थानीं पडतें. पुन्हा हें मांजर जर एखाद्या कुत्र्यानें पाहिलें व त्याच्या आटोक्यांत तें जर मांजर आलें तर तो कुत्रा त्या मांजराला धरतो व त्याच्या चिंधड्या चिंधड्या करून त्यास ठार करतो. जीस बिचारी, गरीब ह्मणून आपण ह्मणत होतों तीच चिमणी दुष्ट आहे, घातुक आहे असें आपण ह्मणतों. आतां ईश्वराच्याच मनांतून हा "दुष्ट भाव" जगांत ठेवावयाचा आहे कीं काय तें त्याचें तोच जाणे. इतरांस त्याचा थांग लागणें कठीण!

आतां जगामध्यें असा सर्व साधारण नियम आहे कीं कोणती ही चीज जर जात्याच चांगली असली तर ती चांगली आहे हें कांहीं प्रमाणांनीं सिद्ध करावयास नको. गाणें सर्वत्रांस आवडतें तें सर्वांनां आवडतें किंवा नाहीं हें समजून घेण्यास "तुह्मांला गाणें आवडतें काय" असें प्रत्येकास विचारण्याची कांहीं गरज नाहीं. तसेंच एखादें चित्र जर खरोखरीच खुबीदार, मनोहर व सुबक असलें तर तें सुबक आहे, चित्तवेधक आहे, हें कोणी ही सांगेल. तीच गोष्ट "सद्गुणाची" आहे "सद्गुण" अंगीं असणें हें चांगलें आहे हें सिद्ध करण्यास दुसऱ्या गोष्टीं पुढें आणण्याची कांहीं जरूर नाहीं. "सद्गुण"

अगीं असला ह्मणजे जो एक प्रकारची विलक्षण शोभा येते तीच शोभा तो असणें चांगलें आहे किंवा नाहीं या बद्दल मोठें स्वतःसिद्ध प्रमाण आहे. इतर प्रमाणाची अवश्यकता मुळींच नाहीं. ह्मणून जो सद्गुणी आहे, जो सदाचारी आहे, जो धर्मशील आहे त्याला या जगामध्यें दुष्टपणा असेल तरी कस असें जें वाटतें त्यांत आश्चर्य तें काय? कारण स्वार्थ ह्मणजे काय हें त्याला मुळींच माहित नाहीं. परहित करणें हेंच त्याचें ब्रीद. मनोविकारांचें त्यांच्या पुढें कांहीं चालत नाहीं. ते अगदी निर्बळ होतात. लोकानां फसवून आपली तुंबडी भरण्याचें पेच त्याला अवगत नसतात. "संगति संग दोषेण" या जनोक्तीचें भय बाळगण्याचें त्याला बिलकूल कारण नसतें. दुनियेमध्यें "प्रापकर्ममाला" जी चालली असते तींत त्याचें अंग तिळमात्र नसतें. लोकांना टाकून बोलणें, दुरोत्तरें करणें, अपशब्द मुखावाटें काढणें, दुसऱ्याचा अपमान इत्यादि गोष्टी जर हातून झाल्या तर मी मोठीं पातकें केलीं अशी त्याची समजूत असते. असें जर आहे—हा जर खरा प्रकार आहे—तर मग त्या पुण्यवंताला या जगांमध्यें सर्वच पुण्यवंत, प्रामाणिक, नीतिमान् , सत्यशील आहेत असें वाटतें यांत नवल तें काय? हें वाटणें साहजीक आहे.

( पुढें चालूं )

---

नोटिशीची दुरुस्ती

रा० रा० हंसराज किसनराम दलाल कंपनी पोकरणी ब्राह्मण राहणार उमरावती यांसः——

तारीख २३ जानेवारी १८९३ च्या 'वऱ्हाडसमाचार' पत्रांतून तुह्मांस जी नोटिस दिली आहे तिच्या सहावे ओळींत 'किसनराम' असें छापलें आहे. तर तेथें 'शंकरलाल' असें समजावें. कळावें. ता० २३-१-९३ ई०

( सही ) बाबूजी जगन्नाथ दस्तुर हरसूकदासजी दुकान अकोले ताजना पेठ.

---

## जाहिरात

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ४ प्रमाणें.

र. नं. ११ क्लास नं. १५ पैकीं मि. नंबर २—३ १८९३

वि. अंबादास संतो सिव्हिल जडज्य साहेब जिल्हा वाशीम यांचें कोर्टांत.

अर्जदार भगवान वा। मारुती देशमुख राहणार कांट ता० वाशीम जि० वाशीम यांस मयत.

मारुती वा। आत्माजी राहणार कांट ता० वाशीम व आनंदराव व दवलतराव व संपती वा। कोंडजी राहणार कांट ता० वाशीम यानें मयत कोंडजी वा। नवलाजी देशमुख राहणार कांट ता० वाशीम यांचे वारसाचे सरटीफिकिट मिळावें ह्मणून ह्या कोर्टास उभयतांनीं अर्ज केले आहेत त्यान करितां सदर्हू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचें द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता० १४ माहे फेब्रुवारी सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयी लेखी हकीकत दाखल करावी. आज ता. २० माहे जानेवारी सन १८९३ इ.

अंबादास संतो
सिविल ज्यडज्य.
जिल्हे वाशीम.

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध १३ शके १८१४

* जूरीची पद्धत बंगाल्यांतील सहासात जिल्ह्यांत सुरू होऊन आज सुमारें तीस वर्षें होत आलीं तरी या न्याय प्रकरणांतील हक्काला एका पिढीच्या वहिवाटी नंतर तेच लोक नालायक ठरावेत हा चमत्कार होय! दिवसानुदिवस प्रजा शिकलेली, अनुभवी, व न्यायपथावलंबी अशी इंग्रजी विद्यामृतानें होत चालली आहे आणि ज्यूरीची न्यायपद्धत सर्वत्र परूढ करण्या विषयीं लोकांचे प्रयत्न चालले आहेत अशा वास्तविक गोष्टी बाजूस टाकून हल्लींचे व्हाईसराय हे ती पद्धत मोडून टाकण्यास आपला जोरा चालवीत आहेत. हा राजकर्त्यांची क्षुद्र दृष्टी व अपमतलबीपणा पाहून राष्ट्रिय सभा हिंदुस्थान सरकारच्या कृतीला सदोदित कां नांव ठेवितें तें सहजी उमगेल. मोठमोठ्या अपराधांच्या चौकशीच्या वेळीं म्हणजे राजद्रोहाचे, अशांततेचे, मनुष्यवधाचे असे महान अपराधांची चौकशी करणार न्यायाधीश बहुतेक सर्व गोरे लोक आहेत त्यांच्या मदतीसाठीं व न्याय बरोबर काटेतोल होत जावा ह्मणून जूरर ( पंच ) कांहीं जिल्ह्यांतून नेमण्याची वहिवाट आहे. आणि जूरीच्या अभिप्रायाशीं आपला निवाडा न जुळल्यास तो खटला हाय कोर्टाकडे धाडण्याची न्यायाधिशाला सवड आहे ह्मणजे जूरीच्या अभिप्रायावर शास्ता ह्मणून निराळें न्यायदरबार असल्या मुळें जूररचे नियमित हक्क मर्यादित व संकूचित झाले असतांही सरकारची ढवळाढवळ चालूं आहेच! निरनिराळ्या इलाख्यांतील जूरीच्या पद्धती संबधानें न्यायाधिशांनीं आपापले अनुभव सांगितले आहेत. त्यावरून एवढेंच दिसतें कीं, अद्याप जूरीच्या पद्धतींत सुधारणा करण्यासारख्या पुष्कळ आहेत पण त्यावरून ती बंद करावी असें कांहीं ह्मणतां येत नाहीं. आणि जर खरोखर ही न्यायपद्धति चांगली नसेल तर विलायतेंतही ती मोडून टाकली पाहिजे आणि हल्लीं ती अर्धवट रितीनें ह्मणजे कांहीं अपराधा पूरती व कांहीं जिल्ह्या पूरती बंद केली आहे ती सर्वैव सर्वत्र बंद असली पाहिजे. ज्या अपराधासंबधानें सध्यां जूरीचा अधिकार काढून घेतला आहे असे अपराध गेल्या पांच वर्षांत ७०० होते आणि त्यांत शेकडा १३.८ खटल्यांत न्यायाधीश व जूरर यांच्या मतांत अंतर पडलें आणि त्यापैकीं शेकडा ८.८ खटले हायकोडताच्या निवाड्या साठीं धाडले त्यांत फक्त ४.८ खटल्यांत जुरीच्या अभिप्रायांत हायकोडतानें फेरबदल केला असें आढळतें. आणि हें प्रमाण कांहीं मोठें नाहीं. सूक्ष्मदृष्टीनें पाहतां खालील कोडताचे निकाल परतले जातात अशा फौजदारी खटल्यांचें प्रमाण वरील प्रमाणा पेक्षां फार मोठें पडेल अशी आमची खातरी आहे पण तेवढ्या वरून खालील कोडतांवर न्यायाधीश वरिष्ठ कोडतांच्या दर्ज्याचे कां नेमू नयेत? जुरी कडून अन्याय घडतात त्या पेक्षां माजिस्ट्रेटाकडून फार अन्याय घडतात असें सिद्ध झाल्यास त्याबद्दल सरकारनें काय योजना केली आहे न कळे! न्यायाधीशाला जूरी ह्मणजे मंत्री व प्रवर्तक असतो ह्मणजे त्याला आपला एककल्लीपणा, गैरसमजूती व कायद्याकानूचा दुरुपयोग हीं अंमलांत न आणण्यास जुरी हा एक बडा मुत्सद्दी दिला असतो आणि जुरीलाही न्याय देवतेला स्मरून यथान्यानें करून कायद्याची अंमलबारी करितां होण्या साठीं न्यायाधीश हा मार्गदर्शक असतो. न्यायाधीश आणि जुरी यांचा मिलाफ व एकविचार उत्तरोत्तर होत जाऊन शेवटी न्यायाचे दरवाजे अधीकाधिक खुले होतील अशी उदात्त विचारांची दिशा न स्वीकारतां हिंदुस्थान सरकारनें नागबोडीचा. अपायकारक व स्वेच्छाचारीपणाचा रस्ता धरला हें आपल्या देशाचें दुर्भाग्य मानलें पाहिजे!

---

थोडे दिवसा पूर्वी मुंबई युनिव्हरसिटीच्या सिनेटची सभा भरली होती त्यावेळीं मेडिकल कालेजांत विद्यार्थी शिकण्यास येण्यापूर्वी तो प्रव्हीमस, इंटरमिजिएट, किंवा फर्ट्ट बी. एस. सी. अगर बी. ए. ची युनिव्हरसिटी—परिक्षा उतरलेला असावा अशा मतलबांच्या सूचनांचा विचार झाला त्यावरून हल्लीं युनिव्हरसिटीचा विद्याक्रम कसा वाढला आहे व हर्षे हर्षें वाढत आहे हें कळून येईल. मेडिकल कालेजेंच प्रोफेसर ह्मणतात कीं त्यांच्या कालेजांतील अभ्यासक्रम म्याट्रीक्यूलेशन परीक्षेंत पसार झालेल्या उमेदवारांच्या हातून झेंपत नाहीं त्या अर्थी ते आर्ट्स शाखेकडील निदान प्रीव्हीयसची परीक्षा उतरलेले असले पाहिजेत असा युनिव्हरसिटीनें नियम करावा. तसा नियम लवकर न होईल तर मेडिकल कालेज युनिव्हरसिटीला जोडलें आहे तरी तिच्या ते ताब्यांत नाहीं तर मुंबई सरकार मार्फत फक्त म्याट्रीक्युलेशन पसार झालेल्या विद्यार्थ्यांस कालेजांत न घेण्याचा मनाई हुकूम निराळा काढला जाईल अशीही डाक्टर ग्रेसाहेबांनीं धमकी दिली. पी. इ. ची परीक्षा ही मेडिकल कालेजची प्रवेश परीक्षा व्हावी अशी मूळ सूचना होती. तिजवर दुसरी अशी सूचना होतीकीं जर पी. इ. परीक्षे सारखी अट ठेवणें असेल तर तिच्या ऐवजी भक्रमशी बी. ए. च्या परीक्षेची अट ठेवावी. जुनी पी. इ. बंद केल्यामुळें नव्या पी. इ.चे अभ्यास थोडे आहेत त्या अर्थी मेडिकल शिक्षणाला आवश्यक अशा विषयांचें ज्ञान होण्या साठीं इंटर मिजिअट परीक्षा प्रवेश परीक्षा करावी ह्मणून सूचना होती तिला अनुमोदन देतेवेळीं डाक्टर भांडारकर बोलले कीं हल्लीं म्याट्रीक्युलेशन परीक्षेला प्यारा-फ्रेज आवश्यक नसल्यामुळें व ग्रीस व रोम यांचें इतिहास नसल्यामुळें अभ्यास घोकंपट्टीचें फार झाले आहेत आणि वकील जे लोकांच्या मालमत्तेचें संरक्षण करितात त्यांना बी. ए व्हावें लागतें, एंजिनीयर जे आपलीं घरें बांधतात त्यांनी पी. इ. परीक्षा द्यावी लागतें तर ज्या भावी वैद्यांच्या हातीं आमचे जीव द्यावयाचें आहेत त्यांना तशीच एखादी परीक्षा देणें जरूर आहे हें अधीक स्पष्ट करणें नलगे. हा वादांतील कोटी खरोखर यथार्थ असेल तर आमच्या मतें एम. ए. झाल्या शिवाय कोणाही विद्यार्थ्यास मेडिकल कालेजांत घेऊं नये. हल्लीं प्रमाणें गणिताचा विषय डाक्टर भांडारकारांला बी. ए. व एम ए. होण्यास आवश्यक असतां तर कित्येकांचें ह्मणणें आहे कीं त्यांच्या ज्ञानाचा अत्युज्वल दीप सध्यां प्रकाशित आहे तो कोठतरी कोना कोपऱ्यांत पडला असतां आणि नंतर डाक्टर साहेबांस त्यांच्या ह्मणण्याचें खरें स्वरूप समजलें असतें. विलायतेहून जे इंडियांत प्रोफेसर होऊन येतात त्यांना त्यांच्या विवक्षित विषया पलिकडे कितपत ज्ञान असतें याचा आह्मास पक्का अनुभव आहे आणि त्यांच्या त्या मानानें पाहिलें तर इकडचे म्याट्रिक्यूलेटेड त्यांना कित्येक विषयांत खात्रीनें मागे सारतील. अलिकडे उच्च प्रतीच्या शिक्षणा संबंधानें सरकारची अनास्था वाढत चालली आहे आणि दुसऱ्या बाजूनें युनिव्हरसिटीनें निरनिराळ्या परीक्षांचे भलभलते अडथळे वृथा आणले तर त्याचा काय दुष्परिणाम होईल व तो कोठवर वाढेल त्यांचें कांहीं अनुमान करितां येत नाहीं.

पण वरील सूचनांचा निकाल अद्याप पावेतों झाला आहे तो समाधानकारक झाला आहे हें दुःखांत सुख मानलें पाहिजे सर्व सूचना बहुमतानें नापसंत ठरल्या आणि त्या मागून डाक्टर मोरश्वर गोपाळ देशमुख यांनीं म्याट्रीक्युलेशन परीक्षाच मेडिकल कालेजची प्रवेश परीक्षा कायम ठेविण्याची सूचना आणिली होती ती बहुमतानें पसार होऊन सिनेटचें पुढील काम गेल्या सोमवारी मोठ्या खडाजंगीचें झालें.

---

'वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाज' चे सेक्रेटरी रा. रा. गणेश विनायक हे सर्व लोकांच्या माहितीसाठीं कळवितात कीं गेल्या १५ वे तारखेस उमरावतीस सभा भरून खालील चार ठराव पसार करण्यांत आले:—

१ यंदा रेसिडेन्सी आरडर्समध्यें शिमग्याची सुटी एक दिवस देण्याचा हुकूम आहे तेव्हां सर्व सभासदांस एकत्र जमता येणार नाहीं ह्मणून यंदाचा समाज पुढें पाडल्याला ह्मणजे तारीख १९ व २० मार्च रोजीं भरविण्याचें ठरलें.

२ मेहेरबान डायरेक्टर साहेब बहादूर यांजकडेस अर्ज करावयाचा कीं वऱ्हडांतील विद्यार्थी जे एल. एल बी. ची परीक्षा पसार होतील त्यांस वऱ्हाडांत वकिली करितां येण्यासाठीं तीन वर्षें पर्यंत मुंबई हायकोर्टांत वकिली नव्या सरक्युलरा प्रमाणें करावी लागतें तर हें सरक्युलर तेवढें दुरुस्त करण्यांत यावें.

३ वऱ्हाडांत ज्या विद्यार्थ्यांनीं स्कालरशिपा मिळवून कालेजांत विद्या संपादन केली त्यांनीं निदान सदर्हू स्कालरशिपचे पैसे गरीब विद्यार्थ्यांचे कालेजांतील शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करावे.

४ समाजाकरितां कायमचा सेक्रेटरी नेमणें या बद्दलचा विचार करणें.

शुक्रवारीं सायंकाळीं येथील नेटीव जनरल लायब्ररीचे व्यवस्थापक मंडळी कडून मि. अजिजुद्दीन यांस पान सुपारी देण्यांत आली. रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत बी. ए. एल. एल. बी. यांनीं आरंभीं मि. अजिजुद्दीन यांचा मोठा गौरव करून त्यांचे चरित्रांतील ग्राह्य गोष्टी कथन केल्या आणि ते म्हणाले कीं मुनशी स्वभावानें अविचारशील व अधीर नसते तर त्यांच्या सारखा न्यायमूर्ती विरळा सांपडेल. नंतर मि. हकीमुद्दीन यांनीं उर्दूंत मि. अजिजुद्दीन यांची फार वाखाणणी केली. त्या संभाषणावर प्रत्युत्तर देते वेळीं मि. अजिजुद्दीन यांनीं सर्वांचे आभार मानून आपली शिक्षणा बद्दलची कळकळ दाखविली. पानसुपारी सारखा तमाशा करण्या पेक्षां लायब्ररी साठीं पुस्तकें अथवा इतर सामान विकत घेतलें असतें तर फार संतोष झाला असता असेंही ते बोलले. आनंदाच्या भरांत त्यांनीं यावन्मरण लायब्ररीचे सभासद राहीन असेंही अभिवचन दिल्या वरून त्यांचे विशेष आभार मानण्यांत आले.

# The Berar Samachar

MONDAY JANUARY, 30 1893.

## SHEER INJUSTICE

### ( अंधेर नगरी )

Captain Morris, the Deputy Commissioner of Akola, deserves the blame for placing *a wrong man in the wrong place.* Unless better and more cogent explanations come forth we shall be perfectly right to condemn his action in filling up the post of the district Nazir of Akola. He may be unconscious and unaware of the effects of his doing. In a little puddle of limited appointments within his giving if he were to show that regard and respect for the claims of gentlemen under him he disappoints us in connection with his appreciation of merit and worth, service and pay, and learning and ability. He posted Mr. Deviram Kondaji to the District Nazirship of Akola, viz, he promoted a man on Rs. 20 to the pay of Rs. 75. We may have personally no objection to the appointment—nay may we even join in the jubilations of Mr. Deviram and his friends. This appointment marks the utter break-down of every just, sound, and right principle. There are many men who are right claimants to the post. Their salaries range between Rs. 25 and Rs. 80. So many persons are put in the back-ground. The insult, humiliation, and disappointment of these men is indeed great and we see no reason why Captain Morris did take such a perverse course as this. May we question here whether he was labouring under very trying and strange influences from outside? It speaks ill of him had he not the good heart and moral boldness not to do what is a matter of flagrant injustice. By a fiat of deviation and undue favouritism he has hurled down a bad instance which it will be more honorable for his superiors to break than to follow.

As a rule men do not question the rightness of a thing when a stranger is placed in a high post. They trust the nominee with a higher merit and learning and resign with good grace their rights and claims. Mr. Deviram was neither a stranger nor had he any such distinguishing quality. There was not also the force of promoting him from one grade to another within however a short period of service and of blinding the eyes of his fellow-servants with the dust of gradual rise.

We note this case because we think it needs the exercise of higher authorities to undo what is now done. Both the Judicial and Revenue Commissioners can not do better than to ask for an explanation of it We challange every right-minded man to justify on the least solid grounds of reason and argument the appointment under notice. But the report says that the Commissioners will do nothing but silently let the matter glide on because they wished it to so. We request then Captain Morris himself to review what he has done. Colonel Mackenzie may also set the matter right. But our final haven of trust and confidence is Mr. Plowden the Resident. We urge him earnestly to lend a moment's thought and then we are certain that his strong sense of right and due appreciation of merit will help him on to cancel the order of the Deputy Commissioner of Akola.

Marriage is a tie which binds a man and woman together in a relation which creates new duties and liabilities of its own. It lays down the basis of an union which should be the harbinger of happiness and prosperity. But the present systems of marriage, the early unions of husband and wife, the want of sufficient funds to maintain the growing family from the marriage, the insufficient training of mental faculties and all such defects and shortcomings combine to make marriage what it ought not to be. The crude idea is that marriage is a necessity while it should be a luxury to be enjoyed in the harvest time of a man's life. There is a change of ideas as regards the girlhood in particular and we quote below a stirring appeal from the pen of an English lady who preaches deferred marriages in view of the new duties that the advancement of knowledge and learning presents to us:—

"Dare we, when such vital interests are at stake, when every where the petty personal view is giving place to the wider and nobler range of universal brotherhood—dare we defraud our capable maidens of their rightful share in the onward movement? May we not set before them daily, hourly, in lieu of the rapid round of dissipation to which we have heretofore doomed them, the high ideals of self-sacrifice and urge them to a participation in the great work of that world of whose claims they, for the most part, are lamentably ignorant."

The para culled below from the review of the Local Fund report by the Resident will point out the sources of that Fund lately handed over to the custody of the District Boards in Berar:—

"*Income of District Boards.*—The total amount including opening balance and income of the year available for expenditure by the five District Boards reached the respectable sum of Rs. 6,96,737. An analysis of the different sources of income brings to light variations in the condition of the districts which deserve the Commissioner's attention. Under "Town Fund" the year's income varies from nearly Rs. 50,000 in Amraoti to Rs. 16,000 in Basim, but "Town Fund" comprises three different sources of receipt, and in future reports the amount obtained from each head should be given for every district. The bazar cess yields nearly Rs. 8,000 in Buldana, and only Rs. 5 in Akola and Rs. 120 in Basim; the reason for such wide divergency should have been noted. The facts as to the income from Road Fund are not very clearly stated in paragraph 8 of the report; and the Resident fails to understand why the receipts in the Ellichpur district from this source were only Rs. 560. By clause (*d*), section 22 of the Berar Rural Boards Law, the entire portion of the land revenue set aside by Government for the construction and main—tenance of roads, as well as the sums levied from Jagirdars for the same purpose, has to be credited to the District Fund, and the Commissioner should see that this is done. It is observed that the Commissioner is aware that the accounts of the several Boards are not yet in proper working order, and the Resident hopes that no time will be lost in putting matters straight and in giving full effect to the provisions of the law for the disposal of the several sources of income dealt with." We are glad to observe that the Commissioner did the best of his tour at Akola to set on an improved basis the management of the Akola District Board.

## वऱ्हाड

हवामान— गेल्या आठवड्यांतील गारांच्या पावसा मागून गारठा फार पडला. अलिकडे हवा चांगली होत आहे. किरकोळ दुखणीं थोडी बहुत बहुतेक आहेत.

मुनशी अजिजुद्दीन साहेब एकस्ट्रा असि० कमिशनर वऱ्हाड यांची बदली राजकीय खात्यांत बलुचिस्थानांत झाल्या मुळें त्यांनीं आपले जागेचा चार्ज गेल्या शुक्रवारीं दिला आणि त्याच दिवशीं रात्रीं त्यांची स्वारी कलकत्या कडे निघून गेली.

अलिशान रेसिडेंट मि. टी. सी. प्लौडन यांची स्वारी रेलवेनें आकोले मुक्कामाला तारीख ६ फेब्रुवारीं रोजीं रात्रौ दाखल होतील असा प्रोग्राम ठरला आहे.

आह्मास लिहिण्यास आनंद वाटतो कीं रा. रा. देवीराम कोंडजी यांस २० रुपयाच्या कारकुनी वरून ७५ रुपये पगाराच्या अकोला जिल्हा नाझरचे कामावर कायम केलें. नशीब सलाबत खरें! पण दुसऱ्यांच्या हक्कांची पायमल्ली झाली याचा कोण जाब घेईल बरें!

## अकोलें बाजार भाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... ....९९॥०॥

" १५ दिवसांच्या मुदतीची.... ९९॥=

सुवर्ण २६॥.... .... रुपें....१०९

मीठ....३॥।–.... आळशी मार्पा ११२

जवस वजनी ११४॥। .... चणे ...६५

गहूं काठे....७२।..............बनशी.... ८०

बाजरी....६५.... तुर ३८=

उडीद........३८= .... मुंग....३१.

जवारी ५५..................सर्की....७

तूप....९... ............तेल ६८=

कापूस....४५–६४............रुई ८०–८३

### सट्याचे भाव ( इंग्रजी. )

गहू वैशाख शुद्ध १९४९........ ६६॥

आळशी चैत्र "........"........ ९८।=

रुई फाल्गुन............"........ ६५॥

सर्की वैशाख नवे सालची "............६

जवारी.... वसंत........"............४६॥।

मुक्काम हैद्राबाद (दक्षिण)

ता० २५।१।९३

आस्ट्रियाचे राजपुत्र येथें काल सकाळीं दहा वाजतां स्पेशियल गाडीनें दाखल झाले. त्यांचे आदर सत्काराची व्यवस्था उत्तम आहे हें लिहिणे नकोच. ते खुद्द हुजूरचे पाहुणे असले वरून त्यास दिवाण साहेबाचे बशीर बागेतील फार शोभायमान बंगल्यात उतरविलें आहे. कालच भेट व परत भेटीचा समारंभ होऊन संध्याकाळीं हत्तीवर मिरवणूक निघाली व रात्रौ हुजूरचे माहालात मोठी मेजवानी झाली. आज सकाळीं शिकंदराबाद येथील सर्व फौजेची एकत्र परेड होऊन सलामी झाली.

हल्लीं हवेचे मान चहूंकडे असल्याचें जसें वर्तमान पत्रांतून समजते तसेच साधारण येथील ही मान आहे. आकाश नेहमीं अभ्रानीं अच्छादित असते. सकाळीं तर दहावाजे पर्यंत सूर्य दर्शन होत नाहीं मात्र रोगराई हींव, ज्वर, व खोकला या शिवाय दुसरी काहीं नाहीं.

खान बहादूर हिसामुद्दीन साहेब यानीं सुरू इंग्रेजी अमला पासून वऱ्हाडांत निरनिराळ्या हुद्यावर नोकरी केली असून हल्लीं ते असिस्टंट क्यांटोनमेंट माजिस्ट्रेटचे जागेचे पेनशन घेऊन शिकंदराबाद येथें राहत आहेत. खान बहादुर यांचे जेष्ट चिरंजीव शेख हबीबुद्दीन साहेब दुय्यम तालुकदार भोनगीर जिल्हा नलगुंडा यांस नबाब सर असमान ज्याह बहादुर मदारु माहम यांनीं आपलें जहागीर संबंधी काम काज पाहण्या करितां सरकारांतून मागून घेतलें हें लिहिण्यास संतोष वाटतो. हबीबुद्दीन साहेब यांस असे प्रकारें केवळ त्यांचे स्वतःच हुशारी व कर्तबगारी वरून दिवाण साहेब यांनीं मागून घेतलें त्याजबद्दल येथें मोठमोठ्या लोकांतही बऱ्याच मंडळीस आनंद झाला. या गोष्टींचें वऱ्हाडांतही बरेच लोक अभिनंदन करितील यांत संशय नाहीं. शेख हबीबुद्दीन साहेब यांनीं निजाम कॉलेजांत अभ्यास करून मद्रास युनिव्हरसिटी प्रवेश परीक्षा पास केली. नंतर सिव्हिल सरव्हिस क्लासांत राहून ती परीक्षा पास झाल्यावर यांस मद्रास ईलाख्यांत सरकार मार्फत काम शिकण्यास पाठविलें होतें व दिवाणी, फौजदारी, मुलकी व हिशेबी कामांत तरबेज झाल्या नंतर तिकडचे बडे अधिकाऱ्यांचे दाखल आणल्यावर त्यांस निजाम सरकारांत जागा देण्यांत आली होती हे आपले कामांत दक्ष, मनमिळाऊ व लोक कल्याणाकडेस विशेष लक्ष देणार असे आहेत असे बद्दल आह्मी गिरनिराळ्या द्वारांनीं यांची वाखाणणी ऐकिली आहे. तेव्हां अर्थातच सर्वांस उमेद आहे कीं शेख हबीबुद्दीन यांची नेमणूक सदरांत झाल्यानें जहागिरींतील रयतेस खरा न्याय मिळेल व त्यांचे हक्काचा योग्य विचार होईल.

## वर्तमानसार.

श्री० अमृतराव साहेब डफळे गत वर्षी कैलासवासी झाले, तेव्हां त्यांची जहागीर सरकार खालसा करील अशी सर्वत्र भीति पडली होती. परंतु एक वर्षपर्यंत सरकारांत भवति न भवति होऊन अखेरीस उमराणी येथील डफळ्यांच्याच घराण्यांतला परशूराम माधवराव यांचा चौथा मुलगा रामराव आबासाहेब या नांवानें गादीवर बसविण्याचें ठरलें व त्या प्रमाणें शुक्रवार ता० १३ मिन्हू रोजीं जत येथें दरबार भरवून सदर्न मराठा कंट्रीचे पोलिटिकल एजंट कर्नल वूडहौस यांनीं त्यास गादीवर बसविलें.

मुंबई इलाख्यांतील अफूचे उत्पन्न यंदां १० लाख वाढलें.

लंडन शहरांत दररोज सुमारें सत्तर हजार रुपयांची फुलें खपतात.

आ. मि. दादाभाई हे येत्या पार्लमेंटच्या बैठकींत हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी लार्ड किंबरले याना हिंदुस्थानच्या खजिन्यांतून जो दुहेरी पगार मिळतो त्याबद्दल प्रश्न काढणार आहेत. क० त०

इंग्लिश सरकारच्या संमतीनें इजिप्तच्या खेदिवांनीं मुख्य प्रधानाची नेमणूक केली नव्हती त्या मुळें बराच पत्रव्यवहार होऊन ती नेमणूक रद्द करण्यांत आली.

रशिया व फ्रान्स मिळून इजिप्शीयन प्रश्नाबद्दल इंग्रज सरकाराकडून जबाब मागविणार आहेत.

चार लाखांवर खर्च करून लखनौच्या क्यांटोनमेंटला पाणी पुरविण्याचें सरकारानें ठरविलें आहे. सु० प०

आगगाडीच्या उत्पन्नांत तूट—सरकारी आणि हमीच्या रेलवेच्या १८९२ सालच्या उत्पन्नांत ११० लक्ष रुपयांची तूट आली आहे. नार्थ वेस्टर्न ह्या सरकारी रेलवेच्या उत्पन्नांत ६६ लक्षांची, आणि जी. आय. पी ह्या हमीच्या रेलवेच्या उत्पन्नांत ४२ लक्षांची तूट आहे. ह्या शिवाय दुसऱ्या रेलवेच्या उत्पन्नांत अगदीं थोड थोडी तूट आहे असें समजतें.

जर्मनी, आस्ट्रिया, आणि इटली हे त्रिकूट लढाईच्या वेळीं जितकी फौज रणांगणावर उभी करील त्यापेक्षां रशिया आणि फ्रान्स १० लक्ष फौज, आणि १७०० तोफा जास्त आणितील म्हणून नवी फौज ठेवण्याबद्दल जर्मनीनें जें बील पार्लमेंटापुढें आणिलें आहे तें पास झालेंच पाहिजे असें एक चोपडें बादशहाच्या पक्षाच्या एका मनुष्यानें प्रसिद्ध केलें आहे. ख्रिस्ती राष्ट्रांचा लढाईबद्दल हा विचित्र कोटिक्रम पाहून त्या पवित्र धर्माच्या तत्वांनीं त्यांचीं मनें शांत न होतां क्षुब्ध होत आहेत असें कोणीही शहाणा माणूस तेव्हांच समजेल. गु० सू०

सिहालकोट येथें काडतुसांच्या ६,००० पट्या जमिनींत खणतांना सांपडल्या आहेत.

इंग्लंडांत दर वर्षास जितकें कापड निघतें तितकें पृथ्वी सभोंवतालीं कित्येक वेळां गुंडाळतां येईल.

चिनी थीवर, माणसांच्या केंसाचे पायमोजे घालतात, कारण त्यानें पाय भिजत नाहींत.

कलकत्ता युनिव्हर्सिटीचें सालिना उत्पन्न दोन लक्ष रुपये आहे.

१८९३ सालीं हिंदुस्थानांत रेलवे करितां खर्च होणारी रक्कम ५० लाख रुपयांनीं कमी केली आहे.

फ्रान्सामध्यें एक स्त्री बारिस्टर झाली आहे, युनायटेड्स्टेट्स मध्यें मॉंटेना येथें एक स्त्री बारिस्टर झाली असून ती अटर्नीजनरलची जागा मिळविण्याची खटपट करीत आहे.

फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावर एका दीपगृहांत जो नुकता दिवा लावण्यांत आला आहे त्याचा प्रकाश ५२ मैलांवरून दिसतो.

कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या बी. ए. च्या परिक्षेत यंदां २ बंगाली मुली पसार झाल्या:— मिस् इंदिरा टागोर (खासगी), मिस् प्रियवंदा बागची. ( ब्रिटन कालेज )

मला वाटतें "शास्त्राची गति कोठवर जाईल, आणि कोठवर नाहीं," हें किंवा अशा अर्थाचे एखादें वाक्य आतां आपले टेपांत जुळवूनच ठेवावें. कारण नवीन कांहीं शास्त्रीय शोधाविषयीं लिहितांना तें फार उपयोगी पडतें. असो.

समुद्राच्या तळीं निरनिराळ्या उंचीवरचे देखावे कोणी घेऊं शकेल असें कोणास वाटलें ही नाहीं; पण गेल्या दोन तीन वर्षांत एका समुद्र शोधकानें त्यास ही हात घालून त्यांत थोडेंबहुत यश मिळविलें आहे. मोनाकाचा जाहागिरदार या कामाचा फार नादी. त्यानें एक आगबोट मुद्दाम तयार करवून तीवर समुद्राच्या तळीं फोटोग्राफ घेण्याचें यंत्र तयार केलें. इ. स. १८७४ सालीं डाक्टर नायमायर नांवाच्या एका शास्त्रज्ञानें बर्लिन येथील भूगोलविद्यासमाज नांवाच्या मंडळीपुढें एक फोटोग्राफी यंत्र आणून दाखविलें; त्यावरून समुद्राच्या पोटांत पाहिजे त्या ठिकाणची उष्णता, व ओघाची दिशा हीं समजतात. एक पितळेची पेटी इतकी विलक्षण मजबूत केलेली असते कीं तींत पाण्याचा बिंदु ह्मणून शिरकावयाचा नाहीं आणि तिलाच सुकाणसारखें एक लहानसें यंत्र असतें त्याचप्रमाणें एक उष्णतामापक यंत्र लोहचुंबकाची सुई हीं असतात. या प्रत्येकाच्या पाठीमागे एक फोटोग्राफी—ग्राहक—कागद असतो; व प्रत्येकाच्या पुढें एक नैट्रोजनची निर्वातनलिका असते. शिवाय एक विद्युद्दाहक तारेचे वेटोळेंही असतें. यंत्र खाली पाण्यात घातलें कीं, सुकाणूसारख्या त्या यंत्राच्या योगानें ते ओघाचे दिशेला समांतर असें जातें. अर्थातच त्या लोहचुंबकसुईनें दिशा बरोबर समजतें. इकडे ते ऊष्णतामापक यंत्र बाहेरल्या पाण्याच्याइतकें उष्ण होऊन त्यांतील पारा विवक्षित जागीं येऊन अडळ होतो इतक्यांत विद्युद्घात करून खालीं प्रवाह पाठविला जातो. तो त्या तारेच्या वेटाळ्यातून जाऊन नैट्रोजनला लागतो, व त्यायोगाने तो नेट्रोजन पेटून ज्योत होते ही ज्योत फोटोग्राफ घेण्याला पुरे इतका उजेड पाडते आणि त्या उजेडाने पाठीमागल्या ग्राहककागदावर त्या लोहचुंबकसुईचा व उष्णतामापक यंत्राच्या पाऱ्याचा फोटोग्राफ घेतो. हा सर्व फोटोग्राफ उठण्याला पुरीं तीन मिनिटे सुद्धां लागत नाहींत. मग विद्युत्प्रवाह बंद करतात, यंत्र वर उचलतात, आणि नीट तपासून त्या कागदावर काय उठलें असेल, त्याचें टिपण करतात.

दुसऱ्या दोघां स्काच फोटोग्राफरांनीं समुद्राच्या तळच्या आसमंतात् भागाचे फोटोग्राफ घेतले आहेत. एक कामेरा जलभेद्य अशा पेटींत घालून खालीं घालतात, व आपल्याला पाहिजे तितक्या खोलींत तो गेला, ह्मणजे कृत्रिम प्रकाशानें तो आसमंतात् भाग प्रकाशवून त्याचा फोटोग्राफ उतरण्यासाठीं कामेऱ्याचें झांपण एका दोरीच्या साह्यानें टट्कन् उघडतात. शास्त्रज्ञान व मनुष्याची युक्ति हे जोडपे जे काय करील तेवढे थोडे आहे! क०

नवीन तऱ्हेच्या बंदुकांचीं काडतुसें करण्याचा कारखाना खडकीस सुरू होणार असून त्या करतां एक लाखाहून जास्त रकम मंजूर झाली आहे असें सांगतात.

रोमच्या ब्यांकेंत लबाडी झाल्याबद्दल म्यानेजर वगैरेस कैद केलें आहे.

पनामा कालव्याच्या लाचेच्या खटल्यांतल्या आरोपीस डागण्या देण्याचा ठराव करा अशी सरकारी वकिलानें कोर्टास विनंती केली.

फिनलांडांत दुष्काळ सुरू झाला असून दोन लाख माणसें अन्नास महाग झालीं आहेत असें रशियातली तार सांगते.

हिंदुस्थानांत प्रवास करीत फिरत असलेले नेपाळचा प्रधान महाराज वीर समशेर बहादुर हल्ली रावळपिंडी येथें गेला आहे. हिंदुस्थानांत ठिकाठिकाणीं त्यांचा उत्तम प्रकारचा मानसन्मान होत आहे.

मध्य एशियाच्या हद्दींत पिकणारा बहूतेक कापूस जर्मनदेशांत जाऊं लागला आहे असें रशियन पत्रांवरून समजतें.

लढाईचा प्रसंग आल्यास उपयोगी पडण्या करतां ५,१०,००,००० काडतुसें हिंदुस्थान सरकारानें मागविलीं आहेत. या पैकीं येत्या एप्रिलच्या आरंभी १,७०,००,००० येणार आहेत. हल्लीही हिंदुस्थानसरकाराजवळ गरज लागल्यास उपयोगी पडण्याकरतां पुष्कळ दारू गोळा तयार आहे.

सरहद्दीवरील लशकरास गेल्या वर्षी नव्या तऱ्हेच्या तोफा देण्याचा विचार असून त्या करतां लागणाऱ्या खर्चाची रक्कम हिंदुस्थान सरकारच्या येत्या बजेटांत मंजुर व्हावयाची आहे. या नव्या तोफा घोडे जोडून हव्या तितके नेतां येण्यासारख्या असून सरहद्दीवरील कामाकरतांच ही योजना आहे. ठा० अ०

## हे पाक पाहा

हा हेमंत ऋतु युक्त हिवांतच खाण्यानें पौष्टीक शक्ती व स्फूर्ती व स्मरणशक्ती मिळेल व हस्तपाद व कटी ठणक व शूळ व सर्व वात विकार नाहींसे खात्रानें होतात व बाळंतीनीस व सर्वा स्त्रीयांस गुण देणारें सौभाग्य सुंट हे पाक विक्रीस तयार आहेत लागेल त्यानीं मागविल्यास व्हालुपेबलनें पाठऊ. पोष्टेज खर्च निराळा पडेल त्वराकरा गेली वेळ येणार नाहीं.

| | |
|---|---|
| सालम मिसरी पाक द० शे० ८० तो. | ३रु. |
| बदाम पाक | २॥ |
| गोखरू पाक | ७ |
| कुसमांड पाक | ५ |
| सालममिसरी व बदाम पाक प्रत | २ |
| | २ रु. |
| सौभाग्य सुंट | २ |

( पत्ता व सही ) शिवचरणगीर रामगिरि.
वैद्य कुणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड

### डा० वामन गोपाळ यांचा सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षघातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग तसचें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, हाणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरें कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

### गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा ( मेंदु ) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

### पांढरे केस काळे भोर होण्याचा कल्प

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यातवरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.